# बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन

नोंदणी क्रमांक १) सोसायटी रजिस्ट्रेशन अधिनियम १९७४- मुंबई २९०/७४, दि. ११.१०.१९७४
२) मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधि. १९५०-क्र.एफ् /३५१० (मुंबई), दि. ३१.१२.१९७४

### ✿ कार्यालय ✿

जी-उत्तर महापालिका विभाग कार्यालय इमारत, खोली क्र. ९, तळमजला,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, प्लाझा सिनेमाच्या जवळ, दादर (प.), मुंबई- ४०००२८,
दूरध्वनी : ०२२-६९५१७८०० • भ्रमणध्वनी : ७७००९२४७४२
ई-मेल - mmpasso739@gmail.com
website - www.bmpa.co.in

### ✿ संलग्न संस्था ✿

महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, पुणे.

# ५२ वा वार्षिक अहवाल

## २०२५ - २०२६

### वार्षिक सर्वसाधारण सभा

शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६, वेळ - स. १०.३० वा.

❋ स्थळ ❋

दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, १२२-अ, जे. के. सावंत मार्ग,
जोशी वाडी, माटुंगा (प.), मुंबई-४०० ०१६.

## (कार्यकारी मंडळाचे सदस्य ) कालावधी : सन २०२५ ते २०२८

| | पदाधिकाऱ्याचे नांव | पद | भ्रमणध्वनी/ दूरध्वनी |
|---|---|---|---|
| १. | श्री. कमलाकर क्षीरसागर | अध्यक्ष | ९८१९१३८२५४ |
| २. | श्री. जयंत दातार | उपाध्यक्ष | ९८६९६७२३७१ |
| ३. | श्री. अनंत पाटील | उपाध्यक्ष | ९८९२३४६५६२ |
| ४. | डॉ. मारुती नलावडे | कार्यवाह | ९८६९७२२२३८ |
| ५. | श्रीम. प्रतिमा पवार | संयुक्त कार्यवाह | ९९८७७७९९५७ |
| ६. | श्री. शिवराम अतकरी | संयुक्त कार्यवाह | ९८९२९१६३२४ |
| ७. | श्रीम. नीता मांजरेकर | संयुक्त कार्यवाह | ९६५३३२८७५६ |
| ८. | श्री. विजयकुमार पोतदार | खजिनदार | ९७६६५२५२६७ |
| ९. | श्री. चंद्रशेखर फडके | सह खजिनदार | ९६१९७४९९६४ |
| १०. | श्री. सुहास खामकर | सदस्य | ९८२०८४०२५३ |
| ११. | श्री. दिलीप करंदीकर | (कार्यालय प्रमुख) | ९८३३८५६८५२ |
| | **स्वीकृत सदस्य** | | |
| १२. | श्री. मधुकर आंबोणकर | ठाणे | ९९६९१६६६८२ |
| १३. | श्रीम. अनुजा आचरेकर | गिरगाव | ९८३३१९२८२१ |
| १४. | श्री. शरद कुवेसकर | वडाळा | ९८६९४६४५४४ |
| १५. | श्रीम. शिल्पा नाईक | चेंबूर | ९८२०२२२०७५ |
| १६. | श्री. सुरेश सावंत | बोरीवली | ९८६९१८६८१२ |
| १७. | श्री. विनायक रेगे | गोरेगाव | ९८६९०६१५७२ |
| १८. | श्री. चंद्रकांत तळेले | कल्याण | ९९८७२७३०२० |

### मार्गदर्शक मंडळ :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. शांताराम खेडेकर | – निवृत्त उपप्रमुख लेखापाल | ९९६९०२७९९० |
| २) | श्री. अविनाश काळे | – निवृत्त मुख्य अभियंता | ९८६९००९०५७ |
| ३) | श्री. प्रभाकर जोशी | – निवृत्त प्रमुख लेखापाल | ९९६७८३७४२३ |
| ४) | श्री. प्रभाकर गावडे | – निवृत्त उपप्रमुख लेखापाल (प्रभारी) | ८८३०२२८४२१ |
| ५) | श्री. अनंत केळकर | – निवृत्त प्रशासकीय अधिकारी | ९८६९४०२२६३ |
| ६) | श्री. सुनिल धामणे | – निवृत्त उपायुक्त | ९८२०७०२६०७ |

* श्री. प्रदीप कुलकर्णी, अंतर्गत हिशेब तपासनीस, दूरध्वनी : ९७६९२२००५०

** श्री. निलेश म्हापसेकर, चार्टर्ड अकाऊंटंट, सनदी हिशेब तपासनीस, दूरध्वनी : २४७१०८७१

## अनुक्रमणिका


**१) विद्यमान पदाधिकारी /कार्यकारी मंडळ सदस्यसूची – मुखपृष्ठ / मलपृष्ठ**
**२) वार्षिक सर्वसाधारण सभेची अग्रसूचना : पृ. १**
**३) ५२ वा वार्षिक अहवाल : पृ. २ ते ५७**
**४) ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त : पृ. ५८ ते ६९ (परिशिष्ट 'अ')**
**५) सनदी लेखापरीक्षकाचा अहवाल : पृ. ७०–७१**
**६) लेखापरीक्षित जमाखर्च व ताळेबंद : पृ. ७२–७९**
**७) सन २०२६–२७ चे अंदाजपत्रक : पृ. ८०–८१**
**८) महागाईभत्ता दर – तक्ता : पृ. ४–५**
**९) पेन्शन स्लीप मिळण्यासाठी अर्ज नमुना : पृ. ४८**
**१०) विभागीय संपर्क व्यवस्था : पृ. ८२–८३**

# बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन
## वार्षिक सर्वसाधारण सभेची अग्रसूचना (नोटीस)

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **शनिवार, दिनांक १० ऑक्टोबर २०२६, रोजी ठीक सकाळी १०.३० वाजता, दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, जे. के. सावंत मार्ग, जोशी वाडी, माटुंगा (पश्चिम), मुंबई ४०००१६** या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. सभेत खाली नमूद केलेल्या विषयांवर विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येतील. सर्व सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी सभेला वेळेवर हजर राहून सभेत सहभाग घ्यावा. सभेस येताना कृपया आपल्यासोबत **सभासद ओळखपत्र** घेऊन यावे.

**✤ कार्यक्रमपत्रिका ✤**

१) मागील (५१व्या) वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (मागील वर्षी, वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित केली होती.) सदर सभेचे इतिवृत्त माहिती प्रयोजनार्थ **परिशिष्ट 'अ'** मध्ये जोडले आहे.

२) ५२ वा वार्षिक अहवाल (१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६), या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षीत जमाखर्च, ताळेबंद वाचून मंजूर करणे.

३) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रक मंजूर करणे.

४) सन २०२६-२०२७ या वर्षासाठी मानद अंतर्गत हिशेब तपासनीसाची निवड करणे.

५) सन २०२६-२०२७ चे आर्थिक व्यवहार तपासण्यासाठी सनदी लेखापाल, यांची नेमणूक करणे.

६) संस्थेच्या केंद्रीय कार्यालयासाठी स्वमालकीची जागा खरेदी करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेणे.

**डॉ. मारुती नलावडे**
**कार्यवाह**
**कार्यकारिणीच्या अनुज्ञेवरून,**

मुंबई
दिनांक : २३ सप्टेंबर, २०२६

*** विशेष सूचना ***

१) ही सभा फक्त दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत सभासद असलेल्या सभासदांसाठी आहे. सभेस येताना संस्थेचे ओळखपत्र आणणे अनिवार्य आहे.

२) ५१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, सन २०२५-२०२६चा वार्षिक अहवाल, लेखापरिक्षीत जमाखर्च, ताळेबंद इ. कागदपत्रांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी संबंधित अभिलेख **दि. २८.९.२०२६** ते **दि. ९.१०.२०२६** या कालावधीत (शनिवार, रविवार व सर्व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) संस्था कार्यालयात दु. २.३० ते सायं. ४.३० या वेळेत उपलब्ध करून देण्यात येतील. शिवाय वार्षिक अहवाल, इतिवृत्त लेखापरिक्षीत जमाखर्च व ताळेबंद आपल्या संस्थेच्या **www.bmpa.co.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील.

३) ज्या सदस्यांना ठराव मांडावयाचा असेल त्यांनी त्या ठरावाची प्रत, सभेच्या दिनांकापूर्वी किमान सात दिवस आधी पाठवावी. ठराव पाठविताना त्यावर सूचक व अनुमोदक यांच्या सह्या आवश्यक आहेत.

४) सभेच्या नियत वेळी, गणपूर्ती न झाल्यास सदर सभा अर्धा तास कालावधीसाठी तहकूब करण्यात येईल व त्यानंतर उपस्थित संख्या पुरेशी आहे असे मानून, सभेला सुरुवात करून, कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व विषयांवर निर्णय घेण्यात येतील.

५) **वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस, वार्षिक अहवाल, ५१व्या वार्षिक सभेचे इतिवृत्त, लेखापरिक्षीत जमाखर्च व ताळेबंद सर्व सभासदांना ई-मेलद्वारा पाठवण्यात आला आहे.** तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना दै. सामना व दै. नवाकाळ मध्ये प्रकाशित करण्यात येत आहे.

६) लेखापरिक्षीत जमाखर्च, ताळेबंद तसेच वार्षिक अहवालाच्या मुद्रित प्रती, असोसिएशनच्या कार्यालयात तसेच संस्थेच्या मुंबई शहर, गोरेगांव, बोरीवली, वसई, मुलुंड, ठाणे, डोंबिवली, कल्याण, बदलापूर, चेंबूर, पुणे इ. विविध केंद्रस्थानी, दिनांक **२४ सप्टेंबर २०२६** पासून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या संदर्भात कृपया संबंधित विभागीय कार्यकर्त्यांशी संपर्क साधून सभासदांनी वार्षिक अहवालाची छापील प्रत प्राप्त करावी.

# बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन
# ५२ वा वार्षिक अहवाल
# (वर्ष २०२५-२०२६)

**सर्व सभासद बंधू भगिनींनो,**

आपल्या असोसिएशनचा ५२वा वार्षिक अहवाल आपल्या हाती सुपूर्द करतांना कार्यकारिणीला आनंद तसेच अभिमान वाटतो. अहवाल वर्षातील ठळक बाबींचा उल्लेख पुढीलप्रमाणे :-

**१) मासिक सभा / वार्षिक सर्वसाधारण सभा :**

- अहवाल वर्षात कार्यकारिणीच्या १२ सभा, पदाधिकारी मंडळाची १ सभा अशा एकूण **१३** सभा संपन्न झाल्या. कार्यकारिणीच्या सभांना कार्यकारिणी सदस्य/निमंत्रित सदस्य यांची सरासरी उपस्थिती ४० होती.
- शनिवार दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी, सन २०२४-२५ ची वार्षिक सर्वसाधारण सभा, दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, जे. के. सावंत मार्ग जोशी वाडी, माटुंगा (प), मुंबई -४०००१६ येथे सकाळी ११.३० वा. संपन्न झाली. सदर सभेत २०० सभासदांनी उपस्थित राहून कामकाजात भाग घेतला.

**२) सभासद संख्या :**

वृत्तांत साली एकूण ७७१ नवीन सभासद संस्थेस जोडले गेले आहेत. वृत्तांत वर्षाअखेर पटावरील सभासद संख्या २६३७३ आहे.

| सभासद | १.०४.२०२५ रोजी पटावर असलेले सभासद | नवीन झालेले सभासद | निधन झालेल्या सभासदांची संख्या | दि. ३१.०३.२०२६ रोजी एकूण सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| आश्रयदाते / आजीवन सभासद | २५६०२ | ७७१ | ४२ | २६३३१ |

**३) सभासद नोंदणी / चळवळ :**

अहवाल वर्षात संस्थेतर्फे विभागीय / केंद्रीय स्तरावर सभासदांसाठी उदबोधनपर व्याख्याने, विभागीय स्नेहसंमेलने, महिला सक्षमीकरण मेळावे, विभागनिहाय सभा, जीवनप्रमाणद्वारा ऑनलाईन पद्धतीने हयातीचे दाखले सादर करणे, इ. प्रकारचे कार्यक्रम निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी आयोजित केले गेले. सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना संस्थेचे महत्त्व उमजल्याने, ७७१ एवढ्या मोठया संख्येने सेवानिवृत्त कर्मचारी, संस्थेस सभासद नात्याने जोडले गेले.

तरीही एकूण सुमारे १ लाखाचे वर निवृत्तीवेतन धारकांची संख्या लक्षात घेता, सदर वाढ ही नक्कीच समाधानकारक नाही. त्यामुळे सभासदांना आवाहन करण्यात येते की, प्रत्येकाने सेवानिवृत्त कामगार / कर्मचारी/ अधिकारी यांच्याशी संपर्क साधून किमान २ नवीन सभासद नोंदणीसाठी प्रयत्न करावेत व संस्थेची संख्यात्मक ताकद वाढवावी. सभासद वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

* आजीवन सभासदत्व - अर्जासोबत रु. ३१०/- (रु. ३००/- अधिक रु.१०/- प्रवेश फी)
* वार्षिक वर्गणी रु. १५०/- प्रतिवर्षी निवृत्तीवेतनातून परस्पर जमा होते. (डिसेंबर)
* वैद्यकीय सहाय्य योजना वर्गणी रु. २००/- प्रतिवर्षी निवृत्तीवेतनातून परस्पर जमा होते. (जानेवारी)

**वैद्यकीय सहाय्य योजनेचे सभासदत्त्व घेणे ही बाब पूर्णतः ऐच्छिक आहे. दि. १३ जानेवारी २०२४ पासून, रुग्णालय खर्चाच्या २०% किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/– एवढे आर्थिक सहाय्य, सदर योजनेच्या नियम/अटी सापेक्ष अर्जदार सभासदास, त्याच्या सभासदत्त्वाचा कालावधी ३ वर्षे पूर्ण झाल्यावर देण्यात येत आहे.**

तरी सर्व सभासदांनी सदस्य नोंदणीसाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करत आहोत. **''सभासद नोंदणीची चळवळ हाती घेऊ या, संघटन शक्ती वाढवू या''** अशी अपेक्षा करत आहोत.

**४) गतिमान प्रशासकीय व्यवस्थापन व त्याची कार्यवाही :**

आपल्या असोसिएशनचे कार्य अधिक भरीव व परिणामकारक व्हावे, तसेच कार्यालयीन प्रशासन गतिमान व्हावे, या उद्देशाने कांही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येऊन त्याची अंमलबजावणी देखील करण्यात आली आहे.

**४ अ) बदल अहवालांस (Change Reports) मंजूरी प्राप्त :**

दर तीन वर्षानंतर संस्थेची नवीन कार्यकारिणी निवड/निवडणूक विहित प्रक्रियेद्वारे अस्तित्वात येत असते. त्यानुसार सन २०२५ ते २०२६ या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी अस्तित्वात आली होती. त्याचा बदल अहवाल, धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचेद्वारे दि. २४–२–२०२६ रोजी मंजूर करण्यात आला आहे. **(मंजूरी क्र. ACC / VII / 10662 / 2025 / 24.02.2026)**

**संस्था कार्यवाह डॉ. नलावडे, कार्यालय प्रमुख श्री. दिलीप करंदीकर** यांच्या सततच्या पाठपुरावा व परिश्रमामुळे उपरोक्त बदल अहवाल मंजूर करून घेण्यात संस्थेला यश मिळालेले आहे.

धर्मादाय आयुक्त कार्यालयातील संस्थाविषयक अभिलेख/नोंदी अद्ययावत असणे, या गोष्टीस तांत्रिक तसेच कायदेशीर/वैधानिकदृष्ट्या अत्यंत महत्त्व असते. बदल अहवाल मंजूर करून घेण्यासाठी संस्था कार्यवाह, **डॉ. मारुती नलावडे,** कार्यालय प्रमुख श्री. दिलीप करंदीकर यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. हे योगदान अत्यंत अभिनंदनीय आहे. या कष्टसाध्य यशामुळे, भविष्यातील संस्थेची वाटचाल सुकर होणार आहे, हे निश्चित, असे अध्यक्षांचे निवेदन आहे.

**४ ब)** असोसिएशनचे लेखे परीरक्षित करण्याच्या कामाचे संगणकीकरण तसेच अभिलेख्यांचे डिजिटायझेशन करण्याचे कामास आता गती मिळालेली आहे. सन २०१५ पासूनचे सर्व Change Reports (बदल अहवाल) डिजिटल स्वरूपात जतन करण्यात येत आहेत. प्रवेश शुल्क, सभासद वर्गणी, देणगी इ.च्या पावत्या व सभासदांची ओळखपत्रेही डिजिटल स्वरूपात काढली जात आहेत. तसेच सदर पावत्या, whats up माध्यमातून संबंधितांस विनाविलंब देण्याची कार्यवाही सुरू झालेली आहे.

**४ क)** जी/नॉर्थ विभागीय कार्यालय इमारतीमधील असोसिएशनच्या कार्यालयाच्या कामकाजाची वेळ सकाळी ११:३० ते सायंकाळी ५:३० अशी करण्यात आली असून, कार्यालयीन कर्मचारी, सेवक यांचे वेतन पुनर्निर्धारित करून सेवा अटींमध्ये सुसूत्रता आणली आहे. असोसिएशनचे लेखे, टॅली, संगणकीय प्रणालीत परीरक्षित करणे, वैद्यकीय सहाय्य योजनेची माहिती, सभासद नोंदवही, इत्यादी. अभिलेख संगणकीय प्रणालीत परीरक्षित करण्यासाठी, **सौ. मनाली गावड (B. Com)** यांची, पूर्ण वेळ लेखा सहाय्यक पदावर नेमणूक कायम केली आहे.

**४ ड)** असोसिएशनचे होणारे सभासद, देणगीदार इत्यादींना पैसे देणे सोपे, सुरक्षित व्हावे, यासाठी, QR Code द्वारे नेट बँकिंगद्वारे, डिजिटल पेमेंट सिस्टीमद्वारे रकमा स्वीकारण्यात येत आहेत. सभासद वर्गणी, देणगी जमा करण्यासाठीचा QR Code, **www.bmpa.co.in** या संस्थेच्या वेबसाइटवर उपलब्ध असून तो पुढीलप्रमाणे आहे. हा कोड Scan करून सभासद, संस्थेच्या नावे रक्कम पाठवू शकतात.




याचबरोबर कर्मचाऱ्यांचे पगार, वैद्यकीय सहाय्य रकमेचे अधिदान, पदाधिकारी / कार्यकारिणी सदस्यांचा प्रवास भत्ता इ. साठी NEFT/RTGS प्रणालींचा वापर करण्यात येत आहे.

**४ इ) महानगरपालिका प्रशासनाकडून Vendor Code द्वारे रक्कम प्राप्त:–**

महानगरपालिका प्रशासनाकडून कपात केलेली सभासदांची वार्षिक वर्गणी तसेच वैद्यकीय सहाय्य योजनेची वर्गणी, आपल्या संस्थेस **0000052581** या Vendor Code द्वारे संस्थेच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली असून, ही खूप मोठी उपलब्धी आहे.

**४ फ)** सर्व कार्यकारिणी सभासदांना सभेची नोटीस, मागील सभेचा इतिवृत्तांत, इत्यादी ई–मेलद्वारे पाठवण्यात येत आहे. तसेच लेखापरीक्षित जमाखर्च, ताळेबंद, वार्षिक अहवाल व वार्षिक सभेची नोटीस सर्व सभासदांना ई–मेलद्वारे पाठवण्यात येते. शिवाय हे सर्व दस्तावेज संस्थेच्या **www.bmpa.co.in** या संकेतस्थळावर उपलब्ध केले जात आहेत.

**५) महागाई सहाय्य वाढ :**

महापालिका कर्मचाऱ्यांबरोबरच निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनाही दरवर्षी १ जानेवारी व १ जुलैपासून महागाई सहाय्यात नियमित वाढ दिली जाते. ७व्या वेतन आयोगानुसार वेळोवेळी वाढलेल्या महागाई सहाय्याच्या दराचा तक्ता माहिति प्रयोजनार्थ पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

**महागाई सहाय्य वाढीच्या दराचा तपशील (७ व्या वेतन आयोगानुसार)**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ जानेवारी २०१६ | ते | ३० जून २०१६ | ०% |
| ०१ जुलै २०१६ | ते | ३१ डिसेंबर २०१६ | २% |
| ०१ जानेवारी २०१७ | ते | ३० जून २०१७ | ४% |
| ०१ जुलै २०१७ | ते | ३१ डिसेंबर २०१७ | ५% |
| ०१ जानेवारी २०१८ | ते | ३० जून २०१८ | ७% |
| ०१ जुलै २०१८ | ते | ३१ डिसेंबर २०१८ | ९% |
| ०१ जानेवारी २०१९ | ते | ३० जून २०१९ | १३% |

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ जुलै २०१९ | ते | ३१ डिसेंबर २०१९ | १७% |
| ०१ जानेवारी २०२० | ते | ३० जून २०२० | १७% |
| ०१ जुलै २०२० | ते | ३१ डिसेंबर २०२० | १७% |
| ०१ जानेवारी २०२१ | ते | ३० जून २०२१ (प्रत्यक्ष अंमलबजावणी जुलै २०२१ पासून) | २८% |
| ०१ जुलै २०२१ | ते | ३१ डिसेंबर २०२१ | ३१% |
| ०१ जानेवारी २०२२ | ते | ३० जून २०२२ | ३४% |
| ०१ जुलै २०२२ | ते | ३१ डिसेंबर २०२२ | ३८% |
| ०१ जानेवारी २०२३ | ते | ३० जून २०२३ | ४२% |
| ०१ जुलै २०२३ | ते | ३१ डिसेंबर २०२३ | ४६% |
| ०१ जानेवारी २०२४ | ते | ३० जून २०२४ | ५०% |
| ०१ जुलै २०२४ | ते | ३१ डिसेंबर २०२४ | ५३% |
| ०१ जानेवारी २०२५ | ते | ३० जून २०२५ | ५५% |
| ०१ जुलै २०२५ | ते | ३१ डिसेंबर २०२५ | ५८% |
| ०१ जानेवारी २०२६ | ते | ३० जून २०२६ | ६०% |

महागाई सहाय्य, मूळ निवृत्तीवेतनावर देण्यात येते, याची कृपया नोंद घ्यावी.

**६) वैद्यकीय सहाय्य निधी योजना :**

सन १९९४ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनतर्फे चालवली जाणारी ही वैशिष्ट्यपूर्ण अशी योजना आहे. या योजनेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

- या योजनेचे सभासदत्व मिळाल्यापासून, ३ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, स्वतः सभासद किंवा त्यांचे जोडीदाराच्या - (पती किंवा पत्नी) आजारपणासाठी आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी अर्ज करता येतो.
- वैद्यकीय कारणास्तव खर्च केलेल्या एकूण रकमेच्या २०% किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य, निधी उपलब्धतेसापेक्ष मंजूर केले जाते. निधीचे प्रत्यक्ष अधिदान NEFT द्वारे करण्यात येते.
- विहित नमुन्यातील छापील अर्जासोबत, रुग्णालयाचे ॲडमिशन/डिस्चार्ज कार्ड, डॉक्टरांचे निदान, शस्त्रक्रियेची माहिती याचे प्रमाणपत्र, हॉस्पिटलचा खर्च व बीले यांच्या मूळ प्रती जोडणे अनिवार्य आहे. हॉस्पिटलचा खर्च रु. २.५० लाखापेक्षा जास्त असल्यास इतर बिलांची आवश्यकता नाही.
- या योजनेतून आर्थिक मदत मिळण्यासाठी किमान वैद्यकीय खर्च रु. ४०,०००/- होणे अनिवार्य आहे. वैद्यकीय खर्चाच्या २०% किंवा अधिकतम रु. ५०,०००/- एवढी रक्कम संपूर्ण सभासदत्व कालावधीसाठी एकदाच मिळू शकेल.
- प्रत्यक्ष अधिदान सुलभ व्हावे यासाठी अर्जासोबत स्वयंसाक्षांकित पॅनकार्ड, आधारकार्ड तसेच धनादेश/बँक पासबुकची झेरॉक्स प्रत किंवा रद्द केलेला धनादेश जोडावा.
- एकदा या योजनेचा फायदा घेतल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत असोसिएशनचे सभासदत्व रद्द करता येणार नाही. संबंधिताने या योजनेची वार्षिक वर्गणी, वार्षिक सभासद वर्गणीसह आजीवन भरणे जरूरीचे आहे.
- रुग्णालयातून ज्या तारखेला डिस्चार्ज मिळाला, त्यानंतर एक वर्षाच्या आत प्रस्ताव संस्थेच्या कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतरचे प्रसाव स्वीकारले जाणार नाहीत.

- तसेच इतर कोणत्याही आस्थापना/व्यक्ती, धर्मादाय संस्था, विमा कंपनीकडून संबंधित आजार प्रकरणी मदत अर्थसहाय्य घेतले असल्यास व त्यांचेकडून प्राप्त प्रतिपूर्ती रकमेपेक्षा, जास्त खर्च झाल्यास, ज्यादा खर्चावरील रकमेच्या २०% प्रमाणे या योजनेअंतर्गत प्रतिपूर्ती केली जाईल, अशा प्रसंगी बिलांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडाव्यात. तसेच विमा कंपनीचे रक्कम मंजूर /अधिदान झाल्याचे पत्र जोडावे.
- या योजनेंतर्गत वैद्यकीय समिती तसेच असोसिएशनच्या कार्यकारिणीने मंजूर केलेले निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक असतील.
- **डोळ्याच्या ऑपरेशनसाठी**– एका डोळ्यासाठी नियमानुसार जास्तीत जास्त रु. १०,०००/– मदत देण्यात येईल. एका डोळ्याचा कमीत कमी खर्च रु. ४०,०००/– असणे जरुरीचे आहे. दंत चिकित्सेसाठी मदत अनुज्ञेय नाही.
- जास्तीत जास्त गरजू सभासदांना या योजनेचा फायदा करून देणे, हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. संस्थेचे सभासदत्व स्वीकारतानाच वैद्यकीय सहाय्य योजनेचे सभासदत्व स्वीकारणे अभिप्रेत आहे.
- या योजनेंतर्गत सभासदाने अर्ज सादर केल्यानंतर, रकमेच्या अधिदानापूर्वी, जर सभासदाचा मृत्यू झाला तर, नियमानुसार योग्य ती कागदपत्रे सादर केल्यानंतर, सभासदाच्या वारसास सदर रक्कम अदा करण्यात येईल.
- सभासदाच्या हिताच्या दृष्टीने वेळोवेळी नियमावलीत योग्य तो बदल करण्याचा अधिकार वैद्यकीय समिती / कार्यकारिणीला आहे. सदर बदल लगेचच लागू करण्यात येईल.
- या अहवाल वर्षात, वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत एकूण **<u>७४</u> अर्जांना** मंजूरी देण्यात येऊन एकूण **रु. १७,१६,०७०/–** (रु. सतरा लाख सोळा हजार सत्तर फक्त) इतक्या रकमेचे अधिदान करण्यात आले आहे. ही योजना सुरू केल्यापासून ते ३१ मार्च, २०२६ पर्यंत संस्थेने एकूण **<u>१४००</u> सभासदांना रु.२,२०,९२,३०५ (रु. दोन कोटी वीस लाख ब्याण्णव हजार तीनशे पाच फक्त)** इतके अधिदान केलेले आहे.
- या योजनेची माहिती, तसेच आर्थिक सहाय्य प्राप्त होण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, असोसिएशनच्या संकेतस्थळावर **<u>(www.bmpa.co.In)</u>** उपलब्ध आहे.

## ७ अ) दि. ०१.०४.२००० पूर्वी निवृत्त झालेल्या निवृत्तांची थकबाकी मिळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका

उपरोक्त विषयीची याचिका क्र. २५९८/२०१६ मान. उच्च न्यायालयाने दि. १५.०२.२०१९ रोजी निकाली काढली असून संबंधितांना थकबाकी देण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु दुर्दैवाने महानगरपालिका त्याच्या विरोधात मान. सर्वोच्च न्यायालयात गेली आहे. असोसिएशनच्या वतीने क्र. **SLP(C)/24360/2019** ही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. ४ वर्षानंतर म्हणजे ऑक्टोबर २०२३ मध्ये महानगरपालिकेने याला विरोध करण्यासाठी Rejoinder Affidavit सादर केले आहे. त्याला असोसिएशनतर्फे Counter Affidavit सादर केले आहे. जाने. २०२४ मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे Rejoinder Affidavit सादर केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या नोटीसनुसार मनपा प्रशासन व असोसिएशन या दोन्ही पक्षकारांची तडजोडीसाठी लोक अदालतीच्या माध्यमातून एक Conciliation Sitting माजगाव कोर्ट, मुंबई येथे दि. १९ जून २०२४ रोजी आयोजित केली होती. परंतु सदर दिवशी मनपा प्रशासनाने कोणताही प्रस्ताव दिला नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०१.०६.२०२६ च्या नोटीसनुसार मनपा प्रशासन व असोसिएशन या दोन्ही पक्षकारांची तडजोडीसाठी लोक अदालतीच्या माध्यमातून पुन्हा एक Conciliation sitting माजगांव कोर्ट, मुंबई येथे दि. ०५ जून, २०२६ रोजी आयोजित केली होती. परंतु सदर दिवशीही मनपा प्रशासनाकडून ना कोणी उपस्थित राहिले, ना प्रस्ताव दिला. आता दि. २१-२३ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत मान. सर्वोच्च न्यायालयात याविषयी विशेष लोक अदालत होत आहे. याविषयी संस्थेने आपला अहवाल ॲडव्होकेट अनघा देसाई यांना पाठवला आहे. माजगांव कोर्ट, मुंबई यांनी प्रकरण प्रलंबित असल्याचा अहवाल मान. सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवलेला आहे. परंतु दुर्दैवाने त्याविषयी अद्यापपर्यंत कोणतीही सुनावणी होत नाही.

नवी दिल्ली येथील संस्थेच्या ॲडव्होकेट श्रीम. अनघा देसाई यांचेशी ई-मेल, स्पीड पोस्ट, दूरध्वनीमार्फत वारंवार संपर्क साधण्यात येत आहे. त्यामुळे आता सदर प्रकरण अंतिम सुनावणीसाठी येणे अपेक्षित आहे. आपले अविरत प्रयत्न सुरूच असून या प्रकरणाचा अंतिम निर्णय सर्वोच्च न्यायालयातच होईल. सकारात्मक निकाल लागेल, अशी आशा करूया.

**ब) सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे अंशराशीकरणाची फरकाची रक्कम मिळणे.**
**(रिट याचिका क्र. १६९/२०१६) : न्यायालय याचिका प्रगती :-**

सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना अंशराशीकरणाची फरकाची रक्कम मिळालेली नाही. या प्रश्नी असोसिएशनने मान. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेली आहे. ही याचिका अद्याप सुनावणीसाठी आलेली नाही. असोसिएशनच्या ॲडव्होकेट श्रीम. सांगलीकर यांचेमार्फत पाठपुरावा सुरू आहे.

**८) हयातीचा दाखला :**

अ) हयातीचे दाखले सादर करण्याची मुदत दरवर्षी १ नोव्हेंबर ते ५ मार्चपर्यंत असते. कोविड -२०१९ची महामारी लक्षात घेऊन असोसिएशनने महापालिकेकडे सातत्याने पाठपुरावा करून ही मुदत ५ मार्चपर्यंत वाढवून घेतली आहे. हयातीचे दाखले प्रत्यक्ष पोस्टाद्वारे, कुरिअरद्वारेही सादर करता येतात. अहवाल वर्षात, अनेकांनी हयातीचे दाखले असोसिएशनच्या मदतीने, जीवनप्रमाण प्रणालीद्वारे online पद्धतीने सादर केले आहेत. असोसिएशनने आपल्या स्तरावरून दादर, डोंबिवली, कल्याण, बदलापूर, मुलुंड, चेंबूर, वसई, ठाणे, गोरेगाव, बोरीवली, पुणे, नवी मुंबई, भांडूप इ. शाखांमार्फत अनेक निवृत्तांना हयातीचे दाखले, जीवनप्रमाण प्रणालीद्वारा सादर करण्यासाठी सहाय्य केले आहे. सदर बाबतीत श्री. केळकर, श्री. बधान, श्री. देठे, श्रीम. शिल्पा नाईक, श्री. भोसले, श्री. काशिनाथ पाटील, श्री. तळेले, श्री. चौबळ, श्री. दातार, श्री. करंदीकर, श्री. क्षीरसागर, डॉ. नलावडे, श्री.विजय पोतदार, श्रीम. हटकर, श्री. सुहास खामकर, श्री. मधुकर आंबोणकर, श्रीम. मांजरेकर, श्री. सुरेश सावंत, श्रीम. आचरेकर, श्रीम.रेखा ताम्हाणेकर, श्री. थोरात, श्री. कुवेसकर इत्यादींनी मोलाची भूमिका पार पाडली आहे. या कामी श्रीम. रागिणी गुरव व श्रीम. मनाली गावड यांनी सक्रिय सहभाग दिला आहे.

विशेष म्हणजे जीवनप्रमाण प्रणालीद्वारा Face Recognition System चा उपयोग करून हयातीचे दाखले सादर करण्याचे कामी प्रत्येक विभागातून किमान ५-६ कार्यकर्ते संस्थेने प्रशिक्षित केलेले आहेत.

ऑफलाईन / ऑनलाईन हयातीचे दाखले दि. ०१ नोव्हेंबर ते ५ मार्च या कालावधीतीलच असावेत, याची कृपया नोंद घ्यावी.

दरवर्षीप्रमाणे अहवाल वर्षात, जीवनप्रमाण प्रणालीद्वारा हयातीचे दाखले भरून घेण्याची एक विशेष मोहीम विभागनिहाय राबविण्यात आली. हयातीचे दाखले Online पद्धतीतून यशस्वीपणे सादर केलेल्या सर्व सभासदांनी भविष्यातही याच पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन आहे.

**अहवाल वर्षात असोसिएशनमार्फत Online पद्धतीने सादर केलेल्या हयातीच्या दाखल्याचा तपशील पुढीलप्रमाणे :**

| ठिकाण | जीवनप्रमाण प्रणालीद्वारे दाखले सादर करणाऱ्या सभासदांची संख्या |
|---|---|
| मुलुंड | ६३७ |
| बोरीवली | २२० |
| ठाणे | १५० |
| डोंबिवली | ३६० |
| कल्याण | ११० |
| बदलापूर | १३० |
| वसई | ७४० |
| गोरेगाव | ४७ |
| चेंबूर | १४५ |
| शहर | ३० |
| मध्यवर्ती कार्यालय | ३६१ |
| **एकूण** | **२९३०** |

असोसिएशनच्या वतीने दरवर्षी सर्व शाखांमार्फत जीवनप्रमाण प्रणालीद्वारा हयातीचे दाखले सादर करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाते. वसई विभागातील सभासद दूरवर विखुरले गेले आहेत. त्यांचा विचार करून विभागाने १७ ठिकाणी दाखला सादर करण्याची केंद्रे कार्यरत ठेवली होती, हे विशेष. प्रत्येक सभासदाने स्वतःचा हयातीचा दाखला स्वतःच पाठवावा, अशी संस्थेची अपेक्षा आहे. मात्र यासाठी सर्व विभागीय कार्यकर्त्यांनी सर्व सभासदांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्याची नितांत आवश्यकता आहे.

जीवनप्रमाण प्रणालीद्वारा हयातीचे दाखले सादर करताना पुढील बाबी कटाक्षाने पाळाव्यात, असे आवाहन आहे.

- पेन्शन पेमेंट ऑर्डर क्र. (PPO number)च्या जागी आपला कर्मचारी संकेतांक नमूद करणे अत्यावश्यक आहे. PPO क्र. नमूद करू नये. सॅप संगणकीय प्रणाली इ.सी.नंबर / कर्मचारी संकेतांकावर चालते.
- आधार क्रमांक अचूक नमूद करावा. आधार, पॅन व पेन्शनखाते एकमेकांशी लिंक आहेत, याची खात्री करून घ्यावी.
- आधारकार्ड संलग्नित पॅन कार्ड व बँकेची माहिती : खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी. इ. माहिती अचूक भरावी.

❖ Online पद्धतीने हयातीचा दाखला सादर केल्यानंतर जीवनप्रमाणद्वारे एक पोचपावती त्वरीत प्राप्त होते. या पावती आधारे हयातीच्या दाखल्याची जीवणप्रमाणमधील सद्यस्थिती कळू शकते. अहवाल वर्षात ज्या निवृत्तीवेतन धारकांचे जीवनप्रमाणद्वारे प्राप्त झालेले दाखले महानगरपालिकेच्या SAP संगणकीय प्रणालीत स्वीकारले गेले, त्या सर्व सभासदांना मनपा प्रशासनाने तद्नुसार ई-मेलद्वारे ७२ तासांच्या कालावधीत कळवून, त्यांना चिंतामुक्त केले आहे. या सुविधेसाठी पेन्शनर्स असोसिएशनने सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. सर्व सभासदांनी यापुढे हयातीचे दाखले जीवनप्रमाण प्रणालीद्वारेच सादर करावेत, असे आवाहन आहे. जसे आपण मोबाईलवर सेल्फी काढतो, त्याप्रमाणेच थोडेसे तंत्रज्ञान वापरून Face Recognition System द्वारे निवृत्तीवेतनधारक आता त्यांच्या निवासस्थानातून सुद्धा, स्वतःचे Life Certificate काही मिनिटांत सादर करू शकतो, ही बाब महत्त्वाची असून ते सहजसाध्य होऊ शकते, मात्र त्यासाठी हवी इच्छाशक्ती.

ज्या सभासदांनी Face Recognition System चे तंत्र अवगत करून घेतले आहे. ते त्यांच्या मोबाईलद्वारे, इतर निवृत्तीवेतन धारकांना हयातीचा दाखला सादर करण्यास मदत करू शकतात.

## ब) हयातीचा दाखला सादर केल्यानंतर निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक / सभासद यांनी घ्यावयाची काळजी :

* जीवनप्रमाण प्रणालीद्वारा (online) हयातीचा दाखला सादर केल्यानंतर निवृत्ती वेतन धारकाला, हयातीचा दाखला सादर झाल्याचा एक मेसेज त्यांच्या मोबाईलवर तसेच ई-मेलवर येतो. त्यामध्ये जीवनप्रमाण आय.डी. दिलेला असतो. त्या मेसेजवर क्लिक केल्यास तेथे Praman Id नावाची एक विंडो ओपन होते. तेथे प्रमाण आय.डी. नमूद करावा.

* त्यानंतर तेथे एक confirmation code येतो. तो त्या बॉक्समध्ये टाईप करावा. तो टाईप केल्यानंतर Generate OTP वर click करावे. एक OTP येईल. OTP टाईप करावा व login करावे. login केल्यानंतर To Download Life Certificate वर click करावे. आपणांस आपले Life Certificate प्राप्त होईल. त्या Certificate च्या खाली "This Life Certificate will be subject to acceptance by your Pension Processing Centre Brihanmumbai Municipal Corporation" असे नमूद केलेले असेल.

* वरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पेन्शनधारकांचा असा गैरसमज होतो की, आपला हयातीचा दाखला महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. संस्थेच्या प्रतिनिधींनी संबंधितांना वारंवार बजावलेले असते की, **आपला दाखला महानगरपालिकेने स्वीकारला आहे किंवा नाकारला आहे, असा मेसेज मोबाईलवर तसेच ई-मेलवर पुढील ७२ तासांत येतो.** नाकारला असेल तर का नाकारला आहे, त्याचे स्पष्टीकरणही दिलेले असते. नाकारला असल्यास त्रुटींची पूर्तता करून पुन्हा online दाखला सादर करता येतो.

* **दाखला सादर केल्यानंतर निवृत्तीवेतनधारकाचे पुढील ७२ तासांत मनपाकडून येणाऱ्या मेसेज/ई-मेलवर लक्ष नसते.** त्यामुळे आपला दाखला नाकारल्याचे लक्षात येत नाही.

  परिणामी, यावर्षी १२००० + निवृत्तीवेतनधारकांचे दाखले महानगरपालिकेकडे पोहोचले नाहीत. ज्या निवृत्तीवेतन धारकांचे/कुटुंब निवृत्तीवेतन धारकांचे हयातीचे दाखले स्वीकारले गेले नाहीत, अशा १२८८९ + जणांची माहिती संस्थेने आपल्या वेबसाईटवर प्रकाशित केली होती व तसा संदेश सुद्धा whats app द्वारे सर्वत्र प्रसारित केला होता. एवढे करून सुद्धा कित्येकांनी याची दखल घेतली नाही. परिणामतः त्यांचे पेन्शन रोखले गेले. त्यामुळे त्यांना पुन्हा हयातीच्या दाखल्याचे फॉर्म भरून निवृत्तीवेतन विभागात सादर करावे लागले.

एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते की, संस्थेमार्फत सादर केलेले सर्व दाखले (कांही किरकोळ अपवाद वगळता) प्रशासनाकडून स्वीकारले गेले आहेत. जे संस्थेचे सभासद नाहीत व ज्यांनी परस्पर (Offline/Online) दाखले पाठवले, असे दाखले पेन्शनर्सच्या चुकीच्या माहितीमुळे किंवा प्रशासनाकडून झालेल्या त्रुटींमुळे नाकारले गेले किंवा गहाळ झाले. मात्र पेन्शन नाकारल्याचा राग संस्थेच्या कार्यकर्त्यांवर विनाकारण काढला जातो, हे सर्वस्वी चुकीचे आहे.

**त्यामुळे सर्व पेन्शनधारकांना आवाहन करण्यात येते की, हयातीचा ऑनलाईन दाखला सादर केल्यानंतर पुढील ७२ तास दक्ष राहून मोबाईल / ई-मेलवरील मनपाचे आलेले मेसेजस कृपया काळजीपूर्वक पहावेत. ज्यांनी Offline दाखले पाठवले आहेत त्यांनी ते पोहोचल्याची व स्वीकारल्याची खात्री पेन्शन विभागात आगाऊ जाऊन करावी व पुढील होणारा मनस्ताप टाळावा.**

* आपण सादर केलेला Online दाखला व तो महानगरपालिकेने स्वीकारल्याचा ई-मेल या दोन्हीच्याही Hard Copies काढून कृपया आपल्या दप्तरी ठेवाव्यात, असेही आवाहन आहे.
* कांही सभासद शारीरिक असक्षमतेमुळे बाहेर पडू शकत नाहीत. अशा कांही सभासदांच्या घरी जाऊन तसेच काही सभासदांचे वृद्धाश्रमात जाऊनही हयातीचे दाखले सादर करण्याचे काम कार्यकर्त्यांनी केले आहे. अशा कार्यकर्त्यांचे संस्थेतर्फे अभिनंदन!

## क) Jeevan praman द्वारे स्वतःचा हयातीचा दाखला स्वतःच सादर करा :

प्रत्येक सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने आपला हयातीचा दाखला, स्वतःच सादर करून आत्मनिर्भर व्हावे, ही संस्थेची अपेक्षा आहे. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या मोबाईलवर Jeevan praman हे ॲप डाऊनलोड करून घ्यावे. त्यासाठी पुढील कार्यपद्धती अवलंबावी.

१. Play store मधून Aadhar face rd हे install करावे.
२. नंतर Play store मधून, Jeevan praman App install करावे.
३. Jeevan praman App वर click केल्यावर खालील माहिती open होते.
४. त्यात विचारलेली सर्व माहिती भरावी.
उदाः आधारकार्ड नंबर, मोबाईल नंबर, मेल आयडी, बँक खात्याचा तपशील, इ.
५. आधारकार्डप्रमाणे संपूर्ण नांव :
६. Pension Disbursing Agency म्हणून Municipal Corporation हा Option घ्यावा.
७. नंतर पुन्हा Municipal Corporation of Greater Mumbai हा Option घ्यावा.
८. त्यानंतर मध्ये एखादा OTP लागेल. तो मोबाईलवर येईल, नमूद करावा.
९. एक दोनदा Consent चा Option येईल. I agree च्या ठिकाणी टिक (✔)करून consent द्यावी.
१०. नंतर संपूर्ण माहिती एका Format मध्ये दिसेल. ती Confirm करा.
११. चेहरा Scan करण्यासाठी एक Window येईल.. तिथे फोटो/चेहरा Scan करा.. तिथे कदाचित थोडा वेळ लागतो. पण त्यानंतर होते. Scanning प्रक्रिया सुरू असताना डोळ्यांच्या पापण्यांची सतत हालचाल करण्याची आवश्यकता असते, याची नोंद घ्यावी.
१२. Scan process पूर्ण झाल्यावर Successfully scan असा मेसेज येईल. अशा तऱ्हेने Life Certificate generate होईल. नंतर एक लिंक येईल. त्यात Jeevan praman ID असलेला आपला फोटो व इतर माहिती येईल.

नंतर त्याच दिवशी किंवा २-३ दिवसांनी (७२ तासांचे आत) आपण दिलेल्या मेलवर / मोबाईलवर Life Certificate accepted असा मेसेज येईल व ही प्रक्रिया पूर्ण होईल.

**महत्त्वाची सूचना :** हयातीचा दाखला सादर केल्यानंतर पुढील ७२ तासांत, दाखला ''स्वीकारण्यात आला'' किंवा ''नाकारण्यात आला'' असा मेसेज प्रशासनातर्फे भ्रमणध्वनीवर / ई-मेलवर पाठवला जातो. हा मेसेज काळजीपूर्वक पहावा. दाखला नाकारला असल्यास तो का नाकारला आहे, हे सकारण कळवले जाते. ती त्रुटी प्र. लेखापाल (को.) कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन कागदपत्राधारे दुरुस्त करुन घेतल्यावर दाखला पुन्हा सादर करावा.

## ९) संस्थेची वेबसाईट (www.bmpa.co.in)

वय, विविध आजार, यामुळे आपली संस्था व निवृत्तीवेतनधारक, यांच्यातील संपर्क, अवघड होत आहे. त्यामुळे संपर्क, मार्गदर्शन, परस्पर सहकार्य सुकर व्हावे, यासाठी संस्थेने स्वतःची वेबसाईट दि. १२ नोव्हेंबर, २०२२ पासून सुरू केलेली आहे. या वेबसाईटमध्ये संस्था व निवृत्तीवेतनधारकांशी संबंधित इत्यंभूत माहिती देण्यात आलेली आहे. सभासदांनी या वेबसाईटला जरूर भेट देऊन घरबसल्या आपल्या समस्यांची सोडवणूक करावी. वेबसाईटमध्ये पुढील महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश आहे.

* निवृत्तीवेतन विषयक आवश्यक सर्व माहिती, परिपत्रके, काही अर्जांचे मसूदे, जोडपत्रे इ.
* बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनची माहिती, पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य यांची नावे, संपर्क क्रमांक, मार्गदर्शक मंडळ – संकल्पना – सभासद.
* बृहन्मुंबई पेन्शनर्स असोसिएशनद्वारे संचालित वैद्यकीय सहाय्य योजनेची माहिती.
* पेन्शन अदालतीविषयी माहिती.
* मासिक निवृत्तीवेतन, मृत्यू नी सेवा उपदान (DCRG), निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण (Commutation), कुटुंब निवृत्ती वेतन, इ. आवश्यक माहिती.
* संमेलन सोहळ्यांची क्षणचित्रे.
* कार्यकारिणीच्या सदस्य पदाच्या निवडणुकीविषयीची माहिती, हयातीचे दाखले न स्वीकारलेल्या सभासदांची यादी.
* असोसिएशनची संपर्कासाठी व्यवस्था.
* संस्थेचे सभासदत्व घरबसल्या प्राप्त करण्यासाठी अर्ज नमुना उपलब्ध केला आहे. वर्गणी (Cash/Net Banking/QR code) इत्यादी माध्यमातून देता येते.
* विविध अत्यावश्यक अर्जांचे नमुने (वैद्यकीय सहाय्य/बँकेद्वारा पेन्शन/कुटुंब निवृत्ती वेतन/दुय्यम सेवा पुस्तिका, हयातीचा दाखला/माहिती अधिकार अधिनियम, २००५, पेन्शन स्लिप, निवृत्ती वेतन थांबवणे, पेन्शन दावा दुय्यम प्रत, इ.)

गरजेनुसार वेळोवेळी या माहितीत वाढ, सुधारणा करण्यात येऊन माहिती अद्ययावत करण्यात येते. आजपर्यंत सुमारे २१०३ सभासद व इतरांनी संस्थेच्या संकेतस्थळाला भेट दिलेली आहे. सभासद संख्या व पेन्शनर्सच्या संख्येच्या तुलनेत ही संख्या नगण्य आहे.

संकेतस्थळाला जास्तीत जास्त सभासदांनी भेट देऊन घरबसल्या संस्थेला जाणून घ्यावे, अशी अपेक्षा आहे.

## १०) पेन्शन अदालत :

संस्थेच्या कार्यालयात अनेक सभासदांच्या निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन व इतर विषयांच्या तक्रारी सातत्याने येत असतात. अशा तक्रारी निवृत्तीवेतन विभागाकडे सादर करून त्या तक्रारी सोडवण्यासाठी असोसिएशनने पेन्शन अदालतींच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत. तसेच कांही अदालती खाते प्रशासनामार्फत आयोजित केल्या जातात. त्या अदालतीसाठी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित राहून समस्या निवारणासाठी प्रशासनाशी चर्चा करून प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रयत्न करीत असतात. अहवाल वर्षात आयोजित केलेल्या पेन्शन अदालतींचा गोषवारा पुढीलप्रमाणे :

### १) करनिर्धारण आणि संकलन :

करनिर्धारण आणि संकलन खात्याच्या सह प्रमुख कर्मचारी अधिकारी, श्रीम. भाग्यश्री वर्तक यांच्या अध्यक्षतेखाली, दिनांक २१ मे २०२५ रोजी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सकाळी ११:०० वाजता पेन्शन अदालत संपन्न झाली. सदर सभेला संस्थेच्या वतीने श्रीम. प्रतिमा पवार (संयुक्त कार्यवाह), श्री. नामदेव थोरात, श्री. सुहास खामकर हे कार्यकारिणी सदस्य हजर होते. सदर सभेत दहा तक्रारदारांचे अर्ज सादर केले गेले. तीन कर्मचारी स्वतः अर्ज घेऊन हजर होते. त्यावेळी संबंधित लिपिकाला त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याने त्यांच्या तक्रारींचा निपटारा झाला.

सदर खात्यातील अन्य निवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर देय असलेला प्रवास सहाय्य भत्ता दिला जात नव्हता. त्याबाबत डिपार्टमेंटशी चर्चा करून HR सिस्टममध्ये कोणत्या दुरुस्त्या करण्यात याव्यात, याबाबत संबंधित लिपिकाशी चर्चा केल्यानंतर निवृत्तीवेतनधारकास प्रवास सहाय्य भत्ता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

श्रीम. वर्तक यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे ही अदालत सुरळीतपणे पार पडली. त्यांनी असोसिएशनचे आभार मानून प्रशासकीय टीमचे कौतुक केले. बाकी तक्रारींचे त्यांच्या स्तरावर निराकरण करण्यात येईल, असे सांगितले व अदालत संपल्याचे जाहीर केले.

### २) मुंबई अग्निशमन दल विभाग :

दिनांक २९ मे २०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या माध्यमातून मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्या दालनात सेवानिवृत्त अग्निशमन कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या तक्रारींसंदर्भात बैठक सौहार्दपूर्ण व सकारात्मक वातावरणात पार पडली. या बैठकीस असोसिएशनचे पदाधिकारी श्री. शरद कुवेसकर, श्री. सतीश आवटे आणि श्रीम. अनुजा आचरेकर हे उपस्थित होते.

बैठकीदरम्यान प्रशासन व पेन्शनर्स असोसिएशन यांच्यात समन्वयपूर्ण व विधायक चर्चा झाली. बहुतांश कर्मचाऱ्यांचे पेन्शन दावे सादर करण्यात आले असून, अनेक प्रकरणांचे निवारण झाल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. तसेच, उर्वरित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका दर्शविण्यात आली.

तथापि, काही प्रकरणांमध्ये अद्याप विलंब होत असल्यामुळे निवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष असल्याचे नमूद करण्यात आले आणि त्यावर तांतडीने कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली. प्रशासनानेही उपलब्ध संसाधनांच्या मर्यादेत सर्व प्रकरणे शक्य तितक्या लवकर निकाली काढण्याचे आश्वासन दिले.

मुख्य निर्णयांनुसार, गणवेशाच्या रकमेचा परतावा, घरभाडे कपातीचा परतावा, पदक भत्ता सुरू करणे, काल्पनिक वेतनवाढ लागू करणे, तसेच इतर प्रलंबित देणी निकाली काढण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याची माहिती देण्यात आली. आवश्यक त्या प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचाऱ्यांकडून माहिती व कागदपत्रे सुद्धा मागविण्यात आली आहेत.

एकूणच, प्रशासन व पेन्शनर्स असोसिएशन यांच्यात सकारात्मक व सहकार्याचे वातावरण असून, प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी दोन्ही बाजूंनी प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट झाले. पुढील आढावा बैठक लवकरच अग्निशमन दल प्रशासनाकडून आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती पेन्शनर्स असोसिएशनचे सदस्य श्री. शरद कुवेसकर यांनी दिली आहे.

**३) शिक्षण विभाग :**

मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांवर चर्चा करून मार्ग काढण्यासाठी एक विशेष पेन्शन अदालत डॉ. मारुती नलावडे यांचे प्रयत्नांतून माननीय उपशिक्षणाधिकारी श्री. कीर्तीवर्धन किरीतकुडवे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या विशेष अदालतीमध्ये संस्थेतर्फे माननीय अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर, कार्यवाह डॉ. मारुती नलावडे यांचेसह श्रीम. नीता मांजरेकर, श्रीम. अनुजा आचरेकर, श्रीम. शिल्पा नाईक, श्री. चंद्रकांत तळेले, श्री. वाळुंज, श्री. सुधीर शिशुपाल, इ. कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

सदर अदालतीमध्ये संस्थेने पाठवलेल्या एकूण ४० तक्रारींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या तक्रारींचा गोषवारा पुढीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | बीएड वेतन श्रेणी अप्राप्त | : ०४ |
| २) | सातवा वेतन आयोग थकबाकी | : ०२ |
| ३) | निवडश्रेणी अप्राप्त | : ०५ |
| ४) | कुटुंब निवृत्तीवेतन प्रलंबित | : ०५ |
| ५) | काल्पनिक वेतनवाढ प्रलंबित | : ०९ |
| ६) | सुधारित वेतनानुसार निवृत्तीवेतन नाही | : ०४ |
| ७) | मृत्यूनंतरची रक्कम अप्राप्त | : ०१ |
| ८) | पूर्वानुभवी शिक्षक फायदा प्रलंबित | : ०२ |
| ९) | प्रभारी भत्ता अप्राप्त | : ०१ |
| १०) | रजा रोखीकरण प्रलंबित | : ०३ |
| ११) | सेवा काळातील पगार अप्राप्त | : ०१ |
| १२) | निवृत्तीवेतन सुरू नाही | : ०२ |
| १३) | मूळ पेन्शन दाव्याच्या प्रती मिळणे | : ०१ |

सांगण्यास आनंद वाटतो की, उपरोक्त सर्व प्रकरणांचा निपटारा लवकरात लवकर करण्याचे आश्वासन प्रशासनाकडून मिळालेले आहे. यातील अनेक प्रकरणे निकाली निघालेली आहेत.

समारोप प्रसंगी माननीय अध्यक्षांनी उपस्थित सर्व अधिकाऱ्यांकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या व त्यास प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे.

शेवटी कार्यवाह यांनी उपायुक्त शिक्षण, शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, उपस्थित सर्व प्रशासकीय अधिकारी, या सर्वांचे संस्थेच्या वतीने आभार मानले व किमान सहा महिन्यातून एकदा विशेष अदालतीचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. अदालतीस उपस्थित राहिलेल्या सर्व संस्था प्रतिनिधींचे, अध्यक्षांचे संस्थेतर्फे हार्दिक आभार.

### ४) करनिर्धारण आणि संकलन :

दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ०२:३० वाजता सह प्रमुख कर्मचारी अधिकारी श्रीम. स्नेहा जोशी यांच्या अध्यक्षतेखाली करनिर्धारण व संकलन खात्याची अदालत पुन्हा एकदा संपन्न झाली. सदर सभेला संस्थेच्या वतीने श्रीम. प्रतिमा पवार संयुक्त कार्यवाह, श्री. नामदेव थोरात व श्री. सुहास खामकर हे हजर होते. बैठकीच्या प्रारंभी दि. २१.०५.२०२५ रोजी झालेल्या मुद्द्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रलंबित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करून संबंधित समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर पुढील तक्रारींचा आढावा घेण्यास सुरुवात झाली. सदर सभेत बारा निवृत्ती वेतनधारकांचे अर्ज प्राप्त झाले होते. श्री. सत्यवान गोसावी यांनी मागणी केलेली वेतनवाढ देय नसल्याचे त्यांना कळविण्यात आले.

इतर तक्रारदारांचे प्रश्न तात्काळ निकाली काढण्यासाठी आदेश देण्यात आले. ज्यांचे अधिदान देय आहे, त्यांचे अधिदान त्वरित करण्यासाठी कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले. उपस्थितांचे आभार मानून सभा संपली असे जाहीर करण्यात आले.

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी सकाळी ११ वा. प्रमुख लेखापाल (कोषागार), निवृत्तीवेतन विभाग, म.न.पा. मुख्यालय, विस्तारित इमारत, १ ला मजला, महापालिका मार्ग, मुंबई-४००००१ येथे पेन्शन अदालत होते. या अदालतीत संस्थेचे प्रतिनिधी, निवृत्त कर्मचारी / सभासद यांच्या तक्रारी मांडून त्या सोडविण्याचा प्रयत्न करत असतात.

### ११) तक्रार निवारण :

निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांचेकडून विविध प्रकारच्या तक्रारी / समस्या संस्थेकडे प्राप्त होत असतात. तसेच अनेक सभासद आपल्या पेन्शनविषयक तक्रारींचे मार्गदर्शन घेण्यासाठी कार्यालयात येऊन मार्गदर्शन घेत असतात. सर्व प्रकारच्या तक्रारींचे सभासदांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित आस्थापना / निवृत्तीवेतन विभाग यांच्याकडे प्रत्यक्ष जाऊन त्या तक्रारींची सोडवणूक करणे, पेन्शन अदालतीत उपस्थित राहून तक्रारींच्या सोडवणुकीविषयी योग्य ती उपाययोजना करणे, इत्यादी गोष्टींसाठी असोसिएशनचे पुढील पदाधिकारी अथक परिश्रम घेत असतात.

| | |
|---|---|
| १) श्रीम. प्रतिमा पवार (संयुक्त कार्यवाह) | : ९९८७७७९९५७ |
| २) श्रीम. नीता मांजरेकर (संयुक्त कार्यवाह) | : ९६५३३२८७५६ |
| ३) श्री. शिवराम अतकरी (संयुक्त कार्यवाह) | : ९८९२९१६३३४ |
| ४) श्री. चंद्रकांत तळेले (कार्यकारिणी सदस्य) | : ९८८७२७३०२० |
| ५) श्री. शरद कुवेसकर (कार्यकारिणी सदस्य) | : ९८६९४६४५४४ |
| ६) श्रीम. अनुजा आचरेकर (कार्यकारिणी सदस्य) | : ९८३३१९२८२१ |
| ७) श्रीम. शारदा काकडे (कार्यकारिणी सदस्य) | : ९८१९०९८०८० |
| ८) श्रीम. सुश्मिता चिकोर्डे (कार्यकारिणी सदस्य) | : ९३२४७९७३१० |
| ९) श्रीम. मेरी डि'मेलो (कार्यकारिणी सदस्य) | : ९९६०६७४८२९ |

सदर समितीद्वारा संस्थेचे सभासद/निवृत्त कर्मचारी यांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मार्गदर्शन व सहकार्य केले जाते. (उदा. प्रलंबित पेन्शन दावे मंजूर करून घेणे, दावे तयार करण्यास पेन्शन विभागास सहाय्य करणे, कुटुंब निवृत्ती वेतन, सुधारित निवृत्तवेतन मंजूर करून घेणे, बंद झालेली पेन्शन सुरू करणे, वारसाच्या नावाची नोंद करणे, कमी मिळत असलेल्या पेन्शनमध्ये नियमानुसार वाढ करून घेणे, ८०+ वर्षांवरील सभासदांच्या पेन्शनमध्ये वाढ करुन घेणे, पी. टी. केस करण्यास मदत करणे, इ.).

सदर प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी आवश्यकतेनुसार वरील सदस्य तसेच संस्था अध्यक्ष, कार्यवाह संबंधित विभाग/ निवृत्तीवेतन विभाग येथे जाऊन संबंधित कर्मचारी /अधिकारी यांच्याशी चर्चा करून समस्या लवकरात लवकर सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. अहवाल वर्षात संस्थेकडे अनेक प्रकरणे आलेली होती. त्यापैकी अत्यंत क्लिष्ट व दीर्घकाळ प्रलंबित राहिलेली प्रकरणे निकाली काढली गेली. त्यापैकी कांही वानगीदाखल ठळक यशोगाथा पुढीलप्रमाणे :

१) श्री. रमेशचंद्र चव्हाण, EC–३१९२९१५, सभासद क्र.–२३२९९, प्रशिक्षक, मृत्यू दिनांक ०६.०४.२०२४. एक वर्ष उलटूनही कुटुंब निवृत्तीवेतन सुरू झाले नव्हते. संस्थेचे कार्यवाह डॉ. मारुती नलावडे आणि अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर यांच्या प्रयत्नाने कुटुंब निवृत्तीवेतन सुरू झाले.

२) श्री. रवींद्र दातार, EC–२५३५१६८, सभासद क्र.२६९२५, मृत्यू दिनांक १९.०५.२०२५. उचित मार्गदर्शन आणि पाठपुरावा करुन डिसेंबर २०२५ पासून श्रीम. शोभना दातार यांना कुटुंब निवृत्तीवेतन सुरू झाले. थकबाकी रु. ९५,५००/– मिळाले.

३) कै. श्री. अरविंद मादुस्कर, EC–१३३८०६१, सभासद क्र. २६८९७, मृत्यू दिनांक ०८.०६.२०२५, १ डिसेंबर २०२५ पासून श्रीम. विनता अरविंद मादुस्कर यांना कुटुंब निवृत्तीवेतन सुरू करण्यात आले.

४) श्रीम. स्नेहलता बेकनाळकर, EC–२७५४०३, सभासद क्र. २६९०१, यांना दि. ०१.१२.२०२५ पासून कुटुंब निवृत्तीवेतन सुरू झाले. थकबाकी रु. १,५४,११५/– मासिक कुटुंब निवृत्तीवेतन रु. ३७,१५०/–

उपरोक्त क्र. २ ते ४ ही प्रकरणे निकाली काढण्यात श्रीम. मांजरेकर व श्रीम. आचरेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

५) श्री. अनंत रघुनाथ काकडे, EC– ३५९६०६९, निवृत्ती दिनांक ३१.०७.२०२१, निवृत्ती वेतनधारकास थकबाकीसह सर्व रक्कम रु. ५१,४५,५७४/– जाने. २०२६ मध्ये मिळवून देण्यात आली.

६) श्री. दिलीप सोपान जगदाळे, EC–१२२२८८२, सभासद क्र. २७१२८, खात्यांतर्गत चौकशीमुळे विलंब झाला होता. संस्थेच्या प्रयत्नाने त्यांना थकबाकीसह निवृत्तीवेतन सुरू झाले. रु.४३,६०,०००/– इतकी रक्कम त्यांना दि.०१.०२.२०२६ रोजी मिळाली.

७) श्रीम. विजया कुलकर्णी, EC–३११६००९, सभासद क्र. २६५४६ (कुटुंब निवृत्ती वेतनात सुधारित वेतनानुसार वेतनवाढ मिळवून दिली. दि. ०१.१२.२०२५ रोजी रु. ३,४०,०००/– इतकी रक्कम मिळाली.

उपरोक्त क्र. ५ ते ६ ही प्रकरणे श्री. अतकरी यांनी धसास लावली आहेत.

उपरोक्त ठोस, उदाहरणांव्यतिरिक्त अशी अनेक प्रकरणे संस्थेमार्फत धसास लावलेली आहेत. अशा प्रकारच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व संबंधित पदाधिकाऱ्यांचे / कार्यकर्त्यांचे संस्थेतर्फे हार्दिक आभार!

सर्व सभासद / निवृत्त कर्मचारी यांना आवाहन करण्यात येते की, आपल्या काही समस्या असल्यास त्यांचे निराकरण करून घेण्यासाठी उपरोक्त नमूद केलेल्या तक्रार निवारण कार्यकर्ते / पदाधिकारी यांचेशी अवश्य संपर्क साधावा.

**तक्रार निवारण कार्यकर्त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व कार्यकर्ते / पदाधिकारी यांचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा.**

सभासदांना आवाहन करण्यात येते की, आपल्या कांही समस्या असल्यास, त्या वरील प्रतिनिधींशी संपर्क करून सोडवून घ्याव्यात. या तक्रार निवारण सोयीची स्वतंत्र सुविधा मुलुंड, डोंबिवली, बोरीवली, तसेच वसई विभाग केंद्रात उपलब्ध आहे.

## १२) विभागीय वृत्त : संक्षिप्त अहवाल

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनचे हे वर्षही विविध उपक्रम व गुणांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरले. शाखांची गाजलेली प्रबोधनात्मक व मनोरंजनात्मक संमेलने, आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्तचे मेळावे, हे त्यातील कांही प्रमुख घटक होत. संक्षिप्त अहवाल या विभागात आपणास या सर्व गोष्टींची क्षणचित्रे फोटोसह वाचावयास मिळतील. संस्थेस अभिमान वाटावा, असाच हा संक्षिप्त अहवाल आहे. याबाबत संस्था स्वतःस गौरवशाली समजत असून सर्व १० शाखेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, देणगीदार व सर्व सभासदांचे संस्था आभार मानत आहे व सर्व १० शाखांच्या कार्यकर्त्यांच्या चमूला शाबासकी देत आहे.

**''केल्याने होत आहे रे''** हाच संदेश यातून सर्वांना मिळत आहे.

मुंबई शहर, गोरेगाव, बोरीवली, वसई, चेंबूर, मुलुंड, ठाणे, डोंबिवली, कल्याण, बदलापूर, अशा १० विभागीय शाखांमार्फत सभासदांसाठी अहवाल वर्षात विविध कार्यक्रम/उपक्रम/व्याख्याने, संमेलने, इ. गोष्टींचे आयोजन करण्यात आले. विभागनिहाय वृत्ताचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे :

### १२.०१ : शहर विभाग

१५ ऑगस्ट २०२४ रोजी स्थापन झालेल्या या विभागाने आयोजित केलेले उपक्रम पुढीलप्रमाणे.

१. **मासिक सभा** :– या वर्षी या विभागाच्या ५ मासिक सभा झाल्या. या सभा सोयीनुसार विविध ठिकाणी, कधी कार्यकर्त्यांच्या घरीही घेण्यात आल्या. वर्षभर करावयाच्या कामाचे नियोजन व तक्रारींचा आढावा घेण्याचे काम या सभांतून करण्यात आले.

२. **उतारवयातील विस्मरण** :– दिनांक १०.०९. २०२५ रोजी 'उतारवयातील विस्मरण' ही कार्यशाळा घेण्यात आली. ही कार्यशाळा 'डी' विभाग कार्यालय, नानाचौक, ग्रँट रोड येथे घेण्यात आली. श्री. अजित कदम यांनी ४५ मिनिटांच्या सादरी करणात या विषयाचे महत्त्व पटवून दिले. मुद्देसूद विचारांसह खुसखुशीत शैलीत त्यांनी श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेतला. अल्झायमर म्हणजे काय? त्याची लक्षणे, आजार लांबविण्यासाठीचे उपाय, दैनंदिन काळजी यांची माहिती दिली. श्रोत्यांच्या प्रश्नांनाही सहजसुंदर भाषेत उत्तरे दिली. या वेळी संयुक्त कार्यवाह श्रीम. प्रतिमा पवार यांनी संस्थेची माहिती दिली.

३. **नवरात्रौत्सव–स्त्री शक्तीचा जागर** :– दि. २७.०९.२०२५ रोजी 'डी' विभाग कार्यालय, नाना चौक, ग्रँट रोड येथील सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहर विभागातील ४२ महिला या कार्यक्रमास उपस्थित होत्या. डॉ. संगीता हसनाळे, माजी उपायुक्त, परिमंडळ–I आणि डॉ. मंगला गोमारे, माजी कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक आरोग्य खाते यांची विशेष उपस्थिती होती. आदिशक्तीची पूजा, स्तोत्र, गाणी, गरबा, नृत्य, विविध प्रकारचा प्रसाद अशी कार्यक्रमात विविधता होती. श्रीम. अनुजा आचरेकर यांनी लकी ड्रॉ द्वारे दोघींची खणा नारळाने ओटी भरली व इतर महिलांना सरस्वती प्रतिमा भेट देऊन त्यांचाही सन्मान केला. डॉ. संगीता हसनाळे व संयुक्त कार्यवाह श्रीम. नीता मांजरेकर, श्रीम. प्रतिमा पवार यांनी महिलांशी संवाद साधला. संयुक्त कार्यवाह, श्रीम. नीता मांजरेकर, सदस्या श्रीम. नीलिमा जवंजाळ, श्रीम. सुमिता चिकोर्डे – यांचीही उपस्थिती होती.

शहर विभागाच्या सर्व उपक्रमात शहर कार्यकारिणी पदाधिकारी, श्री. शरद कुवेसकर, श्री. सतीश आवटे, श्री. नामदेव थोरात, श्री. सुधीर शिशुपाल, श्रीम. प्रतिमा पवार, श्रीम. अनुजा आचरेकर या सर्वांचे सतत सहकार्य मिळत असते.

४. **सभासद नोंदणी** :– या वर्षी वरील दोन उपक्रमांमधून सुमारे २५ ते ३० सभासदांची नोंदणी झाली.

५. **हयातीचे दाखले :– हयातीचे दाखले** ऑनलाईन सादर करण्यासाठी दोन वेळा विविध केंद्रांवर कार्यकर्त्यांनी सहयोग दिला होता. परंतु या उपक्रमास फारसा सहभाग दिसला नाही. फक्त १५ ते २० जणांचे प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यात आले.

६. **संपर्क समिती :–** विभागातील सभासदांनी आपल्या समस्या सोडवण्यासाठी कृपया खालील प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| १) श्रीम. प्रतिमा पवार | : ९९८७७७९९५७ |
| २) श्री. अनुजा आचरेकर | : ९८३३१९२८२१ |
| ३) श्री. सतीश आवटे | : ९८६७७२०३२५ |
| ४) श्री. सुधीर शिशुपाल | : ९८९२१९०८०५ |
| ५) श्री. शरद कुवेसकर | : ९८६९४६४५४४ |
| ६) श्री. नामदेव थोरात | : ९३२२२३८७२० |

## १२.०२ : गोरेगाव विभाग

दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या गोरेगाव शाखेच्या द्वितीय वर्षाची वाटचाल व उपक्रम पुढीलप्रमाणे :

१) **'शुभ्रपरी' :–** दिनांक १९.०७.२०२५ रोजी दुपारी ०२:०० ते ०४:०० या वेळेत पी–दक्षिण विभाग कार्यालयातील सभागृहात श्रीम. अनुजा रानडे यांचे 'शुभ्रपरी' हे त्यांच्या नर्सिंग जीवनावरील आधारित सुंदर व्याख्यान आयोजित केले होते. शिक्षण, प्रशिक्षण ते परिचारिका असा दीर्घ तसेच खडतर आव्हानात्मक प्रवास व प्रत्येक क्षणी दक्ष कसे रहावे, याविषयीचा एक वेगळा अनुभव ऐकण्याचा लाभ २५+ सदस्यांनी घेतला.

याच दिवशी कार्यक्रमापूर्वी व नंतर सभासदांच्या सर्व तक्रारी नोंदवून घेतल्या गेल्या व नंतर त्याचे निराकरण केले. तसेच जुलै महिन्यात ज्या सभासदांचे वाढदिवस होते. त्यांचा गुलाबपुष्प व कॅडबरी देऊन सन्मान करण्यात आला.

२) **'केशवसृष्टी सहल' :–** दिनांक २०.०९.२०२५ रोजी 'केशवसृष्टी' उत्तन, भाईंदर येथे मनोरंजनात्मक सहल आयोजित करण्यात आली होती. एकूण ३० सभासदांनी उस्फूर्त प्रतिसाद देत सहलीचा आनंद घेतला.

श्री. पुरंदरे यांनी प्रार्थनेने सुरुवात केली. त्यानंतर चहापान व केशवसृष्टीच्या उपक्रमांची डॉक्युमेंटरी फिल्म पाहून मार्गदर्शकांसमवेत फेरफटका मारला. टाकाऊ प्लास्टिकपासून उपयुक्त वस्तू बनविण्याच्या कार्यशाळेला भेट दिली. परिसरातील औषधी झाडे, वनस्पती यांच्या वैद्यकीय उपयुक्ततेसंबंधी मार्गदर्शकाने माहिती दिली. त्यानंतर गोशाळा तसेच रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीला भेट देऊन सहलीची सांगता झाली.

३) **कोजागिरी पौर्णिमा व सायकल प्रवास अनुभव :–** दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी गोरेगाव शाखेतर्फे विभागीय कार्यालयात दुपारी २:३० ते ५:३० या वेळेत, जागतिक विक्रम केलेले सायकलीस्ट श्री. सतीश जाधव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांचे सेवानिवृत्तीनंतरचे कैलास मानसरोवर, लेहलडाख, उमलिंगला, नर्मदा परिक्रमा, अयोध्या, पंढरपूर, मुंबई ते कन्याकुमारी इ. ठिकाणी सायकलने प्रवास करताना आलेले चित्तथरारक अनुभव ऐकताना एक वेगळा आनंद सभासदांनी अनुभवला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर आवर्जून उपस्थित होते. त्यांनीही त्यांच्या चिरंजीवांचे सायकलिंगचे अनुभव मार्मिक शैलीत सांगून कार्यक्रमावर कळस चढवला.

या कार्यक्रमानंतर कोजागिरी पौर्णिमा साजरी करत उपमा व मसाले दुधाचा आस्वाद घेत स्थानिक सभासदांनी गाणी व कवितांचा आनंद घेतला.

४) **दीपोत्सव** :– दिनांक १८ ऑक्टोबर, २०२५ रोजी संध्याकाळी ७:३० ते ८:३० या वेळेत 'अश्वस्थ हनुमान मंदिर, बेस्ट नगर, गोरेगाव (प.)' येथे दीपोत्सवाचा कार्यक्रम दीपदानाने संपन्न झाला. अश्वस्थ हनुमान मंदिरामध्ये प्रज्वलित केलेल्या दीपमाळेच्या प्रकाशाने आसमंत तसेच उपस्थित सभासदांचे चेहरेही उजळून गेले होते.

५) **ऑनलाइन हयातीचे दाखले** :– शाखेतर्फे ऑनलाईन पद्धतीने हयातीचे दाखले सादर करण्याचा कार्यक्रम पी/दक्षिण विभाग कार्यालयातील सभागृहात दि. ०८.११.२०२६ रोजी पार पडला. ४७ सभासदांनी याचा लाभ घेतला. यावेळी ११ नवीन सभासदांनी आपली नावे नोंदवली.

६) **स्नेहसंमेलन** :– गोरेगाव शाखेचे दुसरे स्नेहसंमेलन दिनांक २८ मार्च, २०२६ रोजी कै. केशव गोरे स्मारक सभागृह येथे संपन्न झाले. याच दिवशी संस्थेचे जेष्ठ सभासद श्री. नारायण सावंत (वय वर्षे १००) यांच्या शतायुषी क्षणांचे औचित्य साधून संस्थेतर्फे त्यांचा सन्मानपत्र देऊन यथोचित सन्मान केला गेला. त्यांना १००% निवृत्ती वेतनवाढ मिळवून देण्याचे काम श्रीम. नीता मांजरेकर, संयुक्त कार्यवाह यांनी विनाविलंब केले. त्यांना मे २०२६ पासून वाढीव निवृत्ती वेतन सुरू झाले आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मान. श्री. अरुण जाधव साहेब, प्रमुख लेखापाल (वित्त), बृहन्मुंबई महानगरपालिका, बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष मान. श्री. कमलाकर क्षीरसागर, कार्यवाह डॉ. मारुती नलावडे, उपाध्यक्ष श्री. अनंत पाटील तसेच कार्यकारिणी सदस्य व ८० गोरेगांवकर सभासद उपस्थित होते.

मान्यवरांचा परिचय व स्वागतानंतर स्नेहसंमेलनाचे आकर्षण असलेले शतायुषी माननीय श्री. नारायण रामचंद्र सावंत (सेवानिवृत्त प्र. अ) यांचा प्रमुख लेखापाल (वित्त) श्री. अरुण जाधव यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, तुळशीचे रोप, मिठाई, पुष्पगुच्छासोबतच सन्मानपत्र प्रदान करून सन्मान करण्यात आला. हा क्षण अत्यंत भावनिक व प्रेरणादायी ठरला.

यानंतर गोरेगाव विभागाच्या व संस्थेच्या संयुक्त कार्यवाह श्रीम. नीता मांजरेकर यांना जागतिक महिला दिनानिमित्त प्रियदर्शनी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रमुख लेखापाल (वित्त) श्री. अरुण जाधव यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

मान्यवरांच्या मनोगतात संस्थेचे अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर, उपाध्यक्ष श्री. अनंत पाटील, कार्यवाह डॉ. मारुती नलावडे तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख लेखापाल (वित्त) श्री. अरुण जाधव यांनी शतायुषी व्यक्तीच्या आयुष्यातील दुर्मिळ सोहळा अनुभवायला मिळाल्याचा उल्लेख केला. श्री. सावंत यांच्या शतायुषी जीवनाचे कंगोरे डॉ. नलावडे यांनी उलगडून दाखवले. या प्रसंगी उपस्थितांचे तोंड गोड करतानाच श्री. ना. दा. सावंत यांनी संस्थेस रु.२१०००/– चा निधी समर्पित केला.

स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातही सभासदांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात श्रीम. अक्षदा विचारे यांचा 'गीत सुगंध' हा मराठी गाण्याचा सुमधुर कार्यक्रम संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अजित कदम व श्री संजय भातखंडे यांनी तर समारोप श्री. विनायक रेगे यांनी केला. सुंदर रांगोळी श्रीम. नीलिमा जवंजाळ, श्रीम. देविका सरमळकर, श्रीम. छाया सातारकर यांनी रेखाटली होती. या कार्यक्रमात तुळशीची ७५ रोपे श्री. श्रीराम जोशी यांच्यातर्फे तर पुरणपोळी श्री. नारायण सावंत यांच्यातर्फे वाटण्यात आली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीम. मांजरेकर, श्री. श्रीराम जोशी, श्री. आनंद पुरंदरे, श्री. विनायक रेगे, श्री. अजित कदम, श्री. संजय भातखंडे, श्री. संजय मोरे यांनी अथक परिश्रम घेतले.

७) **संपर्क समिती :–** आपल्या समस्या सोडविण्यासाठी विभागातील सभासदांनी कृपया खालील प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

१) श्रीम. नीता मांजरेकर : ९६५३३२८७५६
२) श्री. श्रीराम जोशी : ९८६९६५८४२२
३) श्रीम. नीलिमा जंवजाळ : ९१३७१७६३९८
४) श्रीम. स्वरदा दाते : ९८२११९३५२०
५) श्रीम. देविका सरमळकर : ९७५७३५०५५७
६) श्री. अजित कदम : ९३७२३८५३४१

## १२.०३ : बोरीवली विभाग

अहवाल वर्षात बोरीवली विभागात आयोजित केलेल्या उपक्रमांचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे :

१) **ऑनलाईन हयातीचे दाखले सादर करणे :–** जीवन प्रमाण प्रणालीअंतर्गत हयातीचे दाखले सादर करणे, या उपक्रमाची माहिती असणाऱ्या विभागातील दोन सभासदांनी शाखेत येणाऱ्या प्रत्येक सभासदाला त्यांच्याच मोबाईलवरून प्ले स्टोअरमध्ये जाऊन दाखला काढण्याची माहिती दिली. या कामी श्री. सुरेश सावंत व श्री. संजय तोरसकर यांचे मोठे योगदान आहे. विशेष म्हणजे या दोघांनीही दिव्यांग सभासदांच्या घरी जाऊन त्यांचे हयातीचे दाखले सादर करण्याकरिता मदत केली आहे. यावर्षी २२०+हयातीचे दाखले सादर केले गेले.

२) **''उतारवयातील विस्मरण'' व्याख्यान व दिवाळी सण :–** ''स्मृतिभ्रंश'' या विषयातील तज्ञ, मुंबई महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेले संशोधन अधिकारी, श्री. अजित कदम यांचे ''उतारवयातील विस्मरण'' या विषयावरील व्याख्यान दि. १८ ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारी ०४:०० ते ०७.०० या वेळेत आर–मध्य विभागातील सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

सभागृहाच्या बाहेरील लॉबीमध्ये दोन्ही बाजूला पर्यावरणपूरक रंगीत इलेक्ट्रिक पणत्या ठेवण्यात आल्या होत्या. त्याच लॉबीमधून श्री. अजित कदम यांचे आगमन झाले. त्यांच्याबरोबर बरेच सभासद होते. प्रवेश दरवाजावर आंब्याच्या पानाचे व भाताच्या लोंब्यांचे तोरण बांधण्यात आले होते. टेबलावर निरनिराळ्या रंगाच्या फुलांनी सजावट करण्यात आली होती. सभासदांना चहा व फराळाचा बॉक्स देण्यात आला. अशा प्रकारे दिवाळसणाचा आनंद सर्वांनी घेतला.

३) **महिला दिन/महिला सन्मान :–** ८ मार्च २०२६ रोजी असलेल्या महिला दिनाविषयी बोरीवलीतील ज्येष्ठ सभासद श्रीम. अलका वठारकर यांची ''मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय'', बोरीवली शाखेत सन २०२६ ते सन २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी कार्यकारी मंडळावर बिनविरोध निवड झाली. तसेच त्याच दिवशी झालेल्या सुषमा स्वराज मंचावरील व्याख्यान कार्यक्रमाचे त्यांनी अध्यक्षस्थान भूषविले. बोरीवली शाखेतर्फे श्रीमती अलका वठारकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

४) **मनोरंजनात्मक सहल :–** दिनांक १७ जानेवारी, २०२६ रोजी केशव सृष्टी, भाईंदर, उत्तन येथे बोरीवली शाखेची सहल काढण्यात आली होती. सहलीत एकूण ४६ सभासद होते. वातावरण आल्हाददायक असल्यामुळे कोणालाही थकवा जाणवला नाही. निसर्गाच्या सानिध्यात तेथील गो–शाळा, प्लास्टिक रिसायकलिंग प्लांट, ताज्या भाज्या असं सगळं बघून सर्वांना अगदी प्रसन्न वाटलं. दुपारचं साधं पण सात्त्विक भोजन करून सदस्यांनी तेथील रामभाऊ म्हाळगी, प्रबोधिनी संस्थेलाही भेट दिली. तेथील सर्व व्यवस्था पाहून मन भारावले. त्यानंतर चहा व गाण्यांचा मनोरंजनाचा कार्यक्रम पार पडला. एक दिवसाचीच सहल होती परंतु अगदी वेगळ्या वातावरणात पूर्ण दिवस व्यतित केल्यामुळे सर्वजण आनंदात होते.

५) **साप्ताहिक सभा :**– दर शनिवारी संध्याकाळी ०४:०० ते ०६.०० या वेळेत आर–मध्य विभागातील सभागृहात साप्ताहिक सभा संपन्न होते. तेथे सेवानिवृत्तांच्या अडचणींसंदर्भात मार्गदर्शन करण्यात येते. तसेच नवीन सभासद नोंदणी व वैद्यकीय मदतीबाबत निवृत्तांना मार्गदर्शन करण्यात येते.

६) **वर्धापन दिन व स्नेहसंमेलन :**– बोरीवली विभागाचा १७ वा वर्धापन दिन व वार्षिक संमेलनाचा रंगतदार सोहळा दिनांक २९ मार्च, २०२६ रोजी आर–मध्य विभागाच्या सभागृहात १२५ सभासदांच्या उपस्थितीत संपन्न झाला. श्रीम. सचेता कासार यांनी त्यांच्या मंजूळ स्वरातील ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर ८० वर्षावरील १३ ज्येष्ठ सभासदांचा शाल–श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपरोक्त १३ ज्येष्ठ सभासदांपैकी श्री. उमेश रमय्या शेट्टी यांनी आपल्या पेन्शनर्स असोसिएशनला रु. १०,०००/– ची देणगी धनादेशाने दिली.

आपले निवृत्त उपप्रमुख लेखापाल श्री. संजय तोरसकर यांनी सर्व निवृत्तांना मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचा शाल–श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तसेच श्रीम. अलका वठारकर यांची मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, बोरीवली कार्यकारिणीवर बिनविरोध निवड झाल्याबद्दल व सुषमा स्वराज मंचावरील अध्यक्षपद भूषविल्याबद्दल त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यवाह डॉ. मारुती नलावडे यांनी उद्‌बोधक काव्यपंक्ती पेरत पेरत सुंदर रितीने त्यांचे मनोगत व्यक्त केले. तसेच अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर यांनी त्यांच्या मनोगतातून जुन्यांची आठवण व नव्याचे मार्गदर्शन करीत अगदी सर्वांची मने जिंकून घेतली.

त्यानंतर श्रीम. दिशा प्रभू यांनी सर्वांचे आभार मानले. या संमेलनाचे प्रमुख आकर्षण म्हणजे ॲड. शरद माडीवाले यांचे ''इच्छापत्र'' या विषयावरील सखोल मार्गदर्शन होय. इच्छापत्र का करावे? ते रजिस्टर असावे किंवा कसे, त्याचे भविष्यातील वारसदारांना होणारे फायदे, या सर्वांची माहिती त्यांनी प्रोजेक्टरवरील माहितीपत्राच्या आधारे अगदी सोप्या भाषेत करून दिली. हा विषय रुक्ष असूनही त्यांची साधी, सोपी भाषा, सांगण्याची खुसखुशीत आणि विनोदी शैली यामुळे व्याख्यानात सर्व निवृत्त रंगून गेले. गंभीर विषयालाही आनंदी बनविता येते हे ॲड. शरद माडीवाले यांनी याद्वारे दाखवून दिले.

त्यानंतर सर्व सभासदांना चहा, नाश्ता तसेच ड्रायफूट वाटण्यात आले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

७) **संपर्क समिती :**– शाखेतील सर्व सभासदांचे प्रश्न सोडविणे, संपर्क करणे, विविध उपक्रमांचे आयोजन यासाठी कृपया पुढील समितीशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| ६) श्री. सुरेश सावंत | : ९८६९१८६८१२ |
| ७) श्री. रमेश राणे | : ९०८२७२२८१९ / ९८६९०६६५२३ |
| ८) श्रीम. अनिता गोंधळेकर | : ७०४५३५३५०५ |
| ९) श्री. संजय तोरसकर | : ९९६९४०९८९७ |
| १०) श्री. नागेश सामंत | : ९८६९५३१६९८ |

## १२.०४ : वसई विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या वसई विभागाने आयोजित केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचा आढावा पुढीलप्रमाणे :

१) **मासिक सभा :**– एकूण १९ मासिक सभांमधून दिवंगतांना श्रद्धांजली, इतिवृत्त वाचन, मुख्य कार्यालय दादर येथील सभेचा वृत्तांत, मागील महिन्याचा जमा–खर्च इ. गोष्टींचे सादरीकरण केले गेले. पेन्शनर्सच्या अडचणींवर चर्चा करून पुढील कामकाजाचे नियोजनही केले. संबंधितांचे वाढदिवस साजरे करून त्यांना शुभेच्छा दिल्या. चहापाणी व आभार प्रदर्शनाने मासिक सभा संपन्न झाल्या.

२) **हयातीचा दाखला :–** निवृत्तांच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे हयातीचा दाखला भरून पाठविणे. ज्येष्ठांचा हा त्रास वाचविण्यासाठी **वसई विभागातील कार्यकर्त्यांनी वसई, नालासोपारा व विरार या परिसरातील १६ केंद्रांवर हयातीचे ऑनलाईन दाखले भरण्याची व्यवस्था केली. या सर्व केंद्रांवर ७४० इतके दाखले सादर केले गेले. सदर कामी श्री. ललित पाटील यांनी संगणकीय कामाची मोलाची मदत केली.** यासाठी कार्यकारिणीच्या सर्व सभासदांनी गावागावात जाऊन स्वयंस्फुर्तीने व अथक परिश्रमाने कार्य पार पाडले. हे काम यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकारिणी सदस्यांना जागा, बैठक व्यवस्था, विजेची सोय आणि इतर मदत करणाऱ्या संस्था व कार्यकर्त्यांना धन्यवाद!

३) **मार्गदर्शक शिबिर :–** वसई विभागाने सुनियोजित केलेल्या पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर व मध्य वसई अशा पाच केंद्रांमधून शाखा अध्यक्ष श्री. अनंत पाटील व सचिव श्री. काशिनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गदर्शक शिबिरे घेण्यात आली. पहिले शिबिर वसई पश्चिम येथे रविवार दि. ७ डिसे. २०२५ रोजी 'समाज मंदिर' हॉलमध्ये दुपारी ०४.०० ते ०६:०० या वेळेत झाले. 'गुंतवणूक व पेन्शनर्स' या विषयावर गुंतवणूक तज्ज्ञ श्री. अक्षय म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले.

दक्षिण वसईचे दुसरे शिबिर मंगळवार दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी ६० सभासदांच्या उपस्थितीत सेंट एलिझाबेथ कॉनव्हेंट स्कूल हॉल येथे होते. 'अनुभवाचे धन–मनाचे स्वास्थ्य' या विषयावर मानसशास्त्रज्ञ श्री. श्रीधर कुलकर्णी यांनी सभासदांना सुयोग्य मार्गदर्शन केले. श्री. विकास ठाकूर यांनी ज्येष्ठ नागरिकांना मेडिक्लेम कसा मिळू शकतो, याबाबत सविस्तर माहिती दिली. उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले.

पूर्व वसईचे तिसरे शिबिर शुक्रवार दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी लोकसेवा मंडळ, बंगली येथे ४५ सभासदांच्या उपस्थितीत दुपारी ०३:३० ते ०६:०० या वेळेत घेण्यात आले. 'ज्येष्ठांचे आरोग्य व स्वास्थ्य' या विषयावर मान्यवर श्रीम. लीला परेरा यांनी मार्गदर्शन केले.

उत्तर वसईचे चौथे शिबिर गुरुवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२५ रोजी शंकराचार्य मंदिर हॉल, निर्मल या ठिकाणी सायंकाळी ०४:०० ते ०६:०० या वेळेत पार पडले. 'जीवनाचा होवो सुखाचा सोहळा' या विषयावर मान. डॉ. शत्रुघ्न फड यांनी जीवन आनंदी व कायम सुखमय ठेवायचे असेल तर ज्येष्ठांनी काय करावे हे चांगल्या पद्धतीने समजावले.

मध्य वसईचे पाचवे शिबिर शुक्रवार, दि. १९ डिसेंबर, २०२५ रोजी हनुमान मंदिर, उमेळमान या ठिकाणी सायंकाळी ०४:०० ते ०६:०० या वेळेत ६५ सभासदांच्या उपस्थितीत घेण्यात आले. 'उतारवयातील आजार व उपाय' या विषयावर मार्गदर्शन, सन्मा. डॉ. प्रदीप जाधव यांनी केले.

४) **निवृत्तांचे स्नेहसंमेलन आणि एकात्मता दिन :–** सोमवार, दि. ३० मार्च, २०२६ रोजी वसईतील श्री शंकराचार्य मंदिर हॉल, निर्मळ येथे वसई पेन्शनर्स असोसिएशनचा एकात्मता दिन आणि निवृत्तांचे स्नेहसंमेलन यशस्वीरित्या संपन्न झाले. ३५८ सभासद बंधू, भगिनी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत अध्यक्ष सन्मा. श्री. अनंत पाटील यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी वसई विभागाने वर्षभरात केलेल्या कामाचा विस्तृत स्वरूपामध्ये आढावा घेतला. तद्नंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते ५८ सभासद बंधु–भगिनींचा अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने सत्कार करण्यात आला. गेल्या वर्षभरात उल्लेखनीय व उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल संस्थेच्या सदस्या श्रीम. मेरी मॅम्मी डि'मेलो यांचा संमेलनाध्यक्ष सन्मा. श्री. कमलाकर क्षीरसागर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. वसई कार्यकारिणीच्या कार्याचे प्रतिबिंब म्हणजे विभागीय अहवाल. या अहवालाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

वसई कार्यकारिणीच्या सहसचिव श्रीम. हेमलता हटकर यांनी काव्यमय असे सत्काराला उत्तर दिले. कार्यकारिणीचे सचिव श्री. काशिनाथ पाटील यांनी अत्यंत पोटतिडकीने सभासदांच्या अडचणी नमूद केल्या. कार्यकारिणीच्या उपाध्यक्षा श्रीम. विजया खानोलकर यांनी पेन्शनर्स असोसिएशनतर्फे नव्याने स्थापन झालेल्या 'महिला समिती' बद्दल माहिती सांगितली. कार्यकारिणीच्या सह कोषाध्यक्षा श्रीम. अंजेलीना नुनीस यांनी निवृत्तांच्या कामाविषयी आढावा घेऊन त्यात येणाऱ्या अडचणी कथन केल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सन्मा. डॉ. मारूती नलावडे यांनी वसई कार्यकारिणीचे कौतुक केले. निवृत्तांना मार्गदर्शन करतांना त्यांनी अनेक यशस्वी महिलांची उदाहरणे दिली. यापुढील काळात आपण आनंदाचा उत्सव साजरा करावयाचा असून अपूर्ण राहिलेली स्वप्ने साकार करावयाची आहेत, असा मोलाचा मंत्र त्यांनी दिला.

आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये मान. श्री. क्षीरसागर यांनी प्रथमतः वसई कार्यकारिणीचे मनापासून अभिनंदन केले. काही तरी वेगळे करण्याची क्षमता वसईकरांमध्ये आहे. ''वसईकरांकडून खूप अपेक्षा आहेत. वर्षभरात प्रबोधनपर कार्य करा.'' आयुष्यात आपण काय मिळवलं? समाजाला आपण काय दिलं? समाजाने आपल्याला काय दिले? यावर अनमोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे निवेदन श्रीम. हेमलता राऊत यांनी सुंदररित्या केले.

उपस्थितांना चहा व अल्पोपहार दिला. वसईच्या विविध भागातून येण्यासाठी विभागीय कार्यकारिणीने दोन बसेसची व्यवस्था केली होती. कार्यकारिणीमधील सर्व सदस्य व पदाधिकाऱ्यांनी आपले योगदान दिल्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

५) **संपर्क समिती :– विभागातील सभासदांनी आपल्या समस्या सोडविण्यासाठी कृपया पुढील कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा.**

| | | |
|---|---|---|
| १) श्री. अनंत पाटील | : | ९८९२३४६५६२ |
| २) श्रीम. विजया खानोलकर | : | ७७१९८४८९७९ |
| ३) श्री. काशिनाथ पाटील | : | ९८२३४२४९६९ |
| ४) श्रीम. हेमलता हटकर | : | ९१३७०६१८०३ |
| ५) श्री. वसंत नाईक | : | ९८६०६२४१९२ |
| ६) श्री. प्रकाश सातवे | : | ९९२०६७६७८३ |
| ७) श्रीम. अंजलिना नुनिस | : | ९७३०४४५७९६ |
| ८) श्रीम. मेबल घोन्सालवीस | : | ९८१९७१०४८३ |
| ९) श्रीम. मेरी डि'मेलो | : | ९९६०६७४८२९ |

## १२.०५ : चेंबूर विभाग

चेंबूर विभागाचे हे तिसरे वर्ष. तिसऱ्या वर्षाच्या अहवालाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) **मासिक सभा :–** या वर्षी ऑगस्ट २०२५ मध्ये एम विभाग (पश्चिम) येथे नगरसेवक कक्ष, खो. नं. २०३ येथे दुसऱ्या व चौथ्या शनिवारी, दुपारी १२:०० ते ०३:०० यावेळेत बसण्याची परवानगी मिळाली. त्यामुळे एकत्रित येणे थोडे सोपे झाले. या वर्षात २२ सभा झाल्या. त्यात महापालिका निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर तो कक्ष सुशोभित करायला घेतल्यामुळे, त्या कालावधीतील सहा सभा कार्यकर्त्यांच्या घरी झाल्या. प्रत्येक सभेत एका विषयावर एक किंवा दोन सदस्यांनी दहा मिनिटे विचार मांडायचे, एखादे गाणे म्हणायचे, विनोद सांगायचे व नवीन सभासद होण्यास आलेल्या व्यक्तीस संस्थेची माहिती एका सदस्याने द्यायची, असा कार्यक्रम होता. कार्यकारिणीच्या सदस्या श्रीम. शिल्पा नाईक व श्रीम. सुश्मिता चिकोर्डे यांनी कार्यकारिणीतील महत्त्वाचे निर्णय सांगून तक्रार निवारणावर चर्चा केल्या.

२) **हयातीचे दाखले :**– १४५ + सभासदांचे हयातीचे दाखले ऑन लाईन / ऑफलाईन पद्धतीने सादर केले. या काळात एम वॉर्डच्या अकाउंट विभागाने जागा उपलब्ध करून दिली. त्यांना धन्यवाद!

३) **वैद्यकीय अधिकारी सभासद नोंदणी :**– डॉ. उषा शेलार यांच्या सहकार्याने श्रीम. नाईक यांनी ७५ निवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्यांना संस्थेचे सभासद करून घेतले. त्यांच्या NPPA– सह निवृत्ती वेतनाचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

४) **गृहभेटी :**– महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण सोसायटीतील सभासदांच्या गृहभेटीचा छोटासा उपक्रम राबवला गेला. चेंबूर, गोवंडी, सुमन नगर येथील ६ सोसायट्यांना भेटी दिल्या.

५) **स्नेहसंमेलन व आनंद मेळावा :**– दिनांक २२/३/२०२६ रोजी सहकार नगर म्युनिसिपल शाळेत दुपारी ०२:०० ते ०६:०० या वेळेत स्नेहसंमेलनाचे आयोजन केले गेले. सुमारे १५० सभासदांनी या आनंद मेळाव्याचा लाभ घेतला. आपल्याच ज्येष्ठ महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, गाणी हे नेहमीचे कार्यक्रम तर होतेच पण श्रीम. तिमाने यांनी (प्रथम पुरस्कार प्राप्त) मुंबई महानगरपालिकेला लिहिलेल्या पत्राचे अभिवाचन केले. श्रीम. आशा साने यांच्या कौसल्येचा राम या गीताने चैत्रनवरात्र साजरे केले. श्रीम. सुजाता जोशींचे नृत्यही भाव खाऊन गेले. श्रीम. चेतना मुळीक यांचे निवेदनही खूप प्रभावी होते. सांस्कृतिक कार्यक्रमाची संगीत बाजू ह.भ.प. श्रीम. कचरे यांनी उत्तम सांभाळली.

रिस्पॉन्सिबल सिटीझनचे श्री. रोहित जगताप यांच्या व्याख्यानामधून इंटरनेटशी सलगी व सावधानता श्रोत्यांपर्यंत पोहोचली व श्रोत्यांनी प्रश्नही विचारले. डॉ. पूनम पाटील यांनी मीच माझा फिजिओथेरपिस्ट म्हणून काही सोपे व्यायाम शिकवले व आरोग्य टिप्सही दिल्या. चाफा, आंबा डाळ, पन्हे यामुळे सभागृहात चैत्र वसंत ऋतूसह आला असे वाटत होते.

हा सर्व कार्यक्रम कार्यवाह डॉ. मारूती नलावडे यांनी मनापासून पाहिला व दादही दिली. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी संस्थेची माहिती, उपक्रम, वैद्यकीय योजना, संस्थेची वाढ व विस्तार, इ. विषयी उदबोधन केले. त्यांनी आपल्या काव्यातून मनोरंजनही केले.

प्रवेशद्वाराजवळ संस्थेच्या नावाची रांगोळी जशी सुंदर होती. तसाच सेल्फी स्टँडही नाविन्यपूर्ण व संदेशवाहक होता. We are retired but not tired. Only pension, No tension. असे प्लेकार्ड घेऊन फोटो काढणाऱ्यांचा उत्साह ओसंडून वहात होता. या आनंद मेळाव्याला संस्थेचे माजी अंतर्गत हिशोब तपासनीस श्री. कामेरकर उपस्थित होते.

गीता पठणात शृंगेरीला रु.२१०००/– चे पारितोषिकासह प्रथम क्रमांक मिळविल्याबाबत श्रीम. सुजाता जोशी व श्रीम. अनिता कचरे यांना कै. मीनाताई ठाकरे जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल व श्रीम. मंगला तिमाने यांच्या पत्राला महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. असा हा आनंद सोहळा, आनंदी वातावरणात साजरा झाला. यासाठी श्रीम. शकुंतला थोरात, श्री. वाघचौरे, श्रीम. साधना पुरोहित, श्रीम. विद्या रानडे, यांचेसह १६ जणींनी अथक परिश्रम घेतले. त्यांचे व सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतलेल्या सर्व महिलांचे खूप खूप अभिनंदन.

श्रीम. शिल्पा नाईक यांचे नेतृत्वाखाली चेंबूर विभाग उत्तरोत्तर प्रगती करेल असा विश्वास डॉ. नलावडे यांनी व्यक्त केला.

६) **संपर्कासाठी चेंबूर शाखेचा पत्ता व संपर्क समिती :**– एम (प.) विभाग कार्यालय, खो क्र. २०३, दुसरा मजला, दुपारी १२:०० ते ०३:००, चौथा शनिवार. विभागातील सभासदांनी आपल्या समस्या निवारणासाठी खालील कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा.

१) श्रीम. शिल्पा नाईक : ९८२०२२२०७५
२) श्रीम. सुश्मिता चिकोर्डे : ९३२४७९७३१०
३) श्रीम. शकुंतला थोरात : ९००४०७८४६४
४) डॉ. उषा शेलार : ७५०६५०७४६०
५) श्री. सुनील वाघचौरे : ९८६९२५०५२२

## १२.०६ : मुलुंड विभाग

२९ वर्षांपूर्वी सुरू झालेला हा विभाग सर्वार्थाने एक सशक्त, उपक्रमशील व प्रगतशील विभाग म्हणून ओळखला जातो. या विभागाने अहवाल वर्षात आयोजित केलेले उपक्रम पुढीलप्रमाणे :

१) **''ज्येष्ठांचा आहार'' या विषयावरील उदबोधन** :– मंगळवार, दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ०४:०० ते ०६:०० या वेळेत महानगरपालिकेच्या टी–विभाग येथील सभागृहात, मनपा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी पोषण व आहारतज्ज्ञ श्रीम. पूजा भावे–शाह यांचा ''ज्येष्ठांचा आहार'' या विषयावर संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

**उद्दिष्टे** :– १) सभासदांची शारीरिक सक्षमता वृद्धिंगत करणे.

२) निरोगी आरोग्यासाठी योग्य आहाराबाबत जागरूकता निर्माण करणे.

सेवानिवृत्त ज्येष्ठ कर्मचाऱ्यांना ज्येष्ठतेकडून श्रेष्ठतेकडे घेऊन जाणाऱ्या या कार्यक्रमात समतोल आहार, आहारातील योग्य घटक, विविध जीवनसत्वे, विविध रोगांपासून बचाव, करावयाच्या चाचण्या, इत्यादी विषयी तज्ञांनी सखोल मार्गदर्शन करून १२५ निवृत्तांशी दिलखुलास सुसंवाद साधला.

सर्वप्रथम संस्था कार्यवाह डॉ. मारुती नलावडे यांनी प्रभावी प्रास्ताविक करून पूजा शाह–भावे यांचा सखोल परिचय करून दिला. श्रीम. मंदा कुलकर्णी यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले व संयुक्त कार्यवाह श्री. शिवराम अतकरी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

सदर कार्यक्रमास संयुक्त कार्यवाह श्रीम. नीता मांजरेकर, कार्यकारिणी सदस्य श्री. सुहास खामकर व श्री. मधुकर आंबोणकर हे आवर्जून उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून १५ ज्येष्ठ सभासदांचा वाढदिवसानिमित्त व ७५ + वयावरील अति ज्येष्ठांचा सत्कारही करण्यात आला.

**फलनिष्पत्ती** :– ज्येष्ठांच्या आहाराबाबत योग्य ती माहिती प्राप्त झाली. समतोल आहार ही संकल्पना स्पष्ट झाली. करावयाच्या आवश्यक चाचण्यांची माहिती मिळाली.

२) **''दीपोत्सव २०२५ चे बहारदार आयोजन''** :– टी–विभाग, मुलुंड येथील महानगरपालिकेच्या सभागृहात ''दीपोत्सव – २०२५ चा'' बहारदार सोहळा दिनांक २० ऑक्टोबर, २०२५ रोजी १२५ सभासदांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

**उद्दिष्टे** :– दीपोत्सवाचे महत्त्व विशद करणे. सांस्कृतिक वारसा जतन करणे.

१५० दिव्यांच्या तेजोमय प्रकाशाने सभागृह व सभागृहाच्या बाहेरील वातावरण उजळून निघालेले होते. संस्थाध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर, कार्यवाह डॉ. मारुती नलावडे, उपाध्यक्ष श्री. जयंत दातार, सह खजिनदार श्री. चंद्रशेखर फडके, संयुक्त कार्यवाह श्री. शिवराम अतकरी, श्रीम. शिल्पा नाईक, श्री. सुहास खामकर, श्री. मधुकर आंबोणकर, मार्गदर्शक मंडळाचे सदस्य श्री. हरिभाऊ निकम, इत्यादी मान्यवरांची उपस्थिती लाभलेली होती.

डॉ. मारुती नलावडे यांनी दिवाळीला सणांची सम्राज्ञी का म्हणतात, तसेच समाजातील विविध स्वरूपातील अंधार दूर करणे, हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे, या विषयीचे रसाळ व प्रभावी निवेदन आपल्या प्रास्ताविकात केले.

दिवाळी या सणाचे औचित्य साधून फक्त ''दिवाळी'' या विषयावर श्रीम. अनिता पालकर, श्रीम. रेखा ताम्हाणेकर, श्रीम. स्नेहा गोसावी, श्रीम. निलांबरी कुलकर्णी, श्रीम. स्मिता पंडित, श्री. अनिल देठे, श्रीम. श्रद्धा देसाई, श्रीम. विद्या जगे, श्रीम. तारा वैराळ, श्री. प्रकाश पोळ, श्रीम. प्रतिभा घरत, श्रीम. राणे, श्रीम. सुषमा भागवत, डॉ. नलावडे, इ. कलाकारांनी, गणेशस्तवन, लोकगीत, भारुड, नाट्यप्रवेश, विनोदी कविता असे विविध प्रकार सादर केले.

मान. संस्थाध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर यांनी आपल्या कसदार व प्रभावी शब्दांमधून उपस्थितांना दिवाळीच्या शाब्दिक फराळाचा नजराणा भेट देऊन मंत्रमुग्ध केले.

या दीपोत्सवाचे प्रभावी व खुसखुशीत सूत्रसंचालन श्रीम. मंदा कुलकर्णी यांनी करून कार्यक्रमात अधिकच रंगत आणली. श्री. शिवराम अतकरी यांनी आभार व्यक्त केले.

**फलनिष्पत्ती** :– दीपोत्सवाचे महत्त्व समजले. सांस्कृतिक वारसा वृद्धिंगत झाला. कलाविष्कार सादरीकरणाची संधी मिळाली.

३) **''पेन्शनर्स डे'' चे संगीतमय आयोजन** :– ''मुलुंड पेन्शनर्स'' आयोजित विविध संस्थांच्या वतीने बुधवार दि. १७.१२.२०२५ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी २:०० या वेळेत राजे संभाजी सभागृह, २ रा मजला, मुलुंड (पूर्व) येथे सुमारे २०० सेवानिवृत्तांच्या उपस्थितीत व मान. श्री. देविदास बधान यांचे अध्यक्षतेखाली ''पेन्शनर्स डे'' आनंद सोहळा दिमाखात संपन्न झाला. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

**उद्दिष्टे** :– पेन्शनविषयीचा इतिहास जाणून घेणे. विविध संस्थांमधील सभासदांचे मनोमिलन घडवणे. संस्थानिहाय उपक्रमांची माहिती करून देणे. सभासदांचे प्रबोधन / मनोरंजन करणे.

* हा सोहळा यशस्वी करण्यासाठी बृ.म.पे.अ. मुलुंड शाखेचा सिंहाचा वाटा आहे. संस्थेच्या वतीने डॉ. मारुती नलावडे यांचे मौलिक मार्गदर्शन व श्री. केळकर, श्री. गुरव, श्री. अतकरी यांचे अथक परिश्रम लाभले.
* केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, मुंबई पोर्ट ट्रस्ट, भारतीय रेल्वे, या संस्थांचाही सहभाग व त्यांच्या वतीने श्री. मेन्डोन्सा, श्री. चौधरी, श्री. कुलकर्णी यांचेही मौलिक मार्गदर्शन.
* श्री. विश्वनाथ म्हाडगूत, श्री. अनिल देठे, श्रीम. विद्या जगे, श्रीम. अनिता पालकर, इ. चा सांगीतिक कार्यक्रम संपन्न झाला.

४) **''मनोरंजनात्मक व उद्‌बोधनात्मक सहल व चर्चासत्र''**:– शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजी, चंदेरी बांबू रिसॉर्ट, बदलापूर, येथे सकाळी ९:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत ''मनोरंजनात्मक व उद्‌बोधनात्मक सहल तथा चर्चासत्राचे आयोजन'' करण्यात आले होते. या सहलीत एकूण ४३ सभासदांनी सक्रिय व आनंदाने सहभाग घेतला.

**उद्दिष्टे** :– सभासदांमधील परस्पर संबंध वृद्धिंगत करणे. परस्परांतील कलागुणांना वाव देणे. निसर्गानुभव अनुभवणे. या उपक्रमाची थोडक्यात वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

* आरामदायी व वातानुकूलित बसचा प्रवास.
* प्रवासादरम्यान मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल.
* रिसॉर्ट येथे आगमन झाल्यानंतर गरमागरम पोहे, उपमा व चहाचा आस्वाद.

* अनेक सभासदांनी घेतलेला स्विमिंग पूल व रेन डान्सचा आनंददायी अनुभव.
* उत्तम भोजन व्यवस्था.
* श्रीम. मंदा कुलकर्णी यांनी आयोजित केलेला हौजीचा धमाल कार्यक्रम व विजेत्यांचा केलेला यथोचित गौरव.
* डॉ. नलावडे यांनी आयोजित केलेला सुसंवाद (शाब्दिक खेळ, बौद्धिक कोडी, सेवाकाळातील अविस्मरणीय अनुभवांची देवाणघेवाण, इ.)
* परतीच्या प्रवासास निघण्यापूर्वी गरमागरम व खुसखुशीत कांदा, बटाटा भजी व अवीट गोडीचा चहा.
* परतीच्या प्रवासात बसमध्ये केलेली अफलातून धमाल.

अशा प्रकारच्या सहली म्हणजे सभासदांचे पुढील आयुष्यासाठीचे टॉनिक असते.

सदर सहलीचे आयोजन व नियोजन श्री. केळकर, श्री. देठे, श्री. बधान, श्री. गुरव, इत्यादी कार्यकर्त्यांनी उत्तम प्रकारे केलेले होते.

**फलनिष्पत्ती** :– परस्पर संबंध वृद्धिंगत झाले. कलागुणांना संधी मिळाली. निसर्गानुभवाची प्रचिती आली.

५) **२९ वे दिमाखदार स्नेहसंमेलन** :– मुलुंड विभागाचा २९ वा स्नेहसंमेलन सोहळा ३२५ + सभासदांच्या उपस्थितीत बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी मराठा मंडळ हॉल, मुलुंड पूर्व येथे दिमाखात संपन्न झाला. सभागृहात प्रवेश करताच तारा वैराळ यांचे स्वनिर्मित कलांगण सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

**उद्दिष्टे :– सभासदांमधील स्नेहभाव वृद्धिंगत करणे. विचारांचे आदानप्रदान करणे. सभासदांचे प्रबोधन व मनोरंजन करणे.**

उपस्थित सर्व सभासद तसेच मान्यवर पाहुण्यांचे श्रीम. तारा वैराळ यांनी शंख वादनाने स्वागत केले. दीप प्रज्वलनानंतर श्री. देविदास बधान यांनी मुलुंड विभागातील वर्षभरातील कार्याचा प्रभावी आढावा आपल्या प्रास्ताविकात घेतला.

या सोहळ्याचे विशेष अतिथी तथा जागतिक कीर्तीचे प्रख्यात व्याख्याते, ज्येष्ठ कवी व लेखक, निष्णात अर्थतज्ञ, श्री. चंद्रशेखर टिळक यांनी आपल्या ओघवत्या व दमदार शैलीत मला भावलेले गुलजार हा विषय मनोरंजक शैलीत उलगडून दाखवला. गुलजारांच्या विविध चित्रपटांचे दाखले देत त्यांनी सभागृहाला खिळवून ठेवले होते.

संस्था कार्यवाह डॉ. मारुती नलावडे यांनी संत कबीराचा दोहा सांगून, उरलेलं आयुष्य भरडून नव्हे तर भरभरून, आनंदाने, सकारात्मकदृष्ट्या जगायचं आहे. तसेच आपण रिटायर्ड नव्हे तर री–टायर्ड म्हणजे पुन्हा टायर लावून धावायला तयार आहात, असं मार्मिक आवाहन केलं.

संस्थाध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना, संस्थेची वाढ व विस्तार, संस्थेची ध्येये व उद्दिष्टे, संस्थास्तरावर राबविलेले विविध अंगी उपक्रम, महिलांचे सक्षमीकरण, इत्यादी विषयाला स्पर्श करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. संमेलनाध्यक्ष म्हणून बोलताना श्री. अनंत केळकर यांनी आवाहन केले की, ८० वर्षांवरील पेन्शनर्सची वाढ विनासायास मिळणे, निवृत्तीनंतर द्यावयाचे प्रमाणपत्र किंवा निवृत्तीवेतनपुस्तिका प्राप्त होणे, फॅमिली पेन्शनर्सची प्रकरणे लवकर निकाली काढणे, इत्यादी अपेक्षा संस्थेने पूर्ण कराव्यात.

या सोहळ्याचे दुसरे प्रमुख आकर्षण म्हणजे श्री. मोहन साटम, श्री. अनिल देठे, श्री. दिलीप भोगले, श्री. मुकुंद जोग, श्री. सतीश सरदेसाई, श्री. विलास वारंग, या कलाकारांनी सादर केलेली व प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडणारा ''तो मी नव्हेच'' या नाटकातील एक अफलातून साक्ष होय.

त्यानंतर श्री. अनिल देठे, श्रीम. विद्या जगे, श्रीम. अनिता पालकर, श्री. निसार शेख, श्री. सुरेंद्र सिंग, श्री. वसंत घाडगे, श्री. अशोक गरुड, श्रीम. चित्रा देशमुख, या गायक कलाकारांचा एकाहून एक सरस अशा गाण्यांचा नजराणा उपस्थितांना आनंद व जगण्याची नवी उमेद देऊन गेला.

संयुक्त कार्यवाह श्री. शिवराम अतकरी यांनी आभार मानले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. श्रीम. मंदा कुलकर्णी व श्रीम. स्नेहा गोसावी यांनी खुसखुशीत व रसरशीत सूत्रसंचालन करून हा सोहळा अधिकच उंचीवर नेला. गरमागरम व चविष्ट अल्पोपहार व रुचकर भोजनाने सारेच तृप्त झाले व गुणगुणत घरी गेले.

**फलनिष्पत्ती :–** सभासदांमधील विचारांची देवाणघेवाण झाली. सभासदांचे मनोमिलन झाले. सभासदांचे प्रबोधन व मनोरंजन झाले.

६) **हयातीचे दाखले सादर करणे :–** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दिनांक ५ नोव्हेंबर, २०२५ ते ५ मार्च, २०२६ या कालावधीत सभासदांचे जीवनप्रमाण प्रणालीद्वारा ऑनलाईन हयातीचे दाखले भरण्याची मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

* दर मंगळवारी टी–वॉर्ड मधील सभागृह, अनेक गृहनिर्माण संस्था, विरंगुळा केंद्र, ज्येष्ठ नागरिक कट्टे, उद्याने येथे शारीरिकदृष्ट्या असमर्थ आजारी सभासदांच्या घरी.
* ऑनलाइन दाखले सादर करणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फळी विभागाकडे उपलब्ध आहे. (श्री. केळकर, श्री. भोसले, डॉ. नलावडे, श्री. देठे, श्री. कुलकर्णी, श्रीम. मंदा कुलकर्णी, श्रीम. स्नेहा गोसावी, श्रीम. प्रतिभा चव्हाण इ.)
* विभागाने एकूण ६३७ निवृत्त कर्मचाऱ्यांचे दाखले सादर केले असून त्यातील बहुतांश दाखले मनपा प्रशासनाने स्वीकारले आहेत.

७) **साप्ताहिक सभांचे आयोजन :–** दर मंगळवारी दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत टी–वॉर्ड येथील वातानुकूलित सभागृहात सभासदांची साप्ताहिक सभा संपन्न झाली. विशेष म्हणजे सभागृहाच्या दुरुस्तीमुळे ३–४ महिने सभागृह उपलब्ध नसतांनाही जनता जनार्दन ट्रस्ट, मुलुंडचे सभागृह भाड्याने घेऊन तेथे सभांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक सभेला सरासरी उपस्थिती ६०–७० इतकी होती.

**उद्दिष्टे :–** नवीन सभासदांची नोंदणी करून त्यांच्या समस्यांची सोडवणूक करणे.
विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांची चर्चा करून आयोजन करणे.
सभासदांचे वाढदिवस साजरे करणे.
कार्यक्रमांचे नियोजन व आयोजन आराखडा अंतिम करणे.

उपरोक्त सभांमधून श्री. केळकर, डॉ. नलावडे, श्री. अतकरी, श्री. बधान, श्रीम. मंदा कुलकर्णी, श्री. देठे, श्री. गुरव यांचे अमूल्य मार्गदर्शन मिळत असते.

**फलनिष्पत्ती :** उपरोक्त सर्व उद्दिष्टे १००% साध्य झाली.

८) **उपरोक्त सर्व उपक्रमांच्या यशस्वीतेचे मानकरी :–** उपरोक्त सर्व उपक्रम पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेतलेले कार्यकर्ते पुढीलप्रमाणे :

डॉ. नलावडे, श्री. केळकर, श्री. अतकरी, श्री. बधान, श्री. देठे, श्री. जयंत कुलकर्णी, श्री. यादव, श्री. बुरांडे, श्री. परब, श्री. भोसले, श्री. गुरव, श्रीम. ताम्हाणेकर, श्रीम. वैराळ, श्रीम. मंदा कुलकर्णी, श्रीम. स्नेहा गोसावी, श्रीम. बांदेकर, श्रीम. माने, श्रीम. चव्हाण, श्रीम. घरत, श्रीम. भोसले, श्री. कदम, श्री. पवार, श्री. जाधव, श्रीम. राणे, इ.

९) **समस्या निवारणार्थ संपर्क प्रतिनिधी :–** विभागातील सर्व सभासदांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या समस्या निवारणार्थ कृपया खालील प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

१) डॉ. मारुती नलावडे : ९८६९७२२२३८
२) श्री. अनंत केळकर : ९८६९४०२२६३
३) श्री. शिवराम अतकरी : ९८९२९१६३२४
४) श्री. देविदास बधान : ९९८७५५३५६६
५) श्रीम. मंदा कुलकर्णी : ९३२१०३३५७४
६) श्री. अनिल देठे : ९७६९५३४७६६
७) श्री. जयवंत गुरव : ९७०२१३३१३९
८) श्रीम. रेखा ताम्हाणेकर : ९००४२८१६१०
९) श्री. जयंत कुलकर्णी : ९८१९८१४९७०

### १२.०७ : ठाणे विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या ठाणे शाखेचा सन २०२५–२६ या वर्षातील वाटचालीचा आढावा खालीलप्रमाणे.

१) **'ज्येष्ठांचा आहार' – उदबोधन :–** शुक्रवार, दिनांक १३ जून २०२५ रोजी उपजल अभियंता कार्यालय, कापूरबावडी, वेल्फेअर सेंटर येथे, ठाणे शाखेतील एक सदस्या श्रीम. मेधा शाह यांच्या सुकन्या व आहारतज्ञ डॉ. श्रीम. पूजा शाह–भावे यांचे ज्येष्ठांचा आहार या विषयावरील उदबोधन आयोजित केले होते. साठीनंतर आहार कसा असावा, आहारावर नियंत्रण कसे मिळवावे, मधुमेह असणाऱ्यांनी कोणता आहार घ्यावा, इ. बाबतचे अत्यंत उपयुक्त असे मार्गदर्शन करण्यात आले. शंभरहून अधिक सदस्यांनी या उदबोधनाचा लाभ घेतला.

२) **'मुंबई मेरी जान' – कार्यक्रम :–** बुधवार, दिनांक १ ऑक्टोबर, २०२५ रोजी मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे येथे ठाणे शाखेच्या सदस्या सौ. अलका जोशी यांनी मुंबई मेरी जान हा कार्यक्रम दृकश्राव्य माध्यमातून सादर केला. मुंबईचा सात बेटांचा १२ व्या शतकापासूनचा इतिहास, आताची मुंबई, ह्या सर्वांची तपशीलवार माहिती देण्यात आली. कित्येक गोष्टी नव्याने कळत असल्याने उपस्थितांची ताणली जाणारी उत्सुकता या कार्यक्रमाच्या यशाची पोचपावती देऊन गेली.

३) **निवृत्तीनंतरचे आर्थिक नियोजन व सायबर सुरक्षा :–** गुरुवार, दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ रोजी उपजल अभियंता कार्यालय, कापूरबावडी येथील वेल्फेअर सेंटरमध्ये ठाणे शाखेतील एक सदस्य, सनदी लेखापाल व महापालिकेतून प्रमुख लेखापाल या पदावरून निवृत्त झालेले श्री. मकरंद मुळये तसेच आर्थिक गुंतवणूक क्षेत्रातील एक तज्ञ व एसएएस इन्व्हेस्टमेंटच्या सह–संस्थापिका श्रीमती संगीता शिंपी यांचा ''निवृत्तीनंतरचे आर्थिक नियोजन आणि सायबर सुरक्षा'' या विषयावरील व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. हातात असलेली रक्कम व सतत वाढत जाणारी महागाई यांचा आर्थिक ताळमेळ घालताना नियोजन कसे करावे तसेच सायबर गुन्हेगारी व त्याबाबत घ्यावयाची दक्षता, याबाबतची माहिती अत्यंत सोप्या भाषेत देण्यात आली. सदर प्रसंगी संस्थाध्यक्ष मान. श्री. कमलाकर क्षीरसागर व संस्था कार्यवाह डॉ. मारुती नलावडे यांनी उपस्थितांना मौलिक मार्गदर्शन केले.

**४) हयातीचा दाखला सादर करणे :–** गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी कापूरबावडी येथील उपजल अभियंता कार्यालय, वेल्फेअर सेंटरमध्ये डिजिटल पद्धतीने हयातीचा दाखला सादर करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला व ८० + जणांचे दाखले सादर करण्यात आले. सर्व सभासद स्वयंप्रशिक्षित होऊन त्यांनी घरबसल्या डिजिटल पद्धतीने हयातीचा दाखला सादर करावा, हे असोसिएशनचे उद्दिष्ट आहे व त्यास गेल्या दोन वर्षांपासून अत्यंत चांगला असा प्रतिसाद मिळत आहे. काही वयोवृद्ध, आजारी सभासदांच्या घरी जाऊन तसेच वैयक्तिक भेटीत सादर केलेल्या यादीच्या दाखल्यांची संख्या ४२ असून एकूण १५० हयातीचे दाखले ठाणे शाखेच्या वतीने सादर करण्यात आले व जास्तीत जास्त सभासद कसे स्वयंप्रशिक्षित होतील, असे वैयक्तिक प्रशिक्षणही दिले गेले.

**५) सांगीतिक कार्यक्रम :–** शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी, २०२६ रोजी कापूरबावडी येथील जल विभागाच्या वेल्फेअर सेंटरमध्ये हिंदी, मराठी गाण्यांचा कार्यक्रम नवीन वर्षाच्या स्वागतानिमित्त आयोजित केला होता. या कार्यक्रमात २१ गायक सदस्यांनी भाग घेतला. एकूण ११५ सदस्यांची उपस्थिती होती. सर्वच गायकांची गाणी उत्कृष्ट झाली. कराओकेच्या माध्यमातून अनेक नवीन गायक कलाकार तयार होत आहेत व तेही सेवानिवृत्तीनंतरच्या कालावधीत, ही कौतुकाची बाब आहे. सदर प्रसंगी संस्थाध्यक्ष मान. क्षीरसागर व कार्यवाह डॉ. नलावडे यांचे प्रबोधनात्मक मार्गदर्शन झाले.

**६) मासिक सभा आयोजन :–** उपजल अभियंता कार्यालय, कापूरबावडी येथील वेल्फेअर सेंटरचे सभागृह, पेन्शनर्स असोसिएशनच्या ठाणे शाखेच्या कार्यक्रमासाठी महिन्यातून एकदा निःशुल्क वापर करण्याबाबतचे पत्र अहवाल साली प्राप्त झाले. यासाठी श्री. विवेक गद्रे, श्री. कुलभूषण व्होरा, श्रीम. ज्योत्स्ना फडके, श्री. मिलिंद भागवत, श्री. आबासाहेब कोळेकर यांनी यशस्वी प्रयत्न केले. तेथेच आता नियमित सभा होतात.

उपरोक्त सर्व कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यासाठी खालील कार्यकर्त्यांचे सक्रीय सहकार्य लाभले आहे.

श्री. भास्कर देशपांडे, श्री. घनश्याम दीक्षित, श्री. सदानंद ढापरे, श्री. गुलाब माळी, श्री. रोहिदास थळे, श्री. संजय वारीक, श्री. राजेंद्र चौधरी, श्री. मॅन्यूएल मस्करेन्हास, श्री. प्रभाकर मोहिते, श्री. उल्हास देवधर, श्रीम. अलका जोशी, श्रीम. स्मिता पाटील, श्रीम. रेखा ताम्हाणेकर, श्रीम. आशालता वैद्य, श्रीम. वंदना शिर्के इ.

विविध कार्यक्रमांना शाखा स्तरावर आर्थिक सहाय्य नेहमीच लाभत असते. त्यामुळे कार्यक्रम यशस्वी होत असतात. अहवाल साली ठाणे शाखेच्या कार्यक्रमांना आर्थिक सहाय्य करणाऱ्या श्री. भास्कर देशपांडे, श्री. रोहिदास थळे, श्री. गुलाब माळी, श्री. सुरेंद्र भोई, श्री. राजेंद्र चौधरी, श्री. चिंतामण विशे, श्री. संजय मोरे, श्री. संजय गायकवाड, श्री. नाना मुठे, श्री. विवेक काटकर, श्री. नितीन मिसाळ, श्रीम. वंदना शिर्के, श्रीम. सुषमा भागवत, श्री. प्रभाकर मोहिते, श्री. सुहास ढोले, श्रीम. प्रिया खरबंदा, श्री. कुलभूषण व्होरा, श्री. मॅन्यूएल मस्कारेन्हास, श्री. उमेश पाटील, श्रीम. ज्योत्स्ना फडके, श्रीम. नीला पतंगे, या सर्वांचे शाखेच्या वतीने हार्दिक आभार!

ठाणे शाखेच्या वतीने जास्तीत जास्त कार्यक्रमांचे/उपक्रमांचे आयोजन करुन या कार्यक्रम/ उपक्रमांची संख्या व दर्जा वाढविण्याकडे निश्चितच ठाणे शाखेचा आगामी वर्षात कल असेल.

दर महिन्यातून एकदा हॉलच्या उपलब्धतेनुसार सकाळी १०:०० ते ०२:०० या वेळेत सभेचे आयोजन केले जाते.

**सभेचे ठिकाण** – उपजल अभियंता कार्यालय, कापूरबावडी, वेल्फेअर सेंटर, ठाणे (प)

७) **तक्रार निवारणार्थ समिती :–** विभागातील सभासदांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या समस्या निवारणार्थ खालील कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| १) श्री. सुहास खामकर | : ९८२०८४०२५३ /८१६९०४४९६० |
| २) श्री. मधुकर आंबोणकर | : ९९६९१६६६८२ |
| ३) श्री. सुरेंद्र भोई | : ८७७९३८९१३९ |
| ४) श्री. प्रभाकर मोहिते | : ९८२०९३७०२८ |
| ५) श्रीम. वंदना शिर्के | : ७०४५६४९३३५ |
| ६) श्रीम. अलका जोशी | : ९३७२६१३९०८ |
| ७) श्रीम. रेखा ताम्हाणेकर | : ९००४२८१६१० |

## १२.०८ : डोंबिवली विभाग

विविध उपक्रम / कार्यक्रम नाविन्यपूर्ण पद्धतीने आयोजन करण्यात डोंबिवली विभागाचा हातखंडा आहे. डोंबिवली विभागाने वर्षभरात राबवलेल्या ठळक उपक्रमांचा आढावा पुढीलप्रमाणे :

१) **एक कलाकार एक संध्याकाळ :–** १९ एप्रिल, २०२५ रोजी या विषयांर्गत श्रीम. अमिता चक्रदेव यांनी संगीतोपचार या विषयावर एक सुरेख कार्यक्रम सादर केला. मानवी मनावर संगीताचा कसा परिणाम होतो, याचे सुंदर विवेचन त्यांनी केले. सदर समारंभास ५५/६० सभासदांची उपस्थिती होती.

२) **रंगांचे मन :–** दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी, रंगांचे मन हा अप्रतिमपणे सादर करण्यात आलेला आणि रसिक सभासदांना भावलेला एक छानसा कार्यक्रम! सदर कार्यक्रमाच्या वक्त्या होत्या, डॉ.सौ. अमृता जोगळेकर – आठवले. मानवी मानसिकतेवर रंगांचा काय परिणाम होतो. इ. विषयी सखोल माहिती देण्यात आली. उपस्थित १०० + सभासद खरोखरच मंत्रमुग्ध झाले होते.

३) **ठेवा लोककथांचा :–** दिनांक ३१ जानेवारी, २०२६ रोजी श्रीम. सुमित्रा कुलकर्णी, बदलापूर यांनी ठेवा लोककथांचा हा कार्यक्रम सादर केला. नीतीमूल्ये, व्यवहारज्ञान, प्रबोधनपर सांस्कृतिक ठेवा दर्शविणाऱ्या देश विदेशातील लोककथा सांगतानाच, लोक कथांचा उगम, त्यांचा उपयोग अशा अनेक मुद्यांवर बोलताना त्यांनी सर्व श्रोत्यांना तासभर खिळवून ठेवले. जवळपास ८० + सभासद काहीतरी नवीन गवसलेले मनात घोळत स्वगृही गेले.

४) **दीपोत्सव :–** दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी संध्याकाळी ०४:०० वाजता क्रीडा भवन, पेंडसे नगर, डोंबिवली (पूर्व) येथे मोठ्या उत्साहात दीपोत्सवाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमामध्ये सुमारे १४० सभासदांनी भाग घेतला आणि तेवढ्याच दिव्यांनी सभागृह उजळून निघाले. प्रख्यात व्यक्ते श्री. चंद्रशेखर टिळक यांचे मला भावलेले गुलजार याविषयीचे व्याख्यान खूप सुंदर झाले. ते मनाला आनंद देऊन गेले. याप्रसंगी स्थानिक कलाकारांनी गुलजार यांच्या निवडक गाण्यांचा कार्यक्रम सादर केला. श्री. प्रवीण भट, श्री. शिरीष शुक्ला, श्रीम. अनुजा रानडे व श्री. विजय कामत यांनी यात भाग घेतला. शेवटी सुमारे १४० पणत्या प्रज्वलित केल्या आणि कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना रुचकर अल्पोपहार देण्यात आला.

५) **हयातीचे दाखले :–** यावर्षी हयातीचे दाखले ऑफलाईन न देता ऑनलाइन पद्धतीने देण्याचे ठरवले गेले. त्याप्रमाणे १ नोव्हेंबर २०२५ ते ५ मार्च २०२६ या कालावधीमध्ये दर शनिवारी संध्या ५:०० वाजता क्रीडा भवन, पेंडसे नगर, डोंबिवली (पूर्व) येथे संस्थेच्या सभासद कार्यकर्त्यांनी सुमारे २८० निवृत्तांचे दाखले सादर केले. प्रसंगी काही सभासदांनी, जे निवृत्तीवेतनधारक हालचाल करू शकत नाहीत त्यांच्या घरी जाऊन, ते कार्य आटोपण्यात आले. त्यामध्ये श्री. जयंत दातार, श्री. दिलीप करंदीकर, श्रीम. अनुजा रानडे, श्री. अवधूत पाठक, श्री. प्रदीप कुलकर्णी इत्यादींनी सहभाग घेतला. एकूण सुमारे ३६०+ हयातीचे दाखले सादर करण्यात आले.

६) **वार्षिक स्नेहसंमेलन :–** मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी संध्याकाळी ४:०० ते ७:३० वाजेपर्यंत 'सुयोग मंगल कार्यालय, डोंबिवली (पूर्व)' येथे स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम धुमधडाक्यात साजरा झाला. सुमारे ३५०+ सभासदांची कार्यक्रमास उपस्थिती होती. यावर्षीचा या विभागाचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम जरा हटकेच होता. डॉ. ललिता नामजोशी या विदुषीचा 'सफलतेकडून सार्थकतेकडे' हा सुंदर आणि आगळा वेगळा सगळ्यांना खिळवून ठेवणारा, बोधपर आणि अंतर्मुख करणारा विषय होता. संयुक्त कार्यवाह, श्रीम. नीता मांजरेकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष, श्री. अनंत पाटील यांनी त्यांचे मनोगत सादर केले. नंतर शेवटच्या सत्रात डॉ. सलील लाटे –पुणे यांचा सुकून भरे नगमे हा हिंदी गीतांचा संगीत कार्यक्रम 'व्होकल सोनाटा' या वेगळ्या पद्धतीने सादर करण्यात आला. सर्वांना अपरिचित अशा नव्या युनिक कार्यक्रमास उपस्थितांनी भरभरून दाद दिली. कार्यक्रमानंतर अस्सल महाराष्ट्रीयन भोजनाचा आस्वाद उपस्थितांनी घेतला. अशा प्रकारे मोहक, सुंदर व प्रबोधनात्मक कार्यक्रमाची सांगता झाली.

या वर्षीच्या स्नेहसंमेलनात व्यवस्थापन / आयोजन विषयी एक आगळा – वेगळा प्रयोग यशस्वीरित्या सादर केला गेला. सन्मा प्रमुख वक्ते / कलाकार यांना, विना अडथळा जास्तीत जास्त वेळ उपलब्ध करून दिला गेला. मंच रचना कार्यक्रमापूर्वीच पूर्ण केली होती. मंचावरील अनावश्यक वावर टाळण्यात आला होता. अगदी आदर्शवत, अनुकरणीय व्यवस्थापन / आयोजन असे वर्णन करणे उचित होईल.

७) **साप्ताहिक बैठक :–** महिन्याच्या दर शनिवारी सायंकाळी ५:०० ते ६:३० या वेळेत क्रीडाभवन, पेंडसे नगर, डोंबिवली (पूर्व) येथील सभागृहात साप्ताहिक बैठकीचे आयोजन केले जाते. या बैठकीत सेवानिवृत्तांना समस्या निर्मूलनासाठी मार्गदर्शन केले जाते.

वर्षभराच्या उपक्रमात स्थानिक सभासद मोठया संख्येने उपस्थित असतात. त्यांचे सहकार्य हे एक मोठे योगदान आहे. संस्थेचे अध्यक्ष मान. श्री. कमलाकर क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री. दिलीप करंदीकर, श्री. जयंत दातार, श्री. चंद्रशेखर फडके, श्री. प्रदीप कुलकर्णी, श्रीम. अनुजा रानडे, श्रीम. अमिता चक्रदेव, श्री. सुनील जोशी, श्री. सुबोध पाटील, श्री. शिरीष शुक्ल, श्री. विजय कामत यांच्या सहकार्यातून निवृत्तांच्या समस्या सोडविण्याचे कार्य करण्यात येते.

विभागातील सर्व कार्यकर्त्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा.

८) **संपर्क समिती :–** आपल्या समस्यांवर योग्य मार्गदर्शन मिळविण्यासाठी विभागातील सभासदांनी खालील प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. कमलाकर क्षीरसागर | : | ९८१९१३८२५४ |
| २) श्री. दिलीप करंदीकर | : | ९८३३८५६८५२ |
| ३) श्री. जयंत दातार | : | ९८६९६७२३७१ |
| ४) श्री. चंद्रशेखर फडके | : | ९६१९७४९९६४ |
| ५) श्रीम. अनुजा रानडे | : | ९८२०५१२३८८ |

## १२.०९ : कल्याण विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन, कल्याण विभागाचे सन २०२५–२६ या वर्षात आयोजित केलेले उपक्रम पुढीलप्रमाणे :

१) **''उतारवयातील विस्मरण'' या विषयावरील उदबोधन :** शनिवार दिनांक २५/१०/२०२५ रोजी श्री. अजित कदम यांचे 'उतारवयातील विस्मरण' हे उदबोधन अत्यंत उपयुक्त झाले. स्मृतीभ्रंश (Dementia, Alzheimer) या आजारात शरीरावर होणारे परिणाम, लक्षणे व आजार लांबविण्यासाठी काय उपाय करावेत आणि घरातील ज्येष्ठ नागरिकांची काळजी कशी घ्यावी, या विषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

सदर कार्यक्रमाला सन्माननीय श्री. कमलाकर क्षीरसागर, सन्माननीय डॉ. मारुती नलावडे उपस्थित होते. त्यांनी उपस्थित ७० सभासदांना संस्था, उपक्रम, भावी वाटचाल इ. विषयी मार्गदर्शन केले.

२) **ऑनलाइन हयातीचे दाखले सादर करणे** : सोमवार दिनांक ०८.१२.२०२५ रोजी राणी लक्ष्मीबाई उद्यान, कमिशनर बंगल्यासमोर, ज्येष्ठ नागरिक मंडळ सभागृह, कल्याण (पश्चिम) येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमात ११० सभासदांचे जीवन प्रमाणपत्र सादर करण्यात आले. याविषयी सभासदांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिल्यामुळे बहुसंख्य सभासदांनी घरबसल्या हयातीचे दाखले सादर केले.सदर कार्यक्रमाच्या वेळी ३२ नवीन सभासद झाले. ऑनलाइन हयातीचे दाखले सादर करण्यासाठी श्री. श्रीकांत पाटील, श्री. अशोक खिल्लारी, श्री. चंद्रकांत तळेले, श्री. रमेश खाचणे आणि श्री. किशोर शिंदे यांचा अग्रक्रमाने सहभाग होता. त्याचबरोबर श्री. रवींद्र बाविस्कर, श्री. अभय चौबळ, श्री. भावे गोविंद, श्री. सुरेश महाजन, श्री. दत्तू राजे, श्री. संपत साळवे, श्री. सुरेश येवले, श्रीम. अलका हिंगणे, श्रीम. सुषमा भदे, श्रीम. स्नेहलता मानेकर, श्रीम. अंजली सहस्रबुद्धे, श्रीम. विद्या अत्तरदे, श्री. वाणी रवींद्र, श्री. प्रभाकर हडवळे, श्रीम. विचारे प्रणिता, श्री. पाटील अंकुश इ. कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

३) **तिळगूळ समारंभ आणि फ्री मेडिकल कॅम्प** : शनिवार, दिनांक २४.०१.२०२६ रोजी कल्याण विभागातर्फे तिळगूळ समारंभ व फ्री मेडिकल कॅम्प हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमाला ५० महिला, १० पुरुष सभासद उपस्थित होते. कार्यक्रम उत्कृष्ट झाला. सदर कार्यक्रमाला कार्यवाह डॉ. मारुती नलावडे व संयुक्त कार्यवाह श्रीम. प्रतिमा पवार उपस्थित होते. त्याचबरोबर महिला समितीच्या प्रमुख श्रीम. शिल्पा नाईक, श्रीम. शारद काकडे याही उपस्थित होत्या.

४) **वार्षिक स्नेहसंमेलन** : मंगळवार, दिनांक १७.०३.२०२६ रोजी राम मारुती रोड, राम मारुती मंदिर, दूध नाका, कल्याण (पश्चिम) येथील सभागृहात वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमाला १६० सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाचे विशेष अतिथी आणि प्रमुख वक्ते सन्माननीय श्री. समीर लिमये यांनी रामदासांच्या विनोदे या व्याख्यानातून मनुष्याच्या जीवनातील सर्व टप्प्यांचे वर्तन विशद केले. सभागृहाला खिळवून ठेवणारे हे व्याख्यान झाले. प्रमुख पाहुणे सन्माननीय श्री. क्षीरसागर (अध्यक्ष), संमेलन अध्यक्ष सन्माननीय डॉ. आनंदराव सुर्यवंशी, संस्थेचे कार्यवाह सन्माननीय डॉ. मारुती नलावडे, श्री. नयन ढोलकिया आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. सदर प्रसंगी त्यांनी सभासदांना यथोचित मार्गदर्शन केले. पाहुण्यांचे स्वागत श्री. अभय चौबळ यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. चंद्रकांत तळेले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय श्री. रवींद्र बाविस्कर आणि सूत्रसंचालन श्रीम. स्नेहलता माने आणि श्रीम. सुषमा भदे यांनी केले. स्थानिक कलाकारांचे मनोरंजनात्मक कार्यक्रम झाले. श्रीम. माया घडे यांचा नोटा आणि नाणे यांची किमया हा कार्यक्रम उत्कृष्ट झाला. कार्यक्रमाची प्रवेश नोंदणी श्री. सुरेश महाजन व श्री. रमेश खाचणे, श्री. अंकुश पाटील आणि श्रीम. अलका हिंगणे त्यांनी केली. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली आणि उत्कृष्ट स्नेहभोजन घेऊन कार्यक्रम संपला.

५) **मासिक सभा** : अहवाल वर्षी सात सभा घेण्यात आल्या. कल्याण विभागाला सभा घेण्यासाठी जागा नसल्यामुळे जागा भाड्याने घ्यावी लागते. सभेसाठी जागा भाडयाने घ्यावी लागली व सभा खर्च कार्यकर्त्यांना खिशातून करावा लागला. तरीही प्रत्येक सभेला ९ ते १० सदस्य उपस्थित होते.

६) **उपक्रमातून संपर्क** : अहवाल वर्षात विभागातून ८५ नवीन सभासद झाले आणि जवळजवळ रु. ४५०००/- देणग्या प्राप्त आल्या. उपक्रमांच्या माध्यमातून सुमारे ३५० सभासदांशी संपर्क झाला. कल्याण विभागात खूप लांब लांब राहणारे सभासद असून ते संस्थेला सढळ हाताने मदत करत असतात.

७) **तक्रार निवारण :** श्री. चंद्रकांत तळेले यांचा शिक्षण विभागाचा विशेषतः शिक्षकांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास खूप चांगला आहे. शिक्षकांच्या समस्या, प्रश्न ते लीलया सोडवितात. तसेच सदस्यांशी वैयक्तिक नाते निर्माण करून ते त्यांना संस्थेच्या छत्र छायेखाली आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**कार्यालय पत्ता–** ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह, राणी लक्ष्मीबाई उद्यान, कमिशनर बंगल्याशेजारी, सिंडे कल्याण (पश्चिम) येथे कल्याण विभागाची मासिक सभा महिन्यातून एकदा सोयीनुसार सर्वांशी संपर्क करून सायं ४.३० ते ६.०० या वेळेत घेतली जाते.

**संपर्क करण्याकरिता समिती –** कल्याण विभागातील सभासदांनी आपल्या समस्या सोडविण्यासाठी खालील कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा.

१) श्री. चंद्रकांत तळले : ९९८७३७३०२०
२) श्री. रवींद्र बाविस्कर : ९१३६६०७२७६
३) श्री. अभय चौबळ : ९९२०५७५७३१
४) श्री. रमेश खाचणे : ९८९२४२३३९१
५) श्री. सुरेश महाजन : ९७७३२७५६३१

## १२.१० : बदलापूर विभाग

बदलापूर शाखा २०१७ पासून सुरू झाली, तेंव्हापासून ही शाखा उत्तरोत्तर प्रगती करीत आहे. निसर्गरम्य सृष्टीसौंदर्यात वसलेल्या बदलापूर विभागात निवृत्तांची संख्या भरपूर असून ती वाढतही आहे. श्री. विजयकुमार पोतदार यांचे नेतृत्वाखाली व संस्थेचे अध्यक्ष व कार्यवाह यांच्या सततच्या मार्गदर्शनामुळे हा विभाग प्रगतीपथावर आहे. अहवाल वर्षातील या विभागाचे उपक्रम पुढीलप्रमाणे :

* **मासिक सभा –** महिना दोन महिन्यातून एकदा मासिक सभेचे आयोजन केले जाते. सेवानिवृत्तांच्या अडचणी सोडविण्यासाठी स्वतः खजिनदार इतके अग्रेसर असतात की, बहुतेक वेळी त्यांच्या घरीच या सभा होत असतात. सुमारे ७० ते ७५ टक्के तक्रारी स्थानिक पातळीवर सोडविल्या जातात व उरलेल्या तक्रारी केंद्रीय तक्रार निवारण कक्षाकडे सोपविल्या जातात.
* **हयातीचे दाखले सादर करणे –** यावर्षी हयातीच्या दाखल्यासाठी आयोजित मोहिमेस चांगला प्रतिसाद मिळाला. कर्जत, नेरळ, शेलू, वांगणी, अंबरनाथ इ. ठिकाणाहून सभासद केंद्रावर आले होते. सुमारे ९७ + सभासदांचे ऑनलाईन दाखले सादर केले. ७–८ सभासदांचे ऑफलाइन दाखलेही महानगरपालिकेच्या निवृत्तीवेतन विभागात सादर केले. १५–२० सदस्यांना ऑनलाईन प्रमाणपत्र सादरीकरणाचे प्रशिक्षण देऊन त्यांच्यामार्फत ती प्रमाणपत्रे सादर करण्यात आली. एकंदरीत १३० हयातीचे दाखले सादर केले गेले.
* **संपर्क समिती –** बदलापूर विभागातील सभासदांनी आपल्या समस्या निवारणासाठी खालील प्रतिनिधींशी संपर्क साधावा.

  १) श्री. विजयकुमार पोतदार (संस्थेचे खजिनदार) : ९७६६५२५२६७
  २) श्री. रंगनाथ थोपटे (कार्यकारिणी सदस्य) : ९७०२१३४५४४ / ८८२८४२३८८४
  ३) सौ. सुमित्रा कुलकर्णी (कार्यकारिणी सदस्य) : ९४२२४८०२९९
  ४) सौ. वर्षा आंबेसकर (कार्यकारिणी सदस्य) : ९८६९२८५४१०
  ५) सौ. अपर्णा पेठकर : ९३२५५७६४७५

| | | |
|---|---|---|
| ६) सौ. अपर्णा चव्हाण | : | ८६८९९२८८११ |
| ७) सौ. प्रिया कुलकर्णी | : | ९८२३६२००७० |
| ८) श्री. प्रल्हाद गायकवाड | : | ८६०५६९८९८७ |
| ९) श्री. कैलासनाथ राजपूत | : | ८६९८७३१३७६ |
| १०) श्री. विश्वनाथ जाधव | : | ९४२३२३११३४ |

**अभिनंदन, सर्व विभाग शाखांचे !**

या वर्षी सर्व शाखांच्या अहवालाचा आलेख हा चढता आहे. संस्थेचे विभागीय पदाधिकारी व कार्यकारिणी मंडळ यांचा बसलेला मेळ याची ही फलश्रुती आहे. त्यामुळे सर्व शाखांचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, कार्यकर्ते या सर्वांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. ("Keep it up" 'असेच करते व्हा' अशा सर्वांना शुभेच्छा!)

**१३) महिला सक्षमीकरण कक्ष :**

**अ) प्रस्तावना :** संस्थेची महिला सभासदांची जवळ जवळ ५० % इतकी सदस्य संख्या विचारात घेऊन ''बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनने स्वतंत्र महिला समिती कक्षाची निर्मिती, माननीय अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर आणि कार्यवाह माननीय डॉ. मारुती नलावडे यांच्या संकल्पनेतून व बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शन असोसिएशनच्या कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांच्या सहमतीने दि. ११.०६.२०२५ रोजी करण्यात आली आहे.

या समितीची पहिली सभा दिनांक १२.०८.२०२५ रोजी ''शिक्षक भवन, लोअर परेल,'' येथे संपन्न झाली. या सभेच्या दुसऱ्या सत्रात अध्यक्ष माननीय श्री. कमलाकर क्षीरसागर, कार्यवाह डॉ. मारुती नलावडे, कोषाध्यक्ष श्रीयुत पोतदार व कार्यकारिणीचे इतर सदस्य उपस्थित होते. प्रथमतः श्रीमती सुजाता जोशी यांनी सर्व कार्यकारिणी सदस्यांचे स्वागत केले व गोरेगावच्या महिला विभागाने सामुहिक गीत सादर करून सभेला सुरुवात झाली. या सर्व सदस्यांच्या उपस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या महिला कक्षाच्या प्रमुख म्हणून श्रीम. शिल्पा नाईक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांना वंदन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

**महिला समिती कक्षाची उद्दिष्ट्ये :**

१. आपल्यातील सुप्त क्षमतांचा व कौशल्याचा उपयोग महिला समितीच्या सदस्यांना करून देणे.
२. नवीन क्षमता शिकून घेऊन त्या सर्व महिला सदस्यांपर्यंत पोहोचविणे.
३. संस्थेच्या ''सर्वथैव सक्षमता'' या उद्दिष्टानुरूप उपक्रम आयोजित करून संस्थेचा विकास करणे.

**कार्यपद्धती:** वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रत्येक विभागातून पाच कार्यकारिणी सदस्य यांची एक कार्यकारिणी व दोन सुकाणू सदस्य अशी विभागनिहाय कार्यकारिणीची रचना करण्याचे ठरले. या पद्धतीने शाखानिहाय महिला समिती निर्माण करून विविध उपक्रमांद्वारे महिलांचे सक्षमीकरण करणे, प्रत्येक शाखेमधील महिला प्रतिनिधींनी त्यांच्या विभागात सभा घेऊन महिला समितीच्या निर्मितीची माहिती देणे व आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करणे, जास्तीत जास्त महिलांशी संपर्क साधणे, असे कार्यक्रमाचे स्वरूप राहिल, असेही ठरले.

वरील सर्व उपक्रम राबवित असताना ते संस्थेच्या उद्दिष्टांशी तसेच महिला समितीच्या ''हेल्प अस टू हेल्प अदर्स'' या तत्त्वाशी सुसंगत असावेत असेही ठरले. तसेच उपक्रमांमध्ये सहजता, नाविन्य, एखादे प्रशिक्षण याचाही अंतर्भाव असेल.

तद्‌नंतर मान. अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर यांनी महिला विभाग स्थापनेचे उद्दिष्ट कथन करून याबाबत पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना श्रीम. नाईक यांना केल्या. याप्रसंगी कार्यवाह डॉ. मारुती नलावडे यांनी महिला कक्षाच्या निर्मितीस शुभेच्छा दिल्या व या कक्षास सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. **हा महिला कक्ष संपूर्णतः संस्थेच्या कार्यकारिणीच्या अखत्यारीत काम करणार असून, त्यासंबंधीचे निर्णय घेण्याचे सर्वाधिकार संस्थेच्या कार्यकारिणीला असतील, असेही कार्यवाह यांनी स्पष्ट केले.**

**ब) बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन – महिला कक्षाचे सदस्य : शिल्पा नाईक (महिला समिती प्रमुख) ९८२०८८८०७५**

| | |
|---|---|
| **चेंबूर विभाग** | |
| १) सुश्मिता चिकोर्डे | ९३२४७९७३१० |
| २) आशा साने | ९८२१२४१५५६ |
| ३) सुजाता जोशी | ९९६९४३४०५६ |
| ४) साधना पुरोहित | ९९३०६८०००७ |
| ५) अस्मिता दळवी | ९८९२३३३५०७ |
| **शहर विभाग** | |
| १) प्रतिमा पवार | ९९८७७७९९५७ |
| २) अनुजा आचरेकर | ९८३३१९२८२१ |
| ३) शाल्मली परब | ९१६७२००३२३ |
| ४) शुभांगी मोरे | ९८६९३६१५१५ |
| ५) रेश्मा कुलकर्णी | ९८६९३८९७८४ |
| ६) रेश्मा जेधिया | ९९८७७६३९५७ |
| ७) जयश्री वेंगुर्लेकर | ९८२०८२७८०० |
| ८) संगीता जोशी | ९९६९०१४९०८ |
| **गोरेगाव विभाग** | |
| १) नीता मांजरेकर | ९६५३३२८७५६ |
| २) रेखा पाटणकर | ९५९४३८९७१७ |
| ३) स्वरदा दाते | ९८२११९३५२० |
| ४) नीलिमा जवंजाळ | ९१३७१७६३९८ |
| ५) वसुधा कोवळे | ९८२००५१६२३ |
| **मुलुंड विभाग** | |
| १) मंदा कुलकर्णी | ९३२१०३३५७४ |
| २) स्नेहा गोसावी | ९०२२६९४८२६ |
| ३) अनघा राणे | ९५९४९७५८३५ |
| ४) प्रतिमा चव्हाण | ८३५५८२८५५७ |
| ५) तारा वैराळ | ८८५०१८८४३२ |
| ६) गीता शिंदे | ९८६९१७८४१५ |
| ७) अनिला माने | ९९८७७७८४९४ |
| **वसई विभाग** | |
| १) हेमलता हटकर | ९१३७०६१८०३ |
| २) विजया खानोलकर | ७७१९८४८९७९ |
| ३) अंजलीना नुनीस | ९७३०४४५७९६ |
| ४) अमिता पाटील | ९५४५०४३९५६ |
| ५) रीना फलकाव | ९८९०१९६२६३ |
| ६) मेबल घोन्सालविस | ९८१९७१०४८३ |
| ७) सुमन राऊत | ७५०७२१००६५ |
| **डोंबिवली विभाग** | |
| १) अनुजा रानडे | ९८२०५१२३८८ |
| २) अमिता चक्रदेव | ९८६७०८६१५८ |
| ३) माधवी कुलकर्णी | ९९६९०८८०७९ |
| ४) कुमुदिनी झेंडे | ९८१९३१२५४२ |
| ५) प्रज्ञा मालवदे | ९००४४०२०७८ |
| ६) दीपा आपटे | ९८६९५०८३५६ |
| ७) उमा वालावलकर | ९८२०४६३५७० |
| **ठाणे विभाग** | |
| १) रेखा ताम्हाणेकर | ९००४२८१६१० |
| २) संपदा वालावलकर | ९९२०८६६८८९ |
| ३) निशिगंधा गायकवाड | ८८७९६२८८१७ |
| ४) रेवती जोग | ८१६९६९३२८६ |
| ५) शारदा काकडे | ९८१९०९८०८० |
| ६) राजश्री माने | ९८३३६७४४०५ |
| ७) जयश्री गायकवाड | ९८३३३८८९६१ |
| **बदलापूर** | |
| १) सुमित्रा कुलकर्णी | ९४२२४८०२९९ |
| २) अपर्णा पेठकर | ९३२५५७६४७५ |
| ३) अपर्णा चव्हाण | ८६८९९२८८११ |
| ४) वर्षा आंबेस्कर | ९८६९२८५४१० |
| ५) प्रिया केळकर | ९८२३६२००७० |
| **कल्याण** | |
| १) स्नेहलता मानेकर | ८०८२१३२७८७ |
| २) सुषमा वसंत भदे | ९८३३६४११८६ |
| ३) अंजली सहस्त्रबुद्धे | ९९२०६३०३९३ |
| ४) विनया जोशी | ८८५०१२५६६७ |
| ५) विद्या अत्तरदे | ९९८७१८४०६४ |
| **बोरीवली विभाग** | |
| १) वर्षा लेले | ९८९२५४४६९० |

**क) ध्येय :** महिला सक्षमीकरणासाठी 'हेल्प अस टू हेल्प अदर्स' हे ध्येय.

**एका दृष्टिक्षेपात**

१) शाखावार सभा - १५

२) आंतरराष्ट्रीय महिला दिन कार्यक्रम - ७

३) एकूण महिला सहभाग - ५५०

**विविध उपक्रम**

१) ऑनलाइन उपक्रमांतर्गत आर्थिक साक्षरता - गुगल मीट कार्यशाळा २) हेरिटेज वॉक / मुंबई दर्शन सहल ३) शारीरिक सक्षमतेसाठी तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान ४) ग्रिटिंग कार्ड स्पर्धा ५) कला कौशल्य प्रदर्शन ६) रांगोळी ७) सेल्फी स्टँड ८) सौंदर्य कार्यशाळा ९) भारत मातेची आरती १०) हळदीकुंकू ११) सांस्कृतिक कार्यक्रम १२) वेशभूषा

## १३.०१ : मुलुंड विभाग

मुलुंड विभाग महिला कक्षाची प्रथम सभा, दिनांक ९.१२.२०२५ रोजी संपन्न झाली. यावेळी सर्व सातही सदस्या उपस्थित होत्या. १) श्रीम. मंदा कुलकर्णी २) श्रीम. स्नेहा गोसावी ३) श्रीम. अनघा राणे ४) श्रीम. प्रतिमा चव्हाण ५) श्रीम. तारा वैराळ ६) श्रीम. गीता शिंदे ७) श्रीम. अनीला माने.

सदर सभेत महिला सबलीकरणाबाबत चर्चा होऊन त्याचा अहवाल विभागीय अध्यक्ष श्री. केळकर यांना सादर करण्यात आला.

**महिला सक्षमीकरण मेळावा** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या सक्षमीकरणासाठी दि.०५.०३.२०२६ रोजी मिठागर मनपा शाळेच्या सभागृहात एक दर्जेदार मेळावा २००+महिलांच्या उपस्थितीत आयोजित केला.

श्रीम. शिल्पा नाईक यांचे मार्गदर्शनाखाली श्रीम. मंदा कुलकर्णी, श्रीम. स्नेहा गोसावी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी उत्तम नियोजन केले. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून याप्रसंगी फिजियोथेरापीस्ट डॉ. श्रीम. वाघ यांनी सर्व महिलांना शारीरिक तंदुरुस्त राहण्यासाठी मार्गदर्शन करून कांही प्रात्यक्षिकेही घेतली.

श्रीम. प्रतिमा पवार संयुक्त कार्यवाह, यांचा म.पे.अ पुणे यांनी जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव केला आहे. त्यामुळे त्यांचा सदर मेळाव्यात सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शनही केले. श्रीम. नीता मांजरेकर, संयुक्त कार्यवाह यांचाही सन्मान करण्यात आला.

सदर प्रसंगी विभागातील महिला कलाकारांनी विविध प्रकारचे सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम उत्तमरित्या सादर केले. संस्थाध्यक्ष मान. क्षीरसागर, कार्यवाह डॉ. नलावडे, विभागाध्यक्ष मान. श्री. केळकर व महिला समिती प्रमुख यांचे मेळाव्यास उत्तम मार्गदर्शन लाभले.

हा मेळावा यशस्वी करण्यासाठी विभागातील श्री. अतकरी, श्री. गुरव, श्री. देठे, श्री. यादव, श्री. बधान इ. कार्यकर्त्यांचेही सक्रीय सहकार्य लाभले.

## १३.०२ : बदलापूर विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या महिला विभागाच्या बदलापूर केंद्राने 'अर्थ साक्षरता' या विषयावरचे श्रीम. निमिषा पंडित यांचे, एक मार्गदर्शक सत्र दि. २८.०१.२०२६ रोजी ऑनलाईन पद्धतीने 'गुगल मिट' वर आयोजित केले.

महिला विभागाच्या खालील सदस्यांनी हा उपक्रमाचे आयोजन केले.

१) श्रीम. अपर्णा पेठकर २) श्रीम. अपर्णा म्हात्रे ३) श्रीम. प्रिया केळकर ४) श्रीम. वर्षा आंबेस्कर ५) श्रीम. सुमित्रा कुलकर्णी

तंत्रज्ञानाचा वापर करून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम तुल्यबळ तर होताच. परंतु हळूहळू तंत्रविज्ञानाची आयुधे स्वीकारून या गुगल मीटिंगचे यशस्वी आयोजन आणि नियोजन केले. संस्था अध्यक्ष मान. श्री. क्षीरसागर यांच्या मते हा परिवर्तनाचा एक क्षण ठरला आणि गुगल मीट साठी उपस्थित असणारे सर्वजण त्या क्षणाचे साक्षीदार झाले.

श्रीम. सुमित्रा कुलकर्णी व त्यांच्या सहकाऱ्यांनी हे धनुष्य लीलया पेलले. अध्यक्ष मान. श्री. क्षीरसागर व महिला विभागाच्या प्रमुख श्रीम. शिल्पा नाईक हे दोघेही या उपक्रमात सहभागी होते.

### १३.०३ : कल्याण विभाग

कल्याण महिला विभागाची पहिली सभा, दिनांक २४.०१.२०२६ रोजी आयोजित करण्यात आली. तिळगूळ समारंभ व महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत वैद्यकीय कॅम्प असे उपक्रम होते. या सभेत कल्याण विभागातील खालील महिला प्रतिनिधींचा पेन्शनर्स असोसिएशन व महिला कक्षाद्वारे सत्कार करण्यात आला.

१) श्रीम. अंजली सहस्रबुद्धे २) श्रीम. स्नेहलता मानेकर ३) श्रीम. सुषमा भदे ४) श्रीम. विनया जोशी ५) श्रीम. विद्या अत्तरदे

कार्यवाह डॉ. नलावडे, संयुक्त कार्यवाह श्रीम. प्रतिमा पवार व महिला कक्ष प्रमुख श्रीम. नाईक यांच्या हस्ते श्रीफळ, फूल व प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले. सदर प्रसंगी चेंबूर विभागाच्या श्रीम. सुजाता जोशी व ठाणे विभागाच्या श्रीम. शारदा काकडे या महिला कक्ष प्रतिनिधीही उपस्थित होत्या. श्रीम प्रतिमा पवार संयुक्त कार्यवाह यांचाही ''जीवन गौरव'' पुरस्काराबाबत सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला जवळजवळ ६०-६५ महिला सभासद उपस्थित होत्या. सन्माननीय श्रीम. प्रतिमा पवार आणि महिला समिती प्रमुख सन्माननीय श्रीम. शिल्पा नाईक यांनी उपस्थितांना उपयुक्त मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन कार्यकारणी सदस्य श्री. तळेले, श्री. चौबळ, श्री. बाविस्कर व महिला समिती सदस्य यांनी केले. महिला समिती सदस्य यांनी तिळगूळ वितरण केले.

संस्थेची वृद्धी व्हावी, नवीन सभासद जोडले जावेत तसेच महिला सक्षमतेसाठी जास्तीत जास्त नवीन उपक्रम घेण्याचे ठरले. यावेळी कार्यवाह सन्माननीय डॉ. नलावडे यांनी त्यांच्या उद्बोधनात स्पष्ट केले की, कार्यक्रमाची पत्रिका लेखी स्वरूपात असावी, सभासदांनी कार्यकारिणी सभेत ठरवलेले निर्णय सर्वांनी मान्य करावेत व अनुपस्थित असलेल्या सदस्यांनी त्यानंतर त्यात फेरबदल करू नये, एकजुटीने काम करावे, मोठया आवाजापेक्षा विचार मोठा ठेवावा, आपले कर्तृत्व कामातून सिद्ध करावे. त्यानंतर सर्वांचे आभार मानून उपक्रमाची सांगता झाली..

### १३.०४ : वसई विभाग

वसई महिला विभागाची पहिली सभा दि. ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी स्नेहालय बंगला, श्रीम. मेबल घोन्सालविस यांच्या घरी संपन्न झाली. सदर सभेला १) श्रीम. हेमलता हटकर २) श्रीम. विजया खानोलकर ३) श्रीम. अंजलीना नूनीस ४) श्रीम. अमिता पाटील ५) श्रीम. रिना फलकाव ६) श्रीम. मेबल घोन्सालविस, या उपस्थित होत्या. वसई विभागातून महिला सक्षमीकरणासाठी एक कार्यक्रम आयोजित करावयाचा आहे, याची कल्पना उपस्थित सदस्यांना देण्यात आली. वसई विभागातून आयोजित करावयाच्या उपक्रमाबाबत श्रीम. हटकर यांनी सर्वांशी संवाद साधला. सर्व सदस्यांनी चर्चा करुन कार्यक्रमाची वेळ, दिवस, आखणी, नियोजन यावर अंतिम निर्णय घेतला. श्रीम. शिल्पा नाईक यांचेशी सल्लामसलत करुन दि. १९.०२.२०२६ रोजी ''आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे'' आयोजन केले.

छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. श्रीम. शिल्पा नाईक यांनी महिलांशी संवाद साधून महिला समितीची थीम "Help us to Help others," ची गरज, त्यानुसार स्वतःत करावयाचे बदल विशद केले. त्यांनी आपल्या संवादातून महिला मानसिक व्यथेच्या शिकार होतात म्हणून काय करावे? व स्वतःला आनंदघन कसे बनवावे, याची कांही तंत्रे सांगितली.

महिलांसाठीच्या स्वरचित ओव्याही त्यांनी सादर केल्या. ह्या महिला दिनाचे वैशिष्ट्य हे की, 'प्रशिक्षण' हा सक्षमीकरणाचा मुख्य पाया असल्याने त्याला अनुसरून ई-मेल बनविणे, पासवर्ड ठेवणे, मराठी / इंग्रजीत मेसेज टाईप करणे, सेंड करणे, कॉपी फॉरवर्ड करणे, इ. चे प्रात्यक्षिक चेंबूर शाखेच्या श्रीम. सुश्मिता चिकोर्डे व ठाणे विभागाच्या श्रीम. शारदा काकडे यांनी सादर केले.

महिला दिनाच्या या उपक्रमाचे मुख्य आकर्षण होते ग्रीटिंग कार्ड स्पर्धा. जवळपास ३० महिलांनी यात सहभाग घेतला होता. १० जणींना फूल, छोटेसे बक्षीस देऊन गौरविण्यात आले. प्रत्येक कार्डची थीम श्रीम. शिल्पा नाईक यांनी विशद करून सांगितली. प्रत्येक कार्ड बनवताना घरात चर्चा झाली, संवाद घडले व आज्यांना सून, मुलगा, नाती यांचेही सहकार्य मिळाले. या निमित्ताने "हेल्प अस टू हेल्प अदर्स" मधून कौटुंबिक संवाद साधण्याचा उद्देश सफल झाला.

संयुक्त कार्यवाह श्रीम. प्रतिमा पवार यांना महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनने जीवन गौरव पुरस्काराने गौरवण्यात आले असल्याने त्यांचा सत्कार केला. त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनात पेन्शन, तक्रारी, पेन्शन वाढ, इत्यादींची माहिती दिली.

### १३.०५ : ठाणे विभाग

ठाणे विभागाची पहिली सभा दिनांक दि. ११.१२.२०२५ रोजी उपजल अभियंता (प्रचालने) कापूरबावडी, कार्यालय सभागृहात संपन्न झाली. उपस्थित महिला वर्गास संस्थेच्या महिला कक्षाच्या स्थापनेबाबत व महिलांच्या सक्षमीकरण उद्दिष्टांबाबत अवगत करण्यात आले. यापुढे नियमितपणे बैठका घेऊन, महिला सक्षमीकरणाचे विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. या विभागाची दुसरी सभा दि. २९.०१.२०२६ रोजी संपन्न झाली. सदर सभेत पाच पैकी चार सदस्या उपस्थित होत्या. समितीची तिसरी मासिक सभा दि. २१.०२.२०२६ रोजी संपन्न झाली. यावेळी पुढील तीन सदस्या उपस्थित राहिल्या. १) श्रीम. रेखा ताम्हाणेकर २) श्रीम. शारदा काकडे ३) श्रीम. रेवती जोग.

उपस्थित महिला सदस्यांना श्रीम. रेखा ताम्हाणेकर यांनी, बैठकीचे प्रयोजन स्पष्ट केले. महिला समितीच्या ब्रीदवाक्याच्या अनुषंगाने, ८ मार्च रोजीच्या, जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने, श्रीम. नाईक यांच्या सूचनेनुसार महिला सक्षमीकरणावर घोषवाक्य स्पर्धा घेणेबाबत अवगत केले. दि. ८ मार्च रोजीच्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शाखेच्या वतीने सादर करावयाच्या कार्यक्रमांची रुपरेषा पुढीलप्रमाणे ठरविण्यात आली.

१) ठाणे विभागातील महिलांची महिला सक्षमीकरणावर घोषवाक्य स्पर्धा घेणे.
२) महिलांच्या वतीने कार्यक्रम आयोजित करणे. (पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक क्षेत्र, मनोरंजन इत्यादी.)
३) विभागातील काही महिला सदस्यांना त्यांच्या कार्यानुसार गौरविणे.
४) महिला समितीच्या ब्रीद वाक्यानुसार, महिला सक्षमीकरणाच्या धोरणानुसार, विविध उपक्रम हाती घेऊन मानसिक आरोग्य सुस्थितीत राखण्यासाठी आवश्यक ओंकार साधनेचा एक छोटेखानी कार्यक्रम आयोजित करणे.
५) दि. ०१ मार्च रोजी पुढील सभा आयोजित करणे.

वरील मासिक बैठकांच्या अनुषंगाने दि. १८.०३.२०२६ रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. सदर महिला दिन कार्यक्रमांमध्ये महिला सक्षमीकरणावर घोषवाक्य स्पर्धा व कला कौशल्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

सदस्यांचे मानसिक आरोग्य सुस्थितीत राहण्यासाठी श्रीम. वंदना शिर्के यांनी ओंकार साधनेच्या वर्गाचे प्रभावी आयोजन केले. याप्रसंगी उपस्थित महिला वर्गास संयुक्त कार्यवाह श्रीम. प्रतिमा पवार, कार्यवाह डॉ. मारुती नलावडे, अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर व महिला विभागाच्या प्रमुख श्रीम. शिल्पा नाईक यांनी यथोचित मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या क्षणचित्रांचा एक सुंदर व्हिडिओ विभागातील महिला सदस्या श्रीम. स्मिता पाटील यांनी युट्युबवर अपलोड केला आहे. त्याची लिंक पुढीलप्रमाणे :

https://youtu.be/wGSy_RPzeY8?si=XAAkW8oxU3lm044z

### १३.०६ : चेंबूर विभाग

चेंबूर विभागाच्या महिला कक्षाची प्रथम सभा जानेवारी, २०२६ मधील दुसऱ्या शनिवारी घेण्यात आली. त्यात श्रीम. सुश्मिता चिकोर्डे व साधना पुरोहित यांनी शिक्षक भवनात झालेल्या महिला सभेचा संपूर्ण अहवाल सादर केला व आंतरराष्ट्रीय महिला दिन कसा साजरा करावयाचा, याबद्दल प्रत्येकाने चौथ्या शनिवारी होणाऱ्या सभेत विचार करून कार्यक्रम अंतिम करावयाचा, असा निर्णय घेण्यात आला. या सभेस २२ सदस्य उपस्थित होते.

चेंबूर शाखा महिला विभागाच्या वतीने दि. ३१.०३.२०२६ रोजी नेहरूनगरचा राजा, कुर्ला (पूर्व) येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा झाला. सभागृह स्त्री शक्तीने दणाणून गेले होते. अत्यंत रंगीबेरंगी व पारंपरिक वेशात महिला जेव्हा सभागृहात येत होत्या, तेव्हापासून हास्य आणि आनंदाची उपस्थिती अवतरू लागली होती. सर्वप्रथम प्रत्येक महिला आपला परिचय देत होती व त्याबरोबरच संस्थेशी नाते कसे निर्माण झाले, सभासद कोणी बनवले, संस्थेने माझे कोणते काम केले, याचाही धावता आढावा देत होती. हा परिचय सोहळा संपेपर्यंत सभागृहात सन्मा. नगरसेविका प्रविणा मोरजकर उपस्थित झाल्या. त्यांच्याबरोबर श्री. रोहन पाटील, त्यांची आई सुषमा पाटील व कार्यशाळेच्या स्त्रोत व्यक्ती श्रीम. चित्रा कुशारे यांचेही आगमन झाले.

पाहुण्यांच्या स्वागताने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. एकत्र याल, तरच संघटीत व्हाल हा बॅनर सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होता. श्रीम. माधवी संमगीकर यांच्या शास्त्रीय नृत्याने सारे सभागृह नादमय झाले होते. श्रीम. सुश्मिता चिकोर्डे यांनी प्रास्ताविकात महिला समितीच्या स्थापनेचा इतिहास तर सांगितलाच, पण ८ मार्च या दिवसाची जागतिक पार्श्वभूमीही सांगितली. असोसिएशनच्या अध्यक्षांनी, महिला कक्ष कार्यक्रमासाठी २०२६-२७ या वर्षात रु. सव्वा लाखाच्या केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीची बातमी सांगताच सगळ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात अध्यक्षांचे आभार मानले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त नगरसेविका श्रीम. प्रविणा मोरजकर, श्रीम. सुषमा पाटील, श्रीम. चित्रा कुशारे व आमदार श्री. कुडाळकर साहेबांचे सहकारी श्री. रोहन पाटील यांचा सत्कार करण्यात आला. चेंबूर महिला कक्षाच्या प्रतिनिधी श्रीम. सुश्मिता चिकोर्डे, श्रीम. आशा साने, श्रीम. सुजाता जोशी, श्रीम. साधना पुरोहित व श्रीम. अस्मिता दळवी यांचा श्रीम. प्रतिमा पवार, संयुक्त कार्यवाह व नगरसेविका श्रीम. मोरजकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराला सर्वांनी उत्तर देऊन संस्थेचे आभार व्यक्त केले.

कार्यशाळेत विविध गोष्टींवर टिप्स देण्यात आल्या. त्वचेच्या प्रकारानुसार कोणती काळजी घ्यावी. प्रेझेंटेबल कसे रहावे, याची  माहिती दिली. काही गोष्टींची प्रात्यक्षिकेही दाखविण्यात आली. श्रीम. साधना पुरोहित यांनी महिला दिनावर कविता सादर केली. श्रीम. शिल्पा नाईक यांनी उपस्थितांशी संवाद साधला. स्त्रीवर सादर केलेली त्यांची कविता अंतर्मुख करून गेली. शेवटी त्यांनी सादर केलेल्या जवानीच्या गीताने सारा माहोल हलकाफुलका झाला.

सदर समारंभाचे अध्यक्षस्थान संस्थेच्या संयुक्त कार्यवाह, श्रीम. प्रतिमा पवार यांनी भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

या कार्यक्रमाचे खुमासदार निवेदन सुजाता जोशी यांनी केले. या महिला दिनाची जबाबदारी श्रीम. प्रीती पाटील यांनी यशस्वीपणे सांभाळली. चैत्राचे निमित्त साधून पारंपरिक पद्धतीने हळदीकुंकू साजरे केले गेले. त्यात आंबाडाळ, चैत्रपेय पन्हे तर होतेच पण ओल्या हरभऱ्यांनी सर्वांची ओटीही भरली. शकुंतला थोरात यांनी नेहमीप्रमाणेच जिथे कमी तिथे आम्ही ही भूमिका निभावली. भेळपुरी आणी पाणीपुरीची मजा घेत, गाण्यावर गिरकी घेत महिला दिन संपन्न झाला. पुन्हा कधी भेटायचे, हा प्रश्न निरोप घेताना सर्वांच्याच तोंडी होता. या समारंभास  मुलुंड, ठाणे, कल्याण व  शहर विभागाच्या प्रत्येकी दोन प्रतिनिधी उपस्थित होत्या.

### १३.०७ : शहर विभाग

दि. ८ मार्च २०२६ रोजी वीर जिजामाता भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणी संग्रहालय (राणी बाग) भायखळा, मुंबई येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून, सकाळी १०:०० ते १२:३० या वेळेत पदभ्रमण (Heritage Walk) आयोजित केले होते. हा एक पूर्वी कधीही न झालेला आगळावेगळा उपक्रम असल्याने, बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या सर्व विभागातून ९० स्त्री-पुरुष सभासदांनी भाग घेतला.

पदभ्रमणास शुभेच्छा देण्यासाठी प्रभाग क्र. २०५ च्या नवनिर्वाचित नगरसेविका श्रीम. सुप्रिया दळवी आवर्जून उपस्थित होत्या. श्रीम. प्रतिमा पवार, संयुक्त कार्यवाह यांनीही उपस्थित महिलांशी संवाद साधला. ब्रिटिशकालीन वारसा असलेल्या वास्तू, अनेक प्राचीन दुर्मिळ आणि महाकाय वृक्षसंपदा, काचेच्या भिंतीआड बंदिस्त वाघ-अस्वलादी प्राणी, इत्यादींबद्दल बहुमोल माहिती डॉ. श्री. अभिषेक साटम, Ph. D. In zoology, वीर जिजामाता भोसले उद्यान यांजकडून प्राप्त झाली. अनेक शंकांचे त्यांनी छान निरसन केले.

तद्नंतर BEST च्या २ वातानुकूलित बसमधून ८० महिला सदस्यांनी मुंबई दर्शनाचा अतिशय उत्साहात लाभ घेतला. चहा बिस्किटे, लंच पॅक, इत्यादींवर ताव मारून संध्याकाळी साडेचार वाजता कार्यक्रमाची सांगता झाली.

या संकल्पनेच्या प्रमुख शिल्पकार श्रीम. अनुजा आचरेकर, कार्यकारिणी सदस्य या होत्या. त्यांना शहर विभाग कार्यकारिणी सदस्य, श्रीम. नीता मांजरेकर, संयुक्त कार्यवाह आणि गोरेगाव विभाग कार्यकारिणी सदस्य यांची बहुमोल साथ होती. बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष मान. श्री. कमलाकर क्षीरसागर, कार्यवाह डॉ. मारुती नलावडे यांची त्यांना खंबीर साथ होती. तसेच असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य श्री. शरद कुवेसकर, श्री. सतीश आवटे, श्री. नामदेव थोरात, श्रीम. संगीता जोशी यांची बहुमोल मदत व पूर्ण सहकार्य होते. तसेच संचालक, प्राणी संग्रहालय येथील कार्यालयात संपर्क साधण्यासाठी श्री. श्रीराम जोशी, गोरेगाव विभाग यांचे बहुमोल सहाय्य झाले.

## १४) नूतन कार्यकारिणी : सन २०२५ ते २०२८ या कालावधीकरिता ११ कार्यकारिणी सदस्यांची बिनविरोध निवड :

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या सन २०२५ ते २०२८ या कालखंडाकरिता कार्यकारिणीच्या ११ सदस्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यासाठी राबविण्यात आलेली कार्यपद्धती पुढीलप्रमाणे :

* हा विषय कार्यकारिणीच्या दि. २७.१२.२०२४, दि. २५.०२.२०२५, दि. १३.०३.२०२५, दि. ०३.०४.२०२५, दि. ०६.०८.२०२५ व दि. ०९ सप्टेंबर, २०२५ च्या मासिक सभेत सविस्तरपणे चर्चिला गेला.
* या सर्व सभांमधून कार्यकारिणीने सर्वांनुमते असा निर्णय घेतला की, **कार्यकारिणीवर नूतन ११ सदस्यांची निवड ही बिनविरोध करण्यात यावी व संभाव्य ११ सदस्यांची यादी वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीसाठी सादर करावी.**
* त्यानुसार निवडणुकीची प्रक्रिया राबविण्यासाठी दि. १३.०३.२०२५ च्या पदाधिकारी मंडळाच्या सभेत, **निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ज्येष्ठ सदस्य श्री. अनंत दत्तात्रय केळकर** यांची नियुक्ती करण्यात आली.
* निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दि. १९.०३.२५ च्या दै. नवाकाळ व दै. सामना या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०२ एप्रिल, २०२५ पर्यंत इच्छुक सभासदांकडून आवेदनपत्रे मागविली. ही सूचना संस्थेच्या संकेतस्थळावरही प्रसिद्ध केली. त्यानुसार संस्थेकडे २३ सभासदांची आवेदन पत्रे प्राप्त झाली. त्यापैकी ०२ सभासदांनी माघार घेतली.

* उपरोक्त नमूद कार्यकारिणींच्या सर्व सभांमध्ये सर्वांनुमते निर्णय झाला की, उर्वरीत २१ सभासदांपैकी कार्यकारिणीवर पाठवावयाच्या ११ सदस्यांची निवड बिनविरोध करावी व यासंबंधीचे सर्वाधिकार मान. अध्यक्षांना द्यावेत. तसेच उर्वरीत १० सभासदांना स्वीकृत सदस्य, निमंत्रित सदस्य अशा कोणत्या न कोणत्या प्रकारे संस्था कार्यकारिणीमध्ये काम करण्याची संधी द्यावी.
* निवडणूक निर्णय अधिकारी, त्यांच्या कौटुंबिक कारणासाठी परदेशी जाणार असल्याने मान. अध्यक्षांशी झालेल्या चर्चेनुसार, त्यांनी प्रस्तावित ११ नूतन कार्यकारिणी सदस्यांची यादी मान. अध्यक्षांकडे दि. २०.०६.२०२५ रोजी सुपूर्द केली.
* दि. ०६ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या कार्यकारिणी सभेत मान. अध्यक्षांनी कार्यकारिणीच्या ११ सदस्यांची यादी सादर केली. त्यावेळी "माझे नाव ११ सदस्यांमध्ये असायलाच हवे" असा आग्रह श्रीम. शोभना पाटील यांनी धरला. यावर पुढील सभेत चर्चा करण्याचे ठरले.
* **पुढील म्हणजे दि. ०९ सप्टेंबर २०२५ च्या कार्यकारिणी सभेत उपस्थित सर्व २४ सभासदांना याविषयी आपली मते मांडण्याची पुन्हा एकदा संधी मान. अध्यक्षांनी दिली. यावेळी देखील श्रीम. शोभना पाटील यांनी त्यांचे नाव ११ सदस्यांमधे असायलाच हवे व मला पदसुद्धा मिळायलाच हवे, असा आग्रह धरला. मान. अध्यक्षांनी त्यांना समजाविण्याचा भरपूर प्रयत्न केला व सर्वांसमक्ष असे आश्वासित केले की, त्यांना स्वीकृत सभासद म्हणून घेण्यात येईल व एक सुयोग्य दायित्वसुद्धा देण्यात येईल. पदाधिकाऱ्यांची निवड घटनेप्रमाणे नवनिर्वाचित कार्यकारिणी करणार आहे, हे सुद्धा सांगण्यात आले. त्यांनी त्यास नकार दिला. अखेर २४ पैकी २२ सदस्यांनी, मान. अध्यक्षांनी, व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या ११ सदस्यांच्या नावास मान्यता दिली व सदर नावे येणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूरीसाठी सादर करण्यात यावीत, असा निर्णय झाला.**
* त्यानुसार दि. १३.०९.२०२५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर मान. अध्यक्षांनी प्रस्तावित ११ कार्यकारिणी सदस्यांची नावे वाचून दाखवली. त्याची यादी पुढीलप्रमाणे.

  १) श्री. कमलाकर क्षीरसागर – डोंबिवली विभाग
  २) श्री. जयंत दातार – डोंबिवली विभाग
  ३) श्री. अनंत पाटील – वसई विभाग
  ४) डॉ. मारुती नलावडे – मुलुंड विभाग
  ५) श्रीम. प्रतिमा पवार – मुंबई शहर विभाग
  ६) श्री. शिवराम अतकरी – मुलुंड विभाग
  ७) श्रीम. नीता मांजरेकर – गोरेगाव विभाग
  ८) श्री. विजयकुमार पोतदार – बदलापूर विभाग
  ९) श्री. चंद्रशेखर फडके – डोंबिवली विभाग
  १०) श्री. सुहास खामकर – ठाणे विभाग
  ११) श्री. दिलीप करंदीकर – डोंबिवली विभाग

* कार्यकारिणीने सादर केलेल्या या उपरोक्त ११ नावांवर दि.१३.०९.२०२५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सविस्तर चर्चा झाली. **कार्यकारिणीने सादर केलेली नावे अत्यंत योग्य असून आमचा त्यांचेवर १००% विश्वास आहे,** असे मत संपूर्ण सभागृहाने व्यक्त केले.

अशा प्रकारे वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या सर्व २०० सभासदांनी कार्यकारिणीने मांडलेल्या उपरोक्त ११ सदस्यांच्या नावांच्या प्रस्तावास एकमुखी पाठिंबा देऊन उपरोक्त ११ सभासदांची कार्यकारिणीचे सदस्य म्हणून पुढील ३ वर्षांच्या कालखंडासाठी निवड केली. या सर्व ११ सदस्यांचे तसेच त्यांची निवड करणाऱ्या सर्व उपस्थित सभासदांचे संस्थेतर्फे आभार व अभिनंदन !

### १५) मुख्यमंत्री सहाय्यता निधीस संस्थेतर्फे मदत :-

अतिवृष्टीने भीषण परिस्थिती निर्माण होऊन महाराष्ट्रातील असंख्य शेतकऱ्यांच्या पिकांचे/पशुधनाचे प्रचंड नुकसान झाले. ही परिस्थिती लक्षात घेऊन, सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी, मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५ रोजी संस्थेच्या वतीने माननीय अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर, उपाध्यक्ष श्री. अनंत पाटील, कार्यवाह डॉ. मारुती नलावडे, खजिनदार श्री. विजयकुमार पोतदार व संयुक्त कार्यवाह श्रीम. नीता मांजरेकर यांनी माननीय श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची सदिच्छा भेट घेऊन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस रु. १,५१,०००/- चा धनादेश सुपूर्द केला. सदर भेट घडवून आणण्यात नालासोपारा येथील आमदार मान. श्री. राजन नाईक यांची मौलिक मदत झालेली आहे. त्यांचे संस्थेतर्फे आभार!

### १६) संस्थेतर्फे कार्यकर्त्यांच्या कौटुंबिक गृहभेटी - एक अनोखा उपक्रम :-

**या उपक्रमांतर्गत संस्था पदाधिकाऱ्यांनी गोरेगाव व ठाणे विभागातील कार्यकर्त्यांच्या घरी भेटी दिल्या.**

१) **गोरेगाव विभाग** :- विविध सभा, उपक्रम, कार्यक्रम या निमित्ताने संस्था पदाधिकारी व कार्यकर्ते नेहमीच भेटत असतात. असे उपक्रम आपल्या सर्वांच्या सहकार्याने यशस्वीही होत असतात. मात्र अशा वेळी जुजबी, औपचारिक बोलणे होत असते. परंतु परस्परातील स्नेह, विश्वास वाढावा, यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. कारण प्रत्येकजण आपापल्या व्यापात अडकलेला असतो. तसेच एक महत्वाची बाब म्हणजे कार्यकर्ते जेव्हा संस्था कार्यात सहभागी होत असतात, तेव्हा त्यांचे कुटुंबीय सोबत नसतात. त्यांचाही संस्थेच्या कामात अप्रत्यक्ष महत्वपूर्ण सहभाग असतो. कार्यकर्ते फोनवर बोलत असतांना कुटुंबियांच्या कानावर अनेक नावे, योजना पडत असतात. निवृत्तीवेतन धारकांच्या परिवाराचा, हे कुटुंबीय भाग असतात. त्यामुळे आपल्या सहकारी मंडळींच्या घरी जाऊन सहज संवाद करावा, त्यांच्या कुटुंबियांची ओळख करून घ्यावी, त्यांच्याकडून अधिक काही जाणून घ्यावे, या उद्देशाने, प्रत्येक महिन्यात एका विभागातील काही सहकाऱ्यांच्या घरी जाण्याचा प्रयत्न संस्थेने सुरू केला.

त्यानुसार संस्थाध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर व कार्यवाह डॉ. नलावडे यांनी दि. २०.११.२०२५ रोजी गोरेगाव विभागातील श्रीम. नीता मांजरेकर, श्री. अजित कदम, श्री. श्रीराम जोशी, श्री. विनायक रेगे, श्री. संजय मोरे, श्री. संजय भातखंडे यांच्या घरी भेट दिली. या सर्व सहकारी मंडळींच्या तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या समवेत थोडा वेळ संवाद साधत, एक व्यक्ती या नात्याने समजून घेण्याचा प्रयत्न केला. या सर्व कुटुंबांना आनंद झाला. या सर्वांनी आपल्या घरी पदाधिकाऱ्यांचे अगदी छान स्वागत केले. त्यामुळे अध्यक्ष व कार्यवाह यांना खूप काही नव्याने गवसले. वाचन, कला, छंद यावरील संबंधित सभासद/त्यांच्या कुटुंबियांचे प्रेम नजरेस आले. कार्यकर्त्यांकडे असलेल्या वैशिष्ट्यांचा नव्याने परिचय झाला.

२) **ठाणे विभाग** :- असोसिएशनचे अध्यक्ष, मान. श्री. क्षीरसागर तसेच कार्यवाह, डॉ. नलावडे यांनी सदस्यांच्या घरी जाण्याचा जो अनोखा उपक्रम सुरू केला आहे, त्या उपक्रमांतर्गत दुसरी फेरी त्यांनी रविवार दिनांक १८ जानेवारी, २०२६ रोजी ठाणे येथील सदस्यांच्या घरी भेट देऊन पूर्ण केली. त्यांच्यासमवेत ठाणे शाखेचे श्री. सुहास खामकर व श्री. मधुकर आंबोणकर यांचीही उपस्थिती होती.

श्री. सुरेंद्र भोई, श्रीमती वंदना शिर्के, श्री. मडकईकर, श्री. सुहास खामकर, श्रीमती ज्योत्स्ना फडके व शेवटी श्री. मधुकर आंबोणकर यांचे घरी भेट देऊन या कार्यकर्ता संपर्क उपक्रमाची सांगता झाली.

## शहर विभाग





## ठाणे विभाग





## मुलुंड विभाग





## डोंबिवली विभाग






## कल्याण विभाग





## वसई विभाग





## बोरीवली विभाग





## चेंबूर विभाग






## गोरेगाव विभाग





## दादर कार्यालय






## विद्यार्थी गुणगौरव सोहळा







मुख्यमंत्री निधीसाठी संस्थेतर्फे देणगीचा धनादेश मुख्यमंत्र्यांना सुपूर्द करताना

संस्थाध्यक्ष श्री. क्षीरसागर व कार्यवाह डॉ. नलावडे यांनी कुटुंबियांशी विविध विषयांवर अगदी घरातील छोट्यांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांशी संवाद साधत, त्यांना आपलेसे करीत, सहज वातावरण निर्मिती केली. असोसिएशनच्या कार्यात सक्रिय असल्यामुळे जरी या मंडळींची नावे घरी माहिती असली तरीही प्रत्यक्ष या भेटीमुळे खूप काही साध्य झाल्याचे दिसून आले. त्यांच्या बोलण्याच्या हातोटीमुळे खूप जुनी ओळख असल्याप्रमाणे एक एक विषय निघत भेटीचा कालावधी लांबल्याचेही कार्यकर्त्यांच्या लक्षात येत नव्हते.

पदाधिकाऱ्यांच्या कौटुंबिक भेटीची ही संकल्पना कार्यकर्त्यांना तर भावलीच पण ती त्यांना मनापासून दाद देऊनही गेली. वेळेच्या मर्यादेमुळे काही जणांना जरी भेटता आले नाही, तरी पुढील वेळेस त्यांच्याकडे जाण्याचा संस्थेचा प्रयत्न असणार आहे.

संस्था पदाधिकारी तसेच विभागीय कार्यकर्त्यांना आवाहन करण्यात येते की, आपणही आपल्या सहकारी मंडळींच्या घरी परस्परांच्या सवडीने अवश्य जाऊन त्यांच्याशी सुखसंवाद साधून त्यांना संस्थाकार्यात अवश्य जोडून घ्यावे व आनंदाचा लाभ घ्यावा.

## १७) लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालय येथील ऐतिहासिक कार्यशाळा :-

डॉ. मोहन जोशी, सेवानिवृत्त अधिष्ठाता यांच्या सक्रिय पाठिंब्यामुळे डॉ. इंगळे अधिष्ठाता, डॉ. सुधीर पवार, अकॅडेमिक अधिष्ठाता, लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालय, शीव यांच्या उत्साहवर्धक प्रतिसादामुळे सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६ रोजी, दुपारी दोन ते चार या वेळेत, फार्माकोलॉजी सेमिनार सभागृह येथे, लोकमान्य टिळक रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथून मार्च, २०२७ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या, सर्व फॅकल्टीमधील, सर्व खात्यांतील, विविध पदांवर कार्यरत असलेल्यांसाठी, एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत १) सेवानिवृत्ती पश्चात काय काय फायदे देय असतात, हा विषय सेवानिवृत्त उपप्रमुख लेखापाल, श्री. संजय तोरसकर यांनी तर, २) सॅप संगणकीय प्रणालीतून निवृत्तीवेतन दावे कसे तयार होतात व त्यात येणाऱ्या अडचणी कशा दूर करायच्या, याबाबत श्री. शेख, उपप्रमुख लेखापाल (निवृत्तीवेतन) व दक्षता निरीक्षक श्री. सानप यांनी तसेच ३) सेवानिवृत्ती पश्चातची दायित्वे या बिंदूवर श्री. कमलाकर क्षीरसागर, अध्यक्ष यांनी उपस्थित सुमारे १२५+कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

अधिष्ठाता, सायन हॉस्पिटल यांनी या उपक्रमाचे, प्रयत्नाचे कौतुक केले. कार्यवाह डॉ. नलावडे यांनी या मागील उद्देश स्पष्ट केला. अशा प्रकारचा उपक्रम मुंबई महानगरपालिकेत पहिल्यांदाच राबविण्यात आला आहे. परिणामस्वरूप निवृत्तीवेतन दावे विनाविलंब मंजूर व्हावेत व निवृत्ती पश्चातचे आयुष्य सुखकर, समाधानी व्हावे, ही अपेक्षा आहे.

सर्व सहभागी डॉक्टर्स, पॅरामेडिकल स्टाफ, इतर कामगार, कर्मचारी, अधिकारी यांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत करून संस्थेला धन्यवाद दिले. सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी श्री. सतीश आवटे, श्रीम. वर्षा माळी यांनी डॉ. सुधीर पवार यांचे मार्गदर्शनाखाली अथक परिश्रम घेतले. संयुक्त कार्यवाह श्रीम. प्रतिमा पवार, श्रीम. नीता मांजरेकर, श्री. शिवराम अतकरी तसेच श्रीम. अनुजा आचरेकर, श्रीम. प्रदीप कुलकर्णी यांचेही उत्तम सहकार्य लाभले.

भविष्यकाळात हा उपक्रम, मुंबई महानगरपालिकेतील सर्व ७० खात्यांत आयोजित करणे, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशन प्रयत्नशील आहे.

## १८) सुरक्षित इंटरनेट वापर व आर्थिक फसवणूक प्रतिबंधः–

सध्या ज्येष्ठ नागरिकांना विशेषतः पेन्शन धारकांना सायबर गुन्हेगारांकडून लक्ष्य केले जात आहे. आपल्या ३५–४० वर्षांच्या सेवा कालावधीत आपण कमावलेली आपली कष्टाची पुंजी सुरक्षित ठेवणे, हे आपल्या हातात आहे. त्यासाठी कृपया पुढील गोष्टी काटेकोरपणे लक्षात ठेवाव्यात.

१) डिजिटल क्रांती झाली असली तरी धोकेही मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. संगणक, मोबाईल या गोष्टी जीवनाचा अविभाज्य घटक बनलेले आहेत. त्याचा वापर जागरूकपणे करावा. कारण तंत्रज्ञान वाढले की धोके हे आलेच.

२) मोबाईल, ए.टी.एम, विविध ॲप्स, बँक खाते, म्युच्युअल फंड, शेअर मार्केट, इत्यादी गोष्टी हाताळताना सजग रहावे.

३) वरील गोष्टी हाताळताना आपण सहज व नकळतपणे आपली खाजगी माहिती समोरच्या अनोळखी गुन्हेगारास पुरवत असतो, अशी माहिती कधीही देऊ नये. (उदा. बँक खाते क्रमांक, आधार क्रमांक, पॅन क्रमांक, एटीएम कार्ड क्रमांक, CVV, आलेला पासवर्ड, इ.) ही खाजगी माहिती संबंधित संस्था कधीही विचारत नाहीत. आपण मात्र अनोळखी व्यक्तीस ही माहिती पुरवण्यासाठी बळी पडतो.

४) आपल्या सेवाकाळात आपण संगणक किंवा मोबाईल अत्यंत कमी प्रमाणात वापरलेला आहे. याच गोष्टींचा गुन्हेगार फायदा घेऊन पेन्शनर्सना सहजपणे टार्गेट करतात.

५) हल्ली अनेक फेक वेबसाईट हुबेहूब, खऱ्या वाटायला लागतात. खऱ्या/खोट्या वेबसाईटचा शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी घरातील संगणक साक्षर असलेल्या व्यक्तींची मदत घ्यावी. ज्या वेबसाईटचे शेवटचे अक्षर "s" असते, ती वेबसाईट खरी असते, हे लक्षात असू द्या. (उदा. https://sbi.bank.in).

६) SMS, व्हाट्सॲप, ईमेलवरील link ला कधीही क्लिक करू नका. आपल्या अकाउंटला पैसे क्रेडिट झाले आहेत, आपल्याला आयटी रिटर्न मिळालेले आहे, आपली एलआयसी पॉलिसी मॅच्युअर्ड झालेली आहे, अशा कितीतरी थापा मारून आपण फसवले जातो. समोरची अनोळखी व्यक्ती आपणाशी एवढे गोड बोलते की, आपण त्या मायाजाळात सहज फसतो.

७) आपण आपल्या घरात अनोळखी व्यक्तीला घेतो का? नाही ना? मग आपल्या मोबाईलवर अनोळखी ॲप कशासाठी हवेत? कृपया अनावश्यक व फसवे ॲप डाऊनलोड करू नका.

८) मोबाईलवर अनेक फसव्या प्रकारचे कॉल येतात. आपले एटीएम कार्ड आले आहे, आपले एटीएम कार्ड बंद पडले असून ते ॲक्टिव्हेट करायचे आहे, इ. प्रकारे गोड गोड बोलून अनोळखी व्यक्ती आपल्याशी जवळीक साधतात. आपणही विश्वास ठेवतो व आपलेपणाने ओ टी पी, CVV देऊन टाकतो. ते देताच क्षणार्धात आपले बँक खाते रिकामे होऊन जाते. कोणतीही बँक फोन करून आपणास आपली खाजगी माहिती मागत नाही, हे कृपया लक्षात ठेवावे.

९) QR Code द्वारे scam मोठ्या प्रमाणावर होत आहेत. QR Code पैसे देण्यासाठी वापरला जातो, घेण्यासाठी नाही, हे कृपया लक्षात ठेवा. पेन्शनची नवीन योजना आलेली आहे, आपली मागील थकबाकी मिळणे बाकी आहे, इ. प्रकारची आमिषे दाखवली जातात व आपला स्वतःचा स्कॅनर मागून घेतात. पैसे घेण्यासाठी आपला स्वतःचा QR Code दुसऱ्याला कधीही देऊ नका.

१०) KYC च्या नावाखाली खूप फ्रॉड होत आहेत. ज्या ठिकाणची केवायसी करायची आहे, तेथे कृपया स्वतः जातीने हजर रहा. ऑनलाइन KYC च्या फंदात पडू नका.

११) वीज कनेक्शन कापले जात आहे, आपला लोनचा हप्ता बाकी आहे, (लोन घेतलेलेच नसते). त्यामुळे तावडतोब दिलेल्या लिंकवर क्लिक करून तुमची खाजगी माहिती विचारली जाते. आधार, पॅन, वीज मीटर क्रमांक, इ. इत्यादी माहिती घेतली जाते व वीज कनेक्शन कापले जाईल, या भीतीने आपण माहिती देऊन टाकतो व फसतो.

१२) Investment fraud खूप वाढलेले आहेत. विविध योजना सांगितल्या जातात, तीन-चार वर्षांत आपले पैसे दामदुप्पट, तिप्पट करून देऊ, अशी बतावणी केली जाते. आपण त्या प्रलोभनाला बळी पडतो व अलगदपणे जाळ्यात अडकतो. दामदुप्पट सोडाच, गुंतवलेली रक्कम सुद्धा आपण गमावून बसतो. तीन-चार वर्षांत पैसे दामदुप्पट करणारी कोणतीही योजना जगभरात अस्तित्वात नाही, हे कृपया लक्षात असू द्या.

१३) हल्ली digital arrest च्या नावाखाली अनेक जण फसले जातात. विशेषतः ज्येष्ठ नागरिक. तुमच्या घरातला जवळचा नातेवाईक पोलीस स्टेशनमध्ये आहे, तो एका गुन्ह्यात अडकलेला आहे, अशी विविध प्रकारे माहिती सांगून घरच्या नातेवाईकांना ब्लॅकमेल केले जाते. तेही बिचारे मायेपोटी जाळ्यात अडकले जातात. Video Court, Video Police Station असे वेगवेगळे प्रकार व्हिडिओद्वारे दाखवून घरच्या नातेवाईकांना मानसिक trap खाली अडकवले जाते. एक गोष्ट पक्की लक्षात ठेवा की, कायद्यात digital arrest ही संकल्पना नाही. अनेक ज्येष्ठ नागरिक याचे बळी ठरलेले आहेत, ठरत आहेत, याची कृपया नोंद घ्या.

१४) प्रत्येक ठिकाणी password वेगवेगळे ठेवा. महत्त्वाचे म्हणजे आपला पासवर्ड अत्यंत स्ट्राँग असला पाहिजे (उदा. Alpha numerical, अक्षरे, अंक, विविध चिन्हे, इ. मिश्र स्वरूपाचा)

१५) हल्ली-AI चा प्रचंड वापर होत आहे. AI आपल्या बुद्धीची जागा कधीच घेऊ शकत नाही, हे शाश्वत सत्य आहे. तरीही AI चा वापर करून -AI based fraud होत आहेत. (उदा. कै. अजित दादा पवार यांचे निधन झाल्यानंतरही त्यांचे निधनानंतरचे भाषण -ख चा वापर करून प्रसारित केले गेले आहे. ही गोष्ट शक्य आहे का? याचा विचार होणे आवश्यक आहे.)

१६) मोबाईलचा वापर संपल्यानंतर कृपया आपल्या मोबाईलचा स्क्रीन त्वरित lock करणे अनिवार्य आहे. कारण अनोळखी व्यक्तीच्या हातात मोबाईल गेल्यास त्याचा दुरुपयोग होऊ शकतो.

१७) आपल्या मोबाईलवरील auto download हा ऑप्शन त्वरित काढून टाका.

१८) एक गोष्ट सतत लक्षात ठेवा की, आपलं सर्व आयुष्य मोबाईलमध्ये बंदिस्त आहे. त्यामुळे ते secure ठेवा.

१९) unknown call, messages कुठल्याही परिस्थितीत अटेंड करू नका.

२०) कोणत्याही अधिकृत ॲपचा वापर संपल्यानंतर ते ॲप त्वरित logout करा.

२१) एवढी सगळी काळजी घेऊनसुद्धा एखादा cyber fraud झालाच तर कृपया १९३० या क्रमांकावर किंवा https://cybercrime.gov.in वर आपली तक्रार अवश्य नोंदवा.

उपरोक्त माहितीचा आपणास आर्थिक फसवणुकीपासून प्रतिबंध करण्यासाठी नक्कीच उपयोग होईल, असा विश्वास वाटतो.

## १९ (अ) १ जुलैच्या काल्पनिक वेतन वाढीसाठी आवाहन :-

दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना लगतच्या १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्तांचे वेतन निश्चित करण्याबाबतचे **परिपत्रक क्र. साप्रवि / एफजीआर / १३, दि. ११.१०.२०२३** अन्वये मनपा प्रशासनाने निर्गमित केलेले आहे.

**सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणी दिनांकानंतर दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या तसेच ज्यांनी मागील १२ महिन्यांची अर्हताकारी सेवा पूर्ण केली आहे, अशा मनपा कर्मचाऱ्यांना दि. ०१ जुलैची काल्पनिक वेतनवाढ अनुज्ञेय आहे. याविषयीची अनेक प्रलंबित प्रकरणे संस्थेने मार्गी लावलेली आहेत. सर्व संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपापल्या आस्थापनांकडे अर्ज करून या वेतनवाढीचा फायदा घ्यावा, असे आवाहन आहे.**

## १९ (ब) १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ – न्यायालयीन आदेशावर विचारविनीमय :-

सहाव्या वेतन आयोगानुसार ०१ जुलैची शेवटची नियमित वेतनवाढ मिळाल्यानंतर, नियत वयोमानानुसार निवृत्ती दिनांकापर्यंत ज्या कर्मचाऱ्यांची संबंधित वर्षात ६ महिने व त्यापेक्षा जास्त सेवा झालेली आहे, अशाही कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्ती दिनांकास एक काल्पनिक वेतनवाढ देऊन त्यांना सुधारित निवृत्तीवेतन व त्या अनुषंगाने इतर देय लाभ देण्यात यावेत, असा आदेश मान. उच्च न्यायालयाने दि. १८.०३.२०२६ रोजी नाशिक जिल्ह्यातील ११८ निवृत्त कर्मचारी विरुद्ध राज्यशासन (याचिका क्र. WP/15662/2025) या खटल्यात दिलेला आहे. इतर खंडपीठांनीही असेच आदेश दिलेले आहेत.

याच आदेशाचा संदर्भ घेऊन मनपामधून सेवानिवृत्त झालेल्या पात्र कर्मचाऱ्यांनाही सदर काल्पनिक वेतनवाढीचा फायदा मिळवून देण्यासाठी संस्थेचे प्रशासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. संस्थेने या विषयीचे प्रस्ताव मान. महापालिका आयुक्त, अध्यक्ष (स्थायी समिती), मान. सहाय्यक आयुक्त (सामान्य प्रशासन) व मान. महापौर यांचेकडे दि. १७.०६.२०२६ रोजी सादर केलेले आहे. याविषयी करावयाच्या कार्यवाहीची सविस्तर माहिती वेळोवेळी देण्यात येईलच.

## २०) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मनपा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नियोजित मिळावे :-

सदर मेळावे आयोजित करण्यासाठी संस्था गेल्या दोन वर्षांपासून प्रयत्नशील आहे. परंतु त्यास अद्यापपर्यंत यश आलेले नाही. त्यामुळे याविषयी पुन्हा पुढीलप्रमाणे आवाहन करण्यात येत आहे.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. अनेक सेवानिवृत्त कर्मचारी बृहन्मुंबई परिसरात रहात असले तरी त्यांचे संबंधित भागात वारंवार जाणे येणे असते. आजमितीस संस्थेच्या ११ शाखा कार्यरत असून अजूनही शाखा वाढीस भरपूर वाव आहे. त्यासाठी प्रथम प्रयत्न म्हणून रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यात शाखा स्थापन करून संस्थेचा विस्तार करण्याचा मानस आहे.

या दृष्टीने कार्यकारिणीच्या सभांमधून अनेकदा चर्चाही झालेली आहे. त्यामुळे उपरोक्त तीनही जिल्ह्यांत वास्तव्यास असलेल्या / वारंवार जाणे येणे असलेल्या मनपातील निवृत्त कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे आवाहन करण्यात येत आहे.

- रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड येथे नियोजित संभाव्य मेळाव्यास आवर्जून उपस्थित रहावे.
- आपल्या परिसरात राहणाऱ्या संबंधित निवृत्त कर्मचाऱ्यांना या मेळाव्याविषयी अवगत करावे.
- नियोजित मेळाव्यासाठी उपस्थित राहू इच्छिणाऱ्या संबंधित निवृत्त कर्मचाऱ्यांनी कृपया आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक इ. माहिती संस्थेच्या खालील प्रतिनिधींकडे द्यावी .

| | | | |
|---|---|---|---|
| संपर्क प्रतिनिधी : | १) श्री. प्रभाकर गावडे | – कुडाळ | – ९८२१४१२४५६ |
| | २) श्रीम. अनुजा आचरेकर | – गिरगाव | – ९९३३१९२८२१ |
| | ३) श्रीम. विजया खानोलकर | – वसई | – ७७१९८४८९७९ |
| | ४) श्री. सुभाष लाड | – लांजा | – ९८६९१०५७३४ |

याशिवाय कार्यकारिणीमधील कोणताही सदस्यांशी संपर्क करता येईल.

- **नियोजित संभाव्य मेळाव्यांच्या तारखा, स्थळ, इ. विषयी आगाऊ कळविण्यात येईल.** सर्व संबंधितांनी या संभाव्य मेळाव्यांत उपस्थित राहून संस्थावृध्दी व विस्तारासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आहे.

## २१) My Bmc App चा उपयोग करा :

बृहन्मुंबई महानगरपालिकेने कर्मचारी / निवृत्त कर्मचारी यांची इत्यंभूत माहिती दर्शविणारे My Bmc नावाचे App विकसित केलेले आहे. सर्व सभासदांना आवाहन करण्यात येते की, सदर App आपल्या मोबाईलवर जरूर डाऊनलोड करून घ्यावे. घरबसल्या आपणास खालील माहिती त्वरित उपलब्ध होऊ शकते. १) संपूर्ण वैयक्तिक माहिती २) नोंदविलेला पत्ता ३) पेन्शन स्लीप, पेन्शन प्रमाणपत्र, हयातीचा दाखला सद्यस्थिती ४) पेन्शन बँक माहिती, वारसदारचे नाव इ.

सदर App डाउनलोड केल्यानंतर **Employee Service** मध्ये जाऊन आपला कर्मचारी **संकेतांक टाईप केल्यानंतर ६ अंकी OTP येतो. तो टाईप केल्यानंतर वरील सर्व माहिती सहज उपलब्ध होते. फक्त गरज आहे, थोडेसे तंत्रज्ञानी होण्याची.**

## २२) QR Code आधारित ओळखपत्राविषयी :

असोसिएशनच्या सर्व शाखांमध्ये कार्यकर्ते /कार्यकारिणी सदस्य/ पदाधिकारी यांच्या अथक परिश्रमातून एकूण ८७०६ कर्मचारी / सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ओळखपत्रे काढली गेली. **परंतु कोणत्याही निवृत्त कर्मचाऱ्यास अद्यापपर्यंत Q. R. Code आधारित ओळखपत्र प्रशासनाकडून प्राप्त झालेले नाही. सदर बाब मनपा प्रशासनाच्या स्तरावर प्रलंबित आहे. याविषयी प्रशासनाकडून कोणतीही प्रगती झालेली दिसून येत नाही. त्यामुळे सर्व निवृत्त कर्मचाऱ्यांना संस्थेतर्फे पुढील आवाहन करण्यात येत आहे.**

* ज्यांचे ओळखपत्र काढले गेले आहे, त्यांना आस्थापनेच्या पडताळणीसापेक्ष ते मिळणे अपेक्षित आहे. ही बाब पूर्णतः प्रशासनाच्या अखत्यारीत येते. मात्र त्यामुळे आपले कांहीच अडलेले नाही.
* **Q. R. Code ओळखपत्र आणि दरमहा मिळणारी पेन्शन याचा काहीही संबंध नाही. हे ओळखपत्र नसल्यामुळे कोणाचीही पेन्शन बंद होणार नाही, याची खात्री बाळगावी.**

## २३) विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ :

मार्च / एप्रिल २०२५ मध्ये महानगरपालिका शाळांमधून इयत्ता १० वी, १२ वी तसेच पदविका, पदवी, पदव्युत्तर परीक्षेत नैपुण्य मिळविणाऱ्या आपल्या संस्थेच्या सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव व पारितोषिक वितरण समारंभ जी / उत्तर विभाग संस्थेच्या कार्यालयात दिनांक १८.१२.२०२५ रोजी **संस्थेचे ज्येष्ठ सभासद व कार्यकारिणी सदस्य मान. श्री. अनंत काजरोळकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.**

सदर समारंभाचे नियोजन व आयोजन **श्री. दिलीप करंदीकर, कार्यालय प्रमुख यांनी केले.** त्यांनी आपल्या प्रास्ताविकात या पारितोषिक वितरण समारंभाची सविस्तर माहिती दिली. अध्यक्षस्थान भूषविणारे संस्थेचे माजी उपाध्यक्ष श्री. अनंत काजरोळकर व इतर पदाधिकाऱ्यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या पालकांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून आभार मानले. **उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. सदर प्रसंगी श्रीम. नीता मांजरेकर, श्री. विजयकुमार पोतदार, श्री. थोरात, इ. पदाधिकारी उपस्थित होते.**

या पारितोषिक वितरण समारंभामध्ये एकूण **रुपये ३६,५००/–** एवढी रक्कम एकूण १८ विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे –

| | |
|---|---|
| म. न. पा. शाळेतील विद्यार्थी | रु. २२,०००/– |
| सदस्यांची मुले / नातवंडे इ. | रु. १४,५००/– |
| **एकूण रुपये** | **३६,५००/–** |

याशिवाय विद्यार्थ्यांना आकर्षक प्रमाणपत्रे व अल्पोपहार वितरीत करण्यात आला.

**विशेष सूचना :–**

* **बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेतील जे विद्यार्थी मार्च/एप्रिल २०२६ मध्ये घेतलेल्या शालांत परीक्षेत पहिल्या दहा क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात येणार आहे.**
* **तसेच मार्च / एप्रिल २०२६ मध्ये घेतलेल्या (इ. १२ वी, पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी) परीक्षेत ज्या सभासदांच्या पाल्यांनी विशेष यश संपादित केले आहे,** अशा विद्यार्थ्यांचाही सत्कार संस्थेतर्फे करण्यात येणार आहे. सभासदांना विनंती करण्यात येते की, **त्यांनी सदर परीक्षेतील उत्तीर्ण निकालपत्रासह (झेरॉक्स) आपले अर्ज दि. ३०.११.२०२६ पर्यंत संस्था कार्यालयात पाठवावेत.**

**महत्वाची सूचना :–** सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव व पारितोषिक वितरण समारंभ **शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२६** रोजी संस्था कार्यालयात आयोजित करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

## २४) अर्जांचे नमुने :

**अ) पेन्शन स्लीप :** निवृत्तांना दरमहा पेन्शन स्लीप ई–मेल द्वारा प्राप्त होत आहे. अजूनही अनेकांना पेन्शन स्लीप मिळण्यात अडचणी असल्यास त्यांनी संस्थेकडे संपर्क साधावा. त्यांना योग्य ते सहकार्य करण्यात येईल.

अद्यापही ज्यांना पेन्शन स्लीप मिळत नाही, त्या पेन्शन धारकांनी ई–मेलद्वारा आपले खालील नमुन्यातील अर्ज ao.penib@mcgm.gov.in या ई–मेल पत्यावर पाठवावेत. अर्जात पुढील गोष्टी नमूद कराव्यात. स्वतःचे नांव, कर्मचारी संकेतांक, मोबाईल क्र. व ई–मेल आयडी (२५ कॅरेक्टरपेक्षा जास्त नसावा). अर्जाचा नमुना संस्थेच्या वेबसाईटवरही देण्यात आलेला आहे. तरीही तो येथे पुन्हा देण्यात येत आहे.

Name :-
Address:-
Contact No:-
Date:

To,
The Chief Accountant (Treasury)
M. C. G. M.
1st floor, Annex Building,
Mahapalika Marg, Fort
Mumbai-400001

Sub :- To get Pension Slip through email.

Dear Sir / Madam

It is requested to make suitable arrangements to send me the monthly Pension Slip on my below mentioned email ID with immediate effect.

My details are as under-
1) Full Name :
2) Employee Code No :
3) Mobile Number :
4) email Id :

Yours Faithfully
(Full Name: )

तसेच पे स्लीप न मिळाल्यास **०२२–२२६२०२५१/०२२–२२७५४०००** विस्तारीत क्र. ४०३४ या क्रमांकावर संपर्क साधावा. पे स्लीप त्वरीत पाठवली जाते, असा अनुभव आहे. पे स्लीप My BMC App वरूनही डाउनलोड करता येते.

**ब) ८० वर्षानंतरची मूळ निवृत्तीवेतन वाढ :** ८० वर्षानंतरची मूळ निवृत्तीवेतन वाढ न मिळाल्यास सभासदांनी / निवृत्त पात्र कर्मचाऱ्यांनी निवृत्तीवेतन विभागाकडे पुढील नमुन्यात अर्ज करावा.

प्रेक्षक
श्री / श्रीम. ---------------------
-----------------------------
-----------------------------
-----------------------------
दिनांक :

प्रति,
लेखा अधिकारी (निवृत्तीवेतन विभाग),
प्रमुख लेखापाल (कोषागार)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
महापालिका मार्ग,
मुंबई–४००००१.

विषय: ८०/८५/९०/९५/१०० पेक्षा अधिक वर्षे वय पूर्ण झाल्याने देय असलेली निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनातील वाढ मिळण्याबाबत विनंती अर्ज.
संदर्भ : परिपत्रक क्रमांक सा. प्र. वि/एफ जी आर/०६ दिनांक ३०.०९.२०२४.

मान. महोदया,

मी, श्री/श्रीमती. ----------------- महानगरपालिकेचा निवृत्तीवेतन धारक/कुटुंब निवृत्तीवेतन धारक असून, माझा कर्मचारी संकेतांक क्रमांक ------ व पेन्शन पुस्तक क्रमांक ------ हा आहे. मला ------- या महिन्यात वयाची ८०/८५/९०/१००/१०० पेक्षा अधिक वर्षे पूर्ण झाली असल्याने मला उपरोक्त परिपत्रकातील निर्देशानुसार देय असलेली माझ्या निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनातील २० टक्के, ३० टक्के, ४० टक्के, ५० टक्के, १०० टक्के वाढ मिळावी. तसेच याबाबतची थकबाकी देय असल्यास ती रक्कम त्वरित देण्यात यावी, ही विनंती.

आपला / आपली विश्वासू,

श्री./श्रीम. -----------

सोबत :– १) आधार कार्ड (स्वयंसाक्षांकीत Zerox प्रत)
२) पेन्शन पुस्तक (स्वयंसाक्षांकीत Zerox प्रत– पृष्ठ क्र. १ व २)
३) पॅनकार्ड (स्वयंसाक्षांकीत Zerox प्रत)

टीप :– उपरोक्त परिपत्रकानुसार देय वाढ :

| वय | टक्के |
|---|---|
| ८० ते ८५ | २०% |
| ८५ ते ९० | ३०% |
| ९० ते ९५ | ४०% |
| ९५ ते १०० | ५०% |
| १०० पेक्षा अधिक | १००% |

## २५) निवृत्ती वेतन विभाग :

बृहन्मुंबई महापालिकेच्या प्रमुख लेखापाल (कोषागर) यांच्या कार्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणे :
**प्रमुख लेखापाल (कोषागार) यांचे कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका, विस्तारित इमारत, पहिला मजला, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१**
**संपर्क क्र : ०२२–२२६२०२५१ / वि. क्र. ४८९०.**

## २६) अंशराशीकरण रकमेचे अधिदान (Comutation Amount) :

निवृत्तीवेतनांपैकी ज्या निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण केलेल असेल व ती रक्कम ज्या तारखेला मिळाली असेल, त्यानंतर १५ वर्षांनी तेवढीच रक्कम निवृत्तीवेतनात समाविष्ट करण्यात येते. **निवृत्तीनंतर अंशराशीकरणाची रक्कम ज्या तारखेला जमा झाली असेल, त्या तारखेपासूनचा १५ वर्षांचा कालावधी कृपया लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.** त्यासाठी कोणीही सभासदांनी असोसिएशनकडे किंवा निवृत्तीवेतन विभागाकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. कृपया याबाबत क्र. सा.प्र.वि / एफ जी आर / १६, दि. १९.१०.२००४ हे परिपत्रक पहावे. सदर परिपत्रक असोसिएशनच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. **सर्व सभासदांना विनम्र आवाहन करण्यात येते की, निवृत्तीवेतन अंशराशीकरण पुनर्स्थापना कालावधी १५ वर्षे ऐवजी १२ वर्षे अजिबात झालेला नाही. याविषयी येणाऱ्या बातम्या, व्हिडिओ याकडे दुर्लक्ष करण्यात यावे. तसेच कोणीही अशा प्रकारच्या बातम्या प्रसारित करून सभासदांमध्ये विनाकारण संभ्रम निर्माण करू नये.**

## २७) देणगीदार :

अहवाल वर्षात खालील नावे नमूद केलेल्या सभासदांनी देणगी स्वरूपात बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनला आर्थिक सहाय्य केलेले आहे. सर्व देणगीदारांची नावे व अन्य तपशील, असोसिएशनच्या संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात येतो, याची कृपया नोंद घ्यावी.

**दि. १ एप्रिल २०२५ ते दि. ३१ मार्च, २०२६ या कालावधीतील देणगीदारांचा तपशील**

| अनु.क्र. | सभासद / देणगीदारांचे नाव | स्थळ | रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | श्री. नारायण रामचंद्र सावंत | मालाड | २१००० |
| २ | श्री. विनायक ताटके (कै. मधुकर भिकाजी ताटके यांच्या स्मृतीप्रितीर्थ) | ठाणे | १४५०० |
| ३ | श्रीम. माधुरी रमाकांत तांबे | ठाणे | ११००० |
| ४ | श्री. नयन ढोलकिया | कल्याण | ११००० |
| ५ | श्रीम. वैशाली नंदकुमार गोरे | कल्याण | १०००० |
| ६ | श्रीम. अनघा अभय वैद्य | डोंबिवली | १०००० |
| ७ | श्रीम. वीणा फाटक | डोंबिवली | १०००० |
| ८ | श्रीम. वैशाली दिवेकर | गिरगाव | १०००० |
| ९ | श्रीम. कुंदा खुरजेकर | ठाणे | १०००० |
| १० | श्रीम. रागिणी वीरकर | मुलुंड | १०००० |
| ११ | श्री. अनंत वीरकर | मुलुंड | १०००० |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | श्रीम. अनुजा अनिल आचरेकर | गिरगाव | ७००० |
| १३ | श्रीम. एलिजाबेथ येसुमित्रा | कुर्ला | ६००० |
| १४ | श्री. चंद्रकांत तळेले | कल्याण | ५१०१ |
| १५ | श्री. चंद्रशेखर फडके | डोंबिवली | ५०११ |
| १६ | श्रीम. रेखा कुंभारे | ठाणे | ५००१ |
| १७ | श्रीम. नम्रता सुहास देशपांडे | बदलापूर | ५००१ |
| १८ | श्री. कमलाकर क्षीरसागर | डोंबिवली | ५००१ |
| १९ | श्री. आनंदराव सूर्यवंशी (कै. गोतमाई सूर्यवंशी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ) | कल्याण | ५००१ |
| २० | श्री. वामन वासुदेव कुटुंबे | वाशी | ५००० |
| २१ | श्रीम. शोभना विनायक वझे | मुलुंड | ५००० |
| २२ | श्रीम. अंजेलिना डि'सोजा | ठाणे | ५००० |
| २३ | श्रीम. शिल्पा नाईक | चेंबूर | ५००० |
| २४ | श्रीम. प्रकाश शेजवळकर | कल्याण | ५००० |
| २५ | श्रीम. मीना मालगावकर | गोरेगाव | ५००० |
| २६ | श्री. दिलीप मारुती साळवी | शहर | ५००० |
| २७ | श्रीम. इंदिरा उरणकर | ठाणे | ५००० |
| २८ | श्रीम. कल्पलता भिडे | बोरीवली | ५००० |
| २९ | श्री. उल्हास भिडे | बोरीवली | ५००० |
| ३० | श्री. विलास धोणसाळे | ठाणे | ५००० |
| ३१ | श्रीम. वृंदा गोगटे | डोंबिवली | ५००० |
| ३२ | श्री. अनंत दत्तात्रय केळकर | मुलुंड | ५००० |
| ३३ | श्रीम. उर्मिला गोविंद लिमये | ठाणे | ५००० |
| ३४ | श्री. मिनेश शहा | ठाणे | ५००० |
| ३५ | श्रीम. सुजाता गोपाळ परब | ठाणे | ५००० |
| ३६ | श्री. महादेव सोहनी (कै. मीना सोहनी यांच्या स्मृतीप्रितीर्थ) | मुलुंड | ५००० |
| ३७ | श्रीम. माधवी मयेकर | डोंबिवली | ५००० |
| ३८ | श्रीम. सुषमा वसंत भदे | कल्याण | ५००० |
| ३९ | श्रीम. विजया काशिनाथ खानोलकर | वसई | ३५०१ |
| ४० | डॉ. मारुती श्रीराम नलावडे | मुलुंड | ३२५० |
| ४१ | श्रीम. सुषमा अनंत लाड | डोंबिवली | ३००० |
| ४२ | श्रीम. छाया कांचन चित्रे | डोंबिवली | ३००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४३ | श्री. प्रकाश वसंत फणशीकर | डोंबिवली | ३००० |
| ४४ | श्रीम. तृप्ती विवेक देसाई | मुलुंड | ३००० |
| ४५ | श्री. रमेश वासुदेव पत्की | विलेपार्ले | ३००० |
| ४६ | श्री. शशिकांत धनजी | उत्तर प्रदेश | ३००० |
| ४७ | श्रीम. शुभांगी सुनिल जुवेकर | ठाणे | २५०१ |
| ४८ | श्रीम. मेघा वसंत राणे | मुलुंड | २५०० |
| ४९ | श्रीम. वसंत विष्णू राणे | मुलुंड | २५०० |
| ५० | श्री. जयंत रामचंद्र दातार | डोंबिवली | २५०० |
| ५१ | श्रीम. वैशाली पालसेकर | डोंबिवली | २५०० |
| ५२ | श्रीम. अपर्णा मोहन गावंड | ठाणे | २५०० |
| ५३ | श्रीम. सविता गावंड | ठाणे | २५०० |
| ५४ | श्री. नामदेव एस. थोरात | परेल | २२२५ |
| ५५ | श्रीम. सुनीता कोरडे | ठाणे | २१०० |
| ५६ | श्रीम.मंगला बांदेकर | मुलुंड | २००१ |
| ५७ | श्रीम. नयना सांगळे | मुलुंड | २००० |
| ५८ | श्री. सुहास खामकर | ठाणे | २००० |
| ५९ | श्रीम. अनुराधा अशोक जोशी | डोंबिवली | २००० |
| ६० | श्रीम. नीता मांजरेकर | गोरेगाव | २००० |
| ६१ | श्री. अनंत पाटील | वसई | २००० |
| ६२ | श्रीम. शोभना रवींद्र दातार | पुणे | २००० |
| ६३ | श्री. मधुकर आंबोणकर | ठाणे | २००० |
| ६४ | श्रीम. अंजली मनोज वाघ | ठाणे | २००० |
| ६५ | श्रीम. कांचन कोळी | ठाणे | २००० |
| ६६ | श्रीम. रेखा ताम्हाणेकर | ठाणे | २००० |
| ६७ | श्री. शिवराम अतकारी | मुलुंड | २००० |
| ६८ | श्रीम. सविता विनायक महाशब्दे | ठाणे | २००० |
| ६९ | श्री. विजयकुमार पोतदार | बदलापूर | १५०० |
| ७० | श्री. दिलीप विनायक करंदीकर | डोंबिवली | ११११ |
| ७१ | श्री. रवींद्र ढवळीकर | डोंबिवली | ११११ |
| ७२ | श्री. रवींद्र बाविस्कर | कल्याण | ११११ |
| ७३ | श्री. विनायक रेगे | गोरेगाव | ११०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७४ | श्री. अंकुश कृष्णाजी पाटील | कल्याण | ११०१ |
| ७५ | श्रीम. ज्योती नवाथे | डोंबिवली | ११०० |
| ७६ | श्रीम. प्रीतम प्रफुल्ला गुप्ते | कल्याण | ११०० |
| ७७ | श्रीम. शैला रामचंद्र यवलकर | कल्याण | ११०० |
| ७८ | श्रीम. प्राची पालव | मुलुंड | १०७० |
| ७९ | श्रीम. शोभा विजयेंद्र अलूर | ठाणे | १००१ |
| ८० | श्री. प्रदीप भोसले | मुलुंड | १००१ |
| ८१ | श्रीम. गीता गोविंद जोशी | वसई | १००० |
| ८२ | श्रीम. संगीता कार्व्हालो | वसई | १००० |
| ८३ | श्रीम. सुगंधा पराडकर | गोरेगाव | १००० |
| ८४ | श्रीम. उषा कंटक | गोरेगाव | १००० |
| ८५ | श्रीम. मनीषा शेटये | गोरेगाव | १००० |
| ८६ | श्री. प्रकाश मटकर | गोरेगाव | १००० |
| ८७ | श्रीम. तारा वैराळ | मुलुंड | १००० |
| ८८ | श्रीम. शीतल राणे | मीरा रोड | १००० |
| ८९ | श्रीम. धनु गोहिल | कुर्ला | १००० |
| ९० | श्री. अनिल सामंत | दादर | १००० |
| ९१ | श्रीम. सरिता साळवी | बदलापूर | १००० |
| ९२ | श्री. अच्युत देशपांडे | डोंबिवली | १००० |
| ९३ | श्रीम. सुचेता बोडस | डोंबिवली | १००० |
| ९४ | श्री. शंकर सावळाराम सामंत | दादर | १००० |
| ९५ | श्रीम. फातिमा डि'कॉस्टा | वसई | १००० |
| ९६ | श्री. दत्तू राजे | कल्याण | १००० |
| ९७ | श्री. दत्तू अत्रे | कल्याण | १००० |
| ९८ | श्री. जयप्रकाश यादव | मुलुंड | १००० |
| ९९ | श्रीम. माया घडे | कल्याण | ५०० |
| १०० | श्रीम. वसुंधरा ओगले | बदलापूर | ५०० |
| १०१ | श्री. इम्तियाज अहमद शेख | ठाणे | ५०० |
| १०२ | श्रीम. सुरेखा नाईक | ठाणे | ३१० |
| १०३ | श्रीम. स्मिता शांताराम लळीत | डोंबिवली | ३१० |

## २८) संस्थेची विभागीय कार्यालये :

सभासदांशी चर्चा करणे, सुसंवाद साधणे, विविध विषयी त्यांना मार्गदर्शन करणे, यथाशक्ती सहाय्य करणे, समस्या सोडवणे, इत्यादी कार्यासाठी आठवड्यातून एक दिवस किंवा गरजेनुसार संबंधित विभागातील कार्यकर्ते/पदाधिकारी एकत्र जमतात. काही स्थानी जागा मिळाल्या आहेत. जेथे जागा उपलब्ध नाही, तेथील आपले कार्यकर्ते त्यांच्या घरूनच संस्थाकार्य करीत आहेत. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| क्र | विभाग | स्थळ | वेळ व दिवस | कार्यकर्त्यांचे नाव | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुलुंड विभाग | टी-वॉर्ड कार्यालय,<br>क्र.२० (सभागृह),<br>पहिला मजला,<br>मुलुंड-४०००८० | मंगळवार : सायं<br>४.०० ते ५.३० | डॉ. मारुती नलावडे<br>श्री. अनंत केळकर<br>श्री. शिवराम अतकरी<br>श्री. बधान<br>श्री. गुरव<br>श्रीम. मंदा कुलकर्णी<br>श्रीम. स्नेहा गोसावी | ९८६९७२२२३८<br>९८६९४०२२६३<br>९८९२९१६३२४<br>९९८७५५३५६६<br>९७०२१३३१३९<br>९३२१०३३५७४<br>९८२०७८०४७० |
| २ | बोरीवली विभाग | आर (मध्य) विभाग<br>कार्यालय, नवीन इमारत,<br>२ रा मजला सभागृह,<br>बोरिवली (प.) | शनिवार : सायं<br>४.०० ते ६.०० | श्री. सुरेश सावंत<br>श्री. रमेश राणे<br>श्री. नागेश सामंत<br>श्रीम. अनिता गोंधळेकर<br>श्री. संजय तोरसकर | ९८६९१८६८१२<br>९८६९०६६५२३<br>९८६९५३१६९८<br>७०४५३५३५०५<br>९९६९४०९८९७ |
| ३ | वसई विभाग | कुलकर्णी हॉल,<br>वसई (प.) | सायं ४.०० ते ६.००<br>दर महिन्याचा<br>पहिला बुधवार | श्री. काशिनाथ पाटील<br>श्रीम. हेमलता हटकर<br>श्री. अनंत पाटील<br>श्री. जॉन गोन्साल्वीस<br>श्रीम. मेबल गोन्सालवीस<br>श्रीम. विजया खानोलकर<br>श्रीम. आंजेलिन नुनीस | ९८२३४२४९६९<br>९१३७०६१८०३<br>९८९२३४६५६२<br>९३२२७५८८०४<br>९८१९७१०४८३<br>७७१९८४८९७९<br>९७३०४४५७९६ |
| ४ | डोंबिवली विभाग | क्रीडा भवन, व्ही. पी. रोड,<br>पेंडसे नगर, डोंबिवली (पूर्व) | शनिवार : सायं<br>५.१५ ते ६.३० | श्री. कमलाकर क्षीरसागर<br>श्री. दिलीप करंदीकर<br>श्री. जयंत दातार<br>श्री. चंद्रशेखर फडके<br>श्रीम. अनुजा रानडे<br>श्री. प्रदीप कुलकर्णी | ९८१९१३८२५४<br>९८३३८५६८५२<br>९८६९६७२३७१<br>९६१९७४९९६४<br>९८२०५१२३८८<br>९७६९२२००५० |
| ५ | कल्याण विभाग | उपलब्धतेनुसार | सायं ४:०० ते ६:००<br>महिन्यातून एकदा | श्री. अभय चौबळ<br>श्री. रवींद्र बाविस्कर<br>श्री. चंद्रकांत तळेले | ९९२०५७५७३१<br>९००४३९०७२७<br>९९८७२७३०२० |
| ६ | बदलापूर विभाग | कालुराम कॉम्प्लेक्स,<br>'ए' विंग, वाणी आळी,<br>विठ्ठल मंदिराजवळ,<br>बदलापूर (पूर्व),<br>जिल्हा -ठाणे -४२१५०३ | आवश्यकतेनुसार | श्री. विजयकुमार पोतदार<br>श्री. के. एन. राजपूत<br>श्रीम. सुमित्रा कुलकर्णी<br>श्री. विश्वनाथ जाधव<br>श्रीम. अपर्णा पेठकर<br>श्री. रंगनाथ थोपटे | ९७६६५२५२६७<br>८६९८७३१३७६<br>९४२२४८०२९९<br>९८१९५९२९६९<br>९३२५५७६४७५<br>८८२८४२३८८४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | कर्जत विभाग | – | – | श्री. रामनाथ गांगल | ९४२३८९१३७९ |
| ८ | चेंबूर | अमेय सोसायटी सी-६, टिळक नगर, टर्मिनल समोर, चेंबूर | शनिवार : सायं ४.०० ते ६.०० | श्रीम. शिल्पा नाईक<br>श्रीम. प्रमिला कोंडगेकर<br>श्रीम. शकुंतला थोरात<br>श्रीम. सुष्मिता चिकोर्डे | ९८२०२२२०७५<br>९३२३७१९५९०<br>९००४०७८४६४<br>९३२४७९७३१० |
| ९ | ठाणे | उपजल अभियंता (प्रचालने) यांचे कार्यालय, हाय स्ट्रीट मॉलच्या समोर, कापूरबावडी, ठाणे (प) - ४००६०७ | दरमहा तिसऱ्या आठवड्यातील एक दिवस सोयीप्रमाणे स. १०:०० ते १२.०० | श्री. सुहास खामकर<br>श्रीम. अलका जोशी<br>श्रीम. वंदना शिर्के<br>श्री. सुरेन्द्र भोई<br>श्री. मधुकर आंबोणकर<br>श्री. प्रभाकर मोहिते<br>श्रीम. रेखा ताम्हणेकर | ९८२०८४०२५३<br>९३७२६१३९०८<br>७०४५६४९३३५<br>९९६९३८७८५८<br>९९६९१६६६८२<br>९८२०९३७०२८<br>९००४२८१६१० |
| १० | गोरेगाव | पी/साऊथ-विभाग कार्यालय, सभागृह, दुसरा मजला, गोरेगाव - ४००१०४ | आवश्यकतेनुसार | श्रीम. नीता मांजरेकर<br>श्री. अजित कदम<br>श्री. श्रीराम जोशी<br>श्रीम. स्वरदा दाते<br>श्रीम. नीलिमा जवंजाळ | ९६५३३२८७५६<br>९३७२३८५३४१<br>९८६९६५८४२२<br>९९६७३७८५८२<br>९८९२८३४५२० |
| ११ | शहर | उपलब्धतेनुसार | उपलब्धतेनुसार | श्री. सतिश आवटे<br>श्री. शरद कुवेसकर<br>श्रीम. अनुजा आचरेकर<br>श्रीम. नामदेव थोरात<br>श्री. सुधीर शिशुपाल<br>श्री. प्रतिमा पवार | ९८६७७२०३२५<br>९८६९४६४५४४<br>९८३३१९२८२१<br>९३२२२३८७२०<br>९८९२१९०८०५<br>९९८७७७९९४७ |
| १२ | पुणे | उपलब्धतेनुसार | आवश्यकतेनुसार | श्री. सुधीर सावदेकर<br>श्री. मणेरीकर<br>श्रीम. बहुतुले<br>श्रीम. शरद कुलकर्णी | ९८११९७५४४६६<br>८१०८५१४५१४<br>९८६९१०८५५५<br>९८२०५६६००८ |

## २९) दि. १ एप्रिल, २०२५ ते दि. ३१ मार्च, २०२६ या कालावधीत संस्थेस माहिती प्राप्त झालेल्या दिवंगत सभासदांचा तपशील :

| अनु.क्र. | दिवंगत सभासदाचे नावं | स्थळ | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्री. अजित जोशी | डोंबिवली | |
| २. | श्री. प्रकाश घाणेकर | डोंबिवली | |
| ३. | श्रीम. वासंती आपटे | डोंबिवली | २४.०४.२०२५ |
| ४. | श्री. हिराजी महादेव धोत्रे | दादर | |
| ५. | श्री. अरविंद भास्कर मादुसकर | पुणे | ०८.०६.२०२५ |
| ६. | श्री. सदानंद बाळाजी चाळके | कळवा | २३.०४.२०२६ |
| ७. | श्री. रविंद्र रामचंद्र दातार | पुणे | १९.०५.२०२५ |
| ८. | श्री. लुद्रिक सिलू देगू | वसई | ०६.०७.२०२५ |
| ९. | श्री. हेमंत विनायक पटवर्धन | डोंबिवली | २०.०७.२०२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | श्री. अमृतलाल बेचरदास राठोड | दादर | २६.०४.२०२५ |
| ११. | श्री. शिवाजी वाळुंज | भांडुप | १८.०८.२०२५ |
| १२. | श्रीम. सुप्रिया जोग | कल्याण | १५.०८.२०२५ |
| १३. | श्री. नरेंद्र चौधरी | कल्याण | १८.०९.२०२५ |
| १४. | श्री. मनोहर शांताराम चव्हाण | दादर | |
| १५. | श्रीम. संध्या गजानन नडे | भांडुप | २४.०९.२०२५ |
| १६. | श्री. चंद्रकांत विठू कांबळे | परेल | २७.०६.२०२५ |
| १७. | श्री. बंगाळे प्रमोद वामन | दहिसर | २२.१०.२०२५ |
| १८. | श्रीम. जान्हवी मधुसूदन करलकर | दादर | १७.०७.२०२५ |
| १९. | श्रीम. सुमित्रा तुळशीराम जाधव | टिटवाळा | ३०.१०.२०२४ |
| २०. | श्री. विठ्ठल नारायण श्रोती | मुलुंड | १७.११.२०२५ |
| २१. | श्री. रामा लक्ष्मण पवार | सांताक्रुझ | २३.०३.२०१६ |
| २२. | श्री. विकास अनंत हरचेकर | कुर्ला | २०.११.२०२५ |
| २३. | श्री. ध्रुवकांत विनायकराव उपाध्याय | मुंबई सेंट्रल | ०२.११.२०२५ |
| २४. | श्रीम. रजनी नंदकुमार गडकरी | दादर | १५.११.२०२५ |
| २५. | श्रीम. अनुपमा अशोक बेलापूरकर | मुलुंड | २६.१२.२०२५ |
| २६. | श्री. हरमलकर मकरंद पांडुरंग | वडाळा | डिसेंबर २०२५ |
| २७. | श्रीम. अनुराधा कर्वे | मुलुंड | ऑक्टोबर २०२५ |
| २८. | श्रीम. गंगुबाई लक्ष्मण सोनकुसरे | दहिसर | ३१.१२.२०२५ |
| २९. | श्रीम. वैद्य मृणाल मिलिंद | ठाणे | २०२५ |
| ३०. | श्रीम. रतिलाल धना राठोड | दादर | १७.०६.२०२५ |
| ३१. | श्री. अशोक देशमुख | मुलुंड | ०६.०२.२०२६ |
| ३२. | श्रीम. सीमा रमेश चोरगे | दादर | ०९.०८.२०२४ |
| ३३. | श्रीम. माधवी मनोहर भोसले | दादर | ०६.०३.२०२६ |
| ३४. | श्रीम. सीमा शेखर सहस्त्रबुद्धे | बोरीवली | १२.०२.२०२६ |
| ३५. | श्री. रामचंद्र महादेव शिंदे | डोंबिवली | ११.०३.२०२६ |
| ३६. | श्री. सुभाषचंद्र गोविंद सुर्वे | डोंबिवली | १४.०३.२०२६ |
| ३७. | श्रीम. नानू करसन जोगडिया | माझगाव | ३०.११.२०२५ |
| ३८. | श्री. रमेश शंकर कदम | मुलुंड | २१.०३.२०२६ |
| ३९. | श्री. दला आंबा सुमेसरा | बोरीवली | |
| ४०. | डॉ. हरीष मनोहर वालावलकर | दादर | १२.०२.२०२६ |
| ४१. | श्री. रामभाऊ मारुती भुजबळ | मुलुंड | ३०.०३.२०२६ |
| ४२. | श्रीम. उज्वला शेवडे | ठाणे | फेब्रुवारी २०२६ |

**।। सर्व दिवंगतांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली ।।**

**३०) लेखापरीक्षण :**

१ एप्रिल, २०२३ पासून असोसिएशनचे लेखे परीरक्षित करण्याच्या कामाचे संगणकीकरण करण्यात आले असून, सौ. मनाली गावड, दादर यांच्याकडे हे दायित्व सोपविण्यात आले आहे. या उपलब्धीबद्दल असोसिएशनच्या सनदी लेखा परीक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे. **श्री. दिलीप करंदीकर,**

**श्री. विजयकुमार पोतदार,** श्री. चंद्रशेखर फडके यांनी सनदी लेखापाल व अंतर्गत हिशेब तपासनीस यांचेशी वारंवार संपर्क साधून, जमाखर्च, ताळेबंद, इत्यादी तयार करून घेऊन लेखापरीक्षण पूर्ण करून घेतले. त्याबद्दल त्यांचे संस्थेतर्फे विशेष अभिनंदन!

**संस्था कार्यालय :** **श्री. दिलीप करंदीकर,** हे कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत असून **सौ. रागिणी गुरव (लिपिक) व सौ. मनाली गावड (लेखा सहाय्यक)** सर्व दिवस कार्यालयीन वेळेत उपस्थित असतात. **श्री. प्रकाश खर्डे, हे सेवक** म्हणून सर्व दिवस कार्यालयीन वेळेत हजर असतात.

**३१) आभार :**

१. मनपा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (सा.प्र), उपायुक्त (वित्त), प्रमुख लेखापाल (कोषागार व वित्त), अधिष्ठाता, लो. टि. म. सर्वसाधारण रुग्णालय, उपप्रमुख लेखापाल (निवृत्ती वेतन कर्मचारी/ प्रशासकीय सुधारणा) व त्यांचे खात्यातील सर्व कर्मचारी यांचे, निवृत्ती वेतन धारकांच्या विविध समस्या सोडवण्यास सहकार्य केल्याबद्दल.

२. सहाय्यक आयुक्त (जी/एन) व त्यांचे कर्मचारी यांचे, मासिक सभांसाठी सभागृह, इतर संलग्न सोयीसवलती, दूरध्वनी सेवा, इत्यादी उपलब्ध करून दिल्याबद्दल.

३. सहाय्यक आयुक्त (टी-विभाग, पी-दक्षिण विभाग, आर मध्य विभाग) यांचे, विभागीय सभांसाठी सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल.

४. सनदी लेखापाल व चार्टर्ड अकाऊंटंट श्री. निलेश म्हापसेकर व अंतर्गत हिशेब तपासनीस, श्री. प्रदीप कुलकर्णी यांचे सन २०२५-२०२६ चे लेखा परीक्षण केल्याबद्दल व वेळोवेळी उपयुक्त मार्गदर्शनाबद्दल.

५. दैनिक नवाकाळ, दैनिक सामना, नवराष्ट्र या वर्तमानपत्रांनी संस्थेच्या विविध वृत्तांना प्रसिद्धी दिल्याबद्दल.

६. दादर माटुंगा कल्चरल सेंटर, माटुंगा यांनी वार्षिक सभेसाठी त्यांचे सभागृह उपलब्ध केल्याबद्दल तसेच मयूर साऊंड सर्व्हिस यांचे, योग्य ती साधनसामग्री पुरवल्याबद्दल.

७. संस्थेस प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वेळोवेळी मदत करणारे कार्यकर्ते, हितचिंतक, देणगीदार व जाहिरातदार.

८. मराठा मंडळ, मुलुंड, संत श्री. राम मारूती सभागृह, कल्याण, केशव गोरे स्मारक सभागृह, गोरेगाव शंकराचार्य मंदिर सभागृह वसई (निर्मळ), सहकार नगर मनपा शाळा, चेंबूर, मिठागर मनपा शाळा, मुलुंड, सुयोग मंगल कार्यालय, डोंबिवली, उपजल अभियंता, कापूरबावडी, यांचे विभागीय संमेलनासाठी, महिला मेळाव्यासाठी सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल.

**३२) श्रद्धांजली :**

अहवाल वर्षात दिवंगत झालेले उपमुख्यमंत्री कै. अजितदादा पवार, संस्थेचे माजी कोषाध्यक्ष, कै. हेमंत पटवर्धन, मुलुंड विभागातील खंदे कार्यकर्ते कै. शिवाजी वाळुंज, संस्थेस माहिती प्राप्त झालेले ४१ दिवंगत सभासद, प्रसिद्ध आणि दिवंगत झालेले सर्व ज्ञात/अज्ञात सभासद, देशकार्यार्थ शहीद झालेले सर्व सैन्य - दलातील रक्षणकर्ते, क्रीडा/ संगीत/ सामाजिक/ सांस्कृतिक/ राजकीय क्षेत्रातील दिवंगत झालेले **सर्व मान्यवर यांना बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| **डॉ. मारुती नलावडे** | **श्री. कमलाकर क्षीरसागर** |
| (कार्यवाह) | (अध्यक्ष) |

# परिशिष्ट - अ

**बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या, शनिवार, दि. १३ सप्टेंबर, २०२५ रोजी, दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, माटुंगा (प) येथील सभागृहात, सकाळी ११:३० वाजता, संपन्न झालेल्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार **दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११:३०** वाजता दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र, माटुंगा (प), मुंबई ४०००२८ येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सभेला सकाळी ११:३० वाजता २०० सभासद उपस्थित होते. गणसंख्यापूर्ती झाल्याने सकाळी ११:३० वाजता एकूण २०० सभासदांच्या उपस्थितीत, मान. श्री. कमलाकर क्षीरसागर यांचे अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात झाली.

संस्थेचे कार्यवाह डॉ. मारुती नलावडे यांनी सर्वप्रथम सभेला उपस्थित असलेल्या सर्व सन्मानीय सभासद, कार्यकारिणीचे पदाधिकारी व सदस्य / निमंत्रित सदस्य, मार्गदर्शक मंडळाचे सदस्य, या सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर अहवाल वर्षात निधन पावलेले १) मनपाचे निवृत्त अतिरिक्त आयुक्त तथा माजी अध्यक्ष, कै.श्री. विजयसिंह पाटणकर २) मुलुंड विभागाचे संस्थापक, कै.श्री. केशव घाटपांडे ३) गोरेगाव विभागातील व संस्थेला कार्यालयीन कामात सक्रिय मदत करणाऱ्या तळमळीच्या कार्यकर्त्या, कै.श्रीम. माधवी शेंडे ४) आपल्या आयुष्याचं शतक पूर्ण करणारे माणगावस्थित, कै.श्री. नाना सावंत ५) वसई विभागातील सक्रिय कार्यकर्त्या, कै.श्रीम. विजया पाटील ६) संस्थेचा खजिना समर्थपणे सांभाळणारे खजिनदार, कै.श्री. हेमंत पटवर्धन ७) मुलुंड विभागातील हुरहुन्नरी व उगवते नेतृत्व, कै.श्री. शिवाजी वाळुंज ८) कल्याण विभागातील तळमळीच्या कार्यकर्त्या, डॉ. श्रीम. सुप्रिया जोग ९) अहवाल वर्षात निधन पावलेले इतर सर्व ज्ञात/अज्ञात सभासद १०) प्रसिद्ध उद्योजक, कै.श्री. रतन टाटा, काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले भारतीय नागरिक, अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेत मृत्यू पावलेले नागरिक, कर्मचारी व विद्यार्थी, देशकार्यार्थ शहीद झालेले सर्व सैन्य दलातील रक्षणकर्ते, क्रीडा, संगीत, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील सर्व दिवंगत, यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर कार्यवाह **डॉ. नलावडे** यांनी या वार्षिक अहवालाविषयी महत्त्वपूर्ण निवेदन केले. ते पुढीलप्रमाणे :

१) सन २०२४-२५ चा ५१ वा वार्षिक अहवाल, लेखापरीक्षित जमाखर्च, ताळेबंद, अंदाजपत्रक (सन २०२५-२६), इ. दस्तावेज सुमारे ५९९२ पेक्षा जास्त सभासदांना नियत वेळेपूर्वी, त्यांच्या ई-मेल पत्त्यावर निर्गमित केले आहेत.

२) उपरोक्त सर्व दस्तावेज संस्थेच्या **www.bmpa.co.In** या संकेतस्थळावरही उपलब्ध करण्यात आले आहेत. याशिवाय संस्थेच्या सर्व शाखांच्या **WhatsApp** या समाजमाध्यमावरही प्रसारित केले आहेत.

३) सर्व ११ विभाग प्रतिनिधींनी मागणी केलेल्या संख्येनुसार, एकूण ११७०, इतक्या अहवालाच्या छापील प्रती, संबंधित विभागांना उपलब्ध करून दिल्या असून त्या प्रत्येक विभागाकडे घरपोच केल्या आहेत.

४) आज, वार्षिक सभेच्या दिवशीही, ज्या उपस्थित सभासदांकडे अहवालांच्या प्रती नाहीत, त्या सर्वांना त्या उपलब्ध करून दिल्या आहेत.

५) वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ''दै. नवाकाळ'' व ''दै. सामना'' या वर्तमानपत्रांत दि. २६.०८.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

त्यानंतर डॉ. नलावडे, कार्यवाह यांनी या वार्षिक अहवालातील वैशिष्ट्यपूर्ण बाबींची माहिती संक्षिप्त रूपात सभागृहासमोर सादर केली, ती पुढीलप्रमाणे :

१) संस्थेची वाढ व विस्तार झपाट्याने होत असून संस्थेच्या ११ शाखा कार्यरत आहेत. एकूण सभासद संख्या २५६०२ इतकी झालेली आहे.
२) दि. ०१.०४.२०१५ ते ३१.०३.२०२५ पर्यंतचे सर्व प्रलंबित बदल अहवाल (Change Reports) धर्मादाय आयुक्तांकडून मंजूर करण्यात आले आहेत.
३) संस्थेची सुधारित घटना धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मंजूर केलेली आहे.
४) आता सभासद होणे सोपे झाले असून घरबसल्या Q. R. Code द्वारा सभासदत्व फी, देणगी, इ. रकमा देता येतात. (Q. R. Code पृष्ठ क्र.०४ )
५) संस्थेला महानगरपालिकेकडून Vender Code (Rege No. 0000052581) प्राप्त झालेला असून महानगरपालिकेने सभासदांची वसूल केलेली वर्गणी संस्थेच्या बँक खात्यात मनपाकडून लवकर जमा केली जाते.
६) सभासदांच्या माहितीकरिता ७ व्या वेतन आयोगाचा महागाई सहाय्य तक्ता प्रस्तुत अहवालात दिलेला आहे.
७) वैद्यकीय योजनेची सविस्तर माहिती अंतर्भूत केलेली आहे.
८) Online पद्धतीने हयातीचे दाखले सादर करणे व त्यानंतर निवृत्तांनी घ्यावयाची काळजी, ही माहिती प्रस्तुत अहवालाद्वारे पुरवण्यात आली आहे.
९) संस्थेच्या वेबसाईटची माहिती सविस्तरपणे दिलेली आहे.
१०) मागील वर्षभरात सोडवलेल्या Land mark स्वरूपाच्या तक्रारींची वानगीदाखल माहिती नमूद केलेली आहे.
११) सुवर्ण महोत्सवी सांगता सोहळ्यांची, विभागनिहाय माहिती, प्रस्तुत अहवालात समाविष्ट केली आहे.
१२) संस्थेच्या GST कायद्याअंतर्गत केलेल्या नोंदणीची माहिती दिलेली आहे.
(GST Rege no. 27AAATM6675R1ZN)
१३) MY BMC ॲपचा वापर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.
१४) वय वर्षे ८० + वरील निवृत्ती / कुटुंब निवृत्ती वेतनवाढीचा सुधारित तक्ता दिलेला आहे.
१५) विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभाची माहिती अंतर्भूत केलेली आहे. दि. १८.१२.२०२५ रोजी होणाऱ्या गुणगौरव व पारितोषिक वितरणासाठी संबंधित सभासदांनी त्यांच्या पाल्यांचे प्रस्ताव दि. ३०.११.२०२५ पर्यंत पाठवावयाचे आहेत.
१६) पेन्शन स्लीपविषयी माहिती तसेच पेन्शन स्लीपवर येणारी संक्षिप्त रूपे, त्यांच्या अर्थासह नमूद केलेली आहेत. शिवाय पेन्शन स्लीप मिळण्यासाठी करावयाचा अर्ज नमुना उपलब्ध करून दिला आहे. (पृष्ठ क्र. ४०)
१७) अहवालासोबत २१ सप्टेंबर, २०२४ च्या ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त देण्यात आलेले आहे.

यानंतर विषय पत्रिकेनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**विषय क्र. १ :- मागील (५० व्या)वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (मागील वर्षी, वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार, दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित केली होती.)**

उपरोक्त विषयी डॉ. नलावडे यांनी निवेदन केले. ते पुढीलप्रमाणे :

मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी वार्षिक अहवाल २०२४-२५ मध्ये, दि. २१ सप्टेंबर, २०२४ रोजी संपन्न झालेल्या ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभासदांच्या माहितीसाठी (पृष्ठ क्र. ५१ ते ६३ वर) जोडण्यात आलेले आहे.

सदर इतिवृत्त उपस्थित सर्वांनी वाचले असेलच, तरीही त्याचा संक्षिप्त आढावा सभेसमोर घेण्यात आला व घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयाची माहिती देण्यात आली. ती पुढीलप्रमाणे.

* वैद्यकीय सहाय्याची रक्कम रु.४०,०००/– वरून रु. ५०,०००/– इतकी वाढविण्यात आलेली आहे. तसेच एका डोळ्याच्या शस्त्रक्रियेसाठी कमाल रु. १०,०००/– इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.
* ५० वा अहवाल, जमाखर्च, ताळेबंद, सन २०२३–२४ चे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले.

यानंतर कांही सभासदांनी वार्षिक अहवाल सन २०२४–२५ वर कांही महत्त्वाच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. खालीलप्रमाणे :

१) वार्षिक अहवाल अतिशय परिश्रमपूर्वक, अभ्यासपूर्वक तयार केला असून, त्यामध्ये बऱ्याच विषयाला स्पर्श करून सखोल माहिती दिली आहे.
२) अतिशय सुंदर व घरबसल्या संस्थेची माहिती उपलब्ध करून देणारा, असा हा अहवाल आहे.
३) अहवालातील शब्द आणि शब्द खरा असून तो अत्यंत काटेकोरपणे मांडला आहे.
४) वार्षिक अहवाल सर्वार्थाने उत्कृष्ट आहे. तो आपल्या असोसिएशनच्या कारभाराचा स्वच्छ आरसा असून, वाचून लक्षात येते की, विद्यमान कार्यकारणीचा, आम्हा सभासदांना सेवानिवृत्तीनंतरही भरभक्कम आधार वाटतो. त्यामुळे आम्ही नशीबवान आहोत.
५) संग्रही ठेवण्यासाठी सुंदर दस्तावेज आहे.

या काही प्रतिनिधिक प्रतिक्रिया आहेत.

''एवढा उत्तम, वाचनीय, माहितीपूर्ण व अभ्यासपूर्ण अहवाल तयार करण्यासाठी संस्था कार्यवाह डॉ. नलावडे यांनी कठोर परिश्रम घेतलेले आहेत. त्यांना आम्ही मनापासून धन्यवाद देतो.'' असे मत श्री. प्रकाश सातवे, श्री. सतीश जाधव, श्री. राज सोलकर, श्री. काशिनाथ पाटील, श्रीम. मंदा कुलकर्णी, इत्यादी अनेक सभासदांनी व्यक्त केले.

सदर अहवाल तयार करण्यासाठी श्रीम. शिल्पा नाईक व संस्था अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर यांचीही मोलाची मदत झाल्याची भावना डॉ. नलावडे यांनी व्यक्त केली. हे दोघे तसेच उपरोक्त सर्व सभासदांप्रती डॉ. नलावडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

चर्चेअंती पुढील ठराव मांडण्यात आला.

**ठराव क्र. १ : ''ठराव करण्यात येतो की, ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा झालेली असून दि.२१ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास कोणत्याही दुरुस्ती विना मंजूरी देण्यात यावी.''**

**ठराव क्र. १ सर्वानुमते मंजूर**

**सूचक :– श्री. प्रकाश सातवे (स.क्र. २०३१०)**

**अनुमोदक :– श्री.सतीश जाधव (स.क्र. २४२४५)**

**विषय क्र. २ :– ५१ वा वार्षिक अहवाल (१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५), या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षित जमाखर्च, ताळेबंद वाचून मंजूर करणे.**

संस्था खजिनदार हेमंत पटवर्धन यांचे जून, २०२५ मध्ये निधन झालेले असल्याने संस्थाध्यक्ष मान. कमलाकर क्षीरसागर यांनी सन २०२४–२५ चा लेखापरीक्षित जमाखर्च, ताळेबंद सभागृहासमोर सादर केला. त्यानंतर याविषयी झालेली चर्चा पुढीलप्रमाणे :

१) श्री. प्रकाश सातवे (स. क्र. २०३१०) यांनी प्रश्न उपस्थित केला की, प्रवास खर्चावर रु. ४,९४,४५५.१०/- (रु. चार लाख चौऱ्याण्णव हजार चारशे पंचावन्न पैसे दहा फक्त) इतकी तसेच GST पोटी रु. ७६,७९०/- (रु. शहात्तर हजार सातशे नव्वद फक्त) इतकी रक्कम खर्च झालेली आहे. त्याविषयी सविस्तर खुलासा करावा.

सदर विषयी संस्थाध्यक्षांनी अशी महिती दिली की, अहवाल वर्षात संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी सांगता सोहळ्यानिमित्त अनेक पदाधिकारी / कार्यकारिणी सदस्यांना सर्व विभागातील कार्यक्रमस्थळी प्रवास करावा लागलेला आहे. तसेच पदाधिकारी व अन्य कार्यकारिणी सदस्यांना, निमंत्रित सदस्यांना मासिक सभेसाठी प्रवास खर्च दिला जातो. त्याचाही अंतर्भाव सदर एकूण रकमेत असतो.

GST संदर्भात त्यांनी अशी माहिती दिली की, संस्थेचे वार्षिक उत्पन्न रु. ५० लाखांचे वर जात असल्याने GST कायद्यानुसार संस्थेला GST अंतर्गत नोंदणी करावी लागली. त्यामुळे GST पोटी रु. ७६,७९०/- (रु. शहात्तर हजार सातशे नव्वद फक्त) ही रक्कम अदा करावी लागली. याविषयी सूट मिळविण्यासाठी केंद्र सरकारचे स्तरावर प्रयत्न करण्याचा संस्थेचा विचार आहे.

२) श्री. सतीश वाणी (स. क्र. २३८५८) यांनी विचारले की, आपण Income Tax का भरतो? आपणास सूट मिळू शकत नाही का?

उपरोक्त विषय मान. संस्थाध्यक्षांनी अशी माहिती दिली की, आपली संस्था केवळ आपल्या सभासदांसाठीच सेवा देते, समाजासाठी नाही. त्यामुळे संस्थेला १२- चे प्रमाणपत्र मिळू शकलेले नाही. मात्र आता घटना दुरुस्ती करून तीस धर्मादाय आयुक्तांनी मंजूरी दिल्यामुळे सदर प्रमाणपत्र मिळवण्याविषयी नक्कीच प्रयत्न करता येईल. सुधारित घटनेमध्ये केलेल्या बदलामुळे आता संस्था काहीना काही स्वरूपाचे समाजोपयोगी कार्य करू शकेल.

३) श्री. काशिनाथ पाटील (स. क्र. १६१७४) यांनी प्रश्न उपस्थित केला की, आपल्या संस्थेची आजीवन सभासद वर्गणी किती आहे?

संस्थेची आजीवन सभासद वर्गणी रु. ३००/- अधिक रु.१०/- प्रवेश फी इतकी आहे, असे स्पष्टीकरण देण्यात आले.

उपरोक्त सर्व शंकांचे सर्वस्वी समाधान झाले असल्याचे संबंधित सभासद व अन्य सभासदांनी सांगितले. त्यामुळे सन २०२४-२५ चा जमाखर्च, ताळेबंद बिनविरोध मंजूर करण्यात आला. याविषयीचा ठराव पुढीलप्रमाणे :

ठराव क्र. २ : **''ठरविण्यात येते की, ५१ वा वार्षिक अहवाल, सन २०२४-२५ चा लेखापरीक्षित जमाखर्च व ताळेबंद सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. तसेच सन २०२४-२५ या वर्षातील एकूण उत्पन्न रु. ३८,१०,९६९/- (रु. अडतीस लाख दहा हजार नऊशे एकोणसत्तर फक्त) असून एकूण खर्च रु. ३४,९८,३६९.२३/- (रु. चौतीस लाख अठ्ठ्याण्णव हजार तीनशे एकोणसत्तर पैसे तेवीस फक्त) इतका झाला असून शिल्लक रक्कम रु. ३,१२,५९९.७७ /- (रु. तीन लाख बारा हजार पाचशे नव्याण्णव पैसे सत्त्याहत्तर फक्त) इतकी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील श्री शिल्लकमध्ये वर्ग करण्यास, ही सभा मंजूरी देत आहे.**

**ठराव क्र. २ सर्वानुमते मंजूर**

**सूचक :- श्री. काशीनाथ पाटील (स.क्र. १६१७४)**

**अनुमोदक:- श्री. सतीश वाणी (स.क्र. २३८५८)**

**विषय क्र. ३ :- सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रक मंजूर करणे.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक मान. अध्यक्ष, श्री. क्षीरसागर यांनी सभागृहासमोर सादर केले. सदर अंदाजपत्रकावर सभागृहातील एकाही सभासदाने प्रश्न उपस्थित केला नाही. तरीही सदर अंदाजपत्रकातील प्रत्येक तरतुदी मान. संस्थाध्यक्षांनी सभागृहास स्पष्ट करून सांगितल्या.

यानंतर सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्याविषयीचा ठराव पुढीलप्रमाणे :

**ठराव क्र. ३ :- ''ठरविण्यात येते की, सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.''**

**ठराव क्र. ३ सर्वानुमते मंजूर**

**सूचक :- श्रीम. मंदा कुलकर्णी (स.क्र. २६०४२)**

**अनुमोदक:- श्रीम. मेरी डि'मेलो (स.क्र. २३५७०)**

**विषय क्रमांक ४ :- सन २०२५-२६ या वर्षासाठी मानद अंतर्गत हिशोब तपासनीसाची निवड करणे.**

कार्यवाह डॉ. नलावडे यांनी सभागृहास अवगत केले की, श्री. प्रदीप मोरेश्वर कुलकर्णी, निवृत्त उपप्रमुख लेखापाल, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि. १०.०९.२०२५ रोजी संस्थेला एक पत्र दिलेले असून सन २०२५-२६ या वर्षासाठी संस्थेचे अंतर्गत हिशोब तपासनीस म्हणून काम करण्यास संमती दिलेली आहे. त्यांनी पुढे असे निवेदन केले की, श्री. प्रदीप मोरेश्वर कुलकर्णी यांनी मागील अहवाल काळात देखील, सदर दायित्व सक्षमतेने पूर्ण केले आहे. त्यानुसार पुढील ठराव करण्यात आला.

**ठराव क्र. ४ :- ''ठरविण्यात येते की, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मानद अंतर्गत हिशोब तपासनीस म्हणून श्री. प्रदीप मोरेश्वर कुलकर्णी, निवृत्त उपप्रमुख लेखापाल, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची निवड करण्यात यावी व त्यांना नियमानुसार योग्य ते मानधन अदा करण्यात यावे.''**

**ठराव क्र. ४ सर्वानुमते मंजूर**

**सूचक :- श्री. सुधीर शिशुपाल (स.क्र. १९३२५)**

**अनुमोदक :- श्री. रवींद्र बाविस्कर (स.क्र. २१४७४)**

**विषय क्रमांक ५ :- सन २०२५-२६ चे हिशोब तपासण्यासाठी सनदी लेखापाल यांची नेमणूक करणे.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे हिशोब तपासण्यासाठी श्री. निलेश म्हापसेकर, सनदी लेखापाल यांनी त्यांच्या दि. ०८.०९.२५ रोजी संस्थेला दिलेल्या पत्रानुसार संमती दिलेली आहे. त्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव कार्यवाह डॉ. नलावडे यांनी सभागृहासमोर सादर केला.

सदर विषयी सभासद श्री. प्रकाश सातवे (स. क्र. २०३१०) यांनी प्रश्न उपस्थित केला की, एकच सनदी लेखापाल सलग किती वर्ष हिशेब तपासनीस म्हणून काम करू शकतात?

सदर विषयी संस्थाध्यक्ष मान. क्षीरसागर यांनी असे सांगितले की, श्री. निलेश म्हापसेकर हे अनेक वर्षांपासून अत्यंत वस्तुनिष्ठपणे व पारदर्शीपणे हिशेब तपासणीसाचे काम करत आहेत. तरीही भविष्यात नियुक्ती करतांना काही अडचण येणार नाही, याबाबत नक्कीच खात्री करण्यात येईल.

या उत्तरावर श्री. प्रकाश सातवे यांचे पूर्ण समाधान झाले व त्यामुळे श्री.निलेश म्हापसेकर यांचे नावास एकमताने मान्यता देण्यात आली. त्याविषयीचा ठराव पुढीलप्रमाणे :

**ठराव क्र. ५ :– ''ठराव करण्यात येतो की, सन २०२५–२६ या आर्थिक वर्षाचे हिशोब तपासण्यासाठी श्री. निलेश म्हापसेकर, सनदी लेखापाल यांची पुनर्नियुक्ती करण्यात यावी तसेच या कामासाठी त्यांना एकूण रु.२४,०००/– (रु. चोवीस हजार फक्त) इतकी रक्कम मानधन म्हणून अदा करण्यास मंजूरी देण्यात यावी.**

**ठराव क्र. ५ सर्वांनुमते मंजूर**

| | |
|---|---|
| **सूचक :– श्री.देविदास बधान** | **अनुमोदक:– श्री. बळीराम मोरे** |
| **(स.क्र. १७८११)** | **(स.क्र. १५०००)** |

**विषय क्रमांक ६ :– सन २०२५ ते २०२८ या कालावधीकरिता ११ कार्यकारिणी सदस्यांची निवड करणे.**

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या सन २०२५ ते २०२८ या कालखंडाकरिता कार्यकारिणीच्या ११ सदस्यांची निवड करण्याच्या विषयावर मान. कार्यवाह व अध्यक्षांनी आजच्या सभेत सभागृहासमोर सविस्तर विवेचन केले. ते पुढीलप्रमाणे :

* हा विषय कार्यकारणीच्या दि. २७.१२.२०२४, दि. २५.०२.२०२५, दि. १३.०३.२०२५, दि. ०३.०४.२०२५, दि. ०६.०८.२०२५ व दि. ०९.०९.२०२५ च्या सभेत सविस्तरपणे चर्चेला गेला होता.
* या सर्व सभांमधून कार्यकारिणीने सर्वांनुमते असा निर्णय घेतला की, **''कार्यकारिणीवर नूतन ११ सदस्यांची निवड ही बिनविरोध करण्यात यावी व संभाव्य ११ सदस्यांची यादी वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीसाठी सादर करावी.''**
* त्यानुसार निवडणुकीची प्रक्रिया राबविण्यासाठी दि. १३.०३.२०२५ च्या पदाधिकारी मंडळाच्या सभेत, **निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री. अनंत दत्तात्रय केळकर** यांची नियुक्ती करण्यात आली.
* निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दि. १९.०३.२५ च्या दै. नवाकाळ व दै. सामना या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि. ०२ एप्रिल, २०२५ पर्यंत इच्छुक सभासदांकडून आवेदनपत्रे मागविली. ही सूचना संस्थेच्या संकेतस्थळावरही प्रसिद्ध केली. त्यानुसार संस्थेकडे २३ सभासदांची आवेदन पत्रे प्राप्त झाली. त्यापैकी ०२ सभासदांनी माघार घेतली.
* उपरोक्त नमूद कार्यकारिणीच्या सर्व सभांमध्ये सर्वांनुमते निर्णय झाला की, ''उर्वरीत २१ सभासदांपैकी कार्यकारिणीवर पाठवावयाच्या ११ सदस्यांची निवड बिनविरोध करावी व यासंबंधीचे सर्वाधिकार मान. अध्यक्षांना द्यावेत. तसेच उर्वरित १० सभासदांना स्वीकृत सदस्य, निमंत्रित सदस्य अशा, कोणत्या न कोणत्या प्रकारे संस्था कार्यकारिणीमध्ये काम करण्याची संधी द्यावी.''
* निवडणूक निर्णय अधिकारी त्यांच्या कौटुंबिक कारणासाठी परदेशी जाणार असल्याने मान. अध्यक्षांशी झालेल्या चर्चेनुसार, त्यांनी प्रस्तावित ११ कार्यकारिणी सदस्यांची यादी मान. अध्यक्षांकडे दि. २०.०६.२०२५ रोजी सुपूर्द केली.
* दि. ०६ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या कार्यकारिणी सभेत मान. अध्यक्षांनी कार्यकारिणीच्या ११ सदस्यांची यादी सादर केली. त्यावेळी ''माझे नाव ११ सदस्यांमध्ये असायलाच हवे'' असा आग्रह श्रीम. शोभना पाटील यांनी धरला. यावर पुढील सभेत चर्चा करण्याचे ठरले.

* **पुढील म्हणजे दि. ०९ सप्टेंबर २०२५ च्या कार्यकारिणी सभेत उपस्थित सर्व २४ सभासदांना याविषयी आपली मते मांडण्याची पुन्हा एकदा संधी मान. अध्यक्षांनी दिली. यावेळी देखील श्रीम. शोभना पाटील यांचे नाव ११ सदस्यांमधे असायलाच हवे व मला पदसुद्धा मिळायलाच हवे, असा आग्रह धरला. माननीय अध्यक्षांनी त्यांना समजाविण्याचा भरपूर प्रयत्न केला व सर्वासमक्ष असे आश्वासित केले की, त्यांना स्वीकृत सभासद म्हणून घेण्यात येईल व एक सुयोग्य दायित्व सुद्धा देण्यात येईल. पदाधिकाऱ्यांची निवड घटनेप्रमाणे नवनिर्वाचित कार्यकारिणी करणार आहे. हे सुध्दा सांगण्यात आले. त्यांनी त्यास नकार दिला. अखेर २४ पैकी २२ सदस्यांनी, मान. अध्यक्षांनी, व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या ११ सदस्यांच्या नावास मान्यता दिली व सदर नावे येणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूरीसाठी सादर करण्यात यावीत, असा ठराव बहुमतांने मंजूर झाला.**
* त्यानुसार आज दि.१३.०९.२०२५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर मान. अध्यक्षांनी प्रस्तावित ११ कार्यकारिणी सदस्यांची नावे वाचून दाखवली. त्याची यादी पुढीलप्रमाणे :

१) श्री. कमलाकर क्षीरसागर – डोंबिवली विभाग
२) श्री. जयंत दातार – डोंबिवली विभाग
३) श्री. अनंत पाटील – वसई विभाग
४) डॉ. मारुती नलावडे – मुलुंड विभाग
५) श्रीम. प्रतिमा पवार – मुंबई शहर विभाग
६) श्री. शिवराम अतकरी – मुलुंड विभाग
७) श्रीम. नीता मांजरेकर – गोरेगाव विभाग
८) श्री. विजयकुमार पोतदार – बदलापूर विभाग
९) श्री. चंद्रशेखर फडके – डोंबिवली विभाग
१०) श्री. सुहास खामकर – ठाणे विभाग
११) श्री. दिलीप करंदीकर – डोंबिवली विभाग

* कार्यकारिणीने सादर केलेल्या या उपरोक्त नावांवर वार्षिक सर्वसाधारण सभेत सविस्तर चर्चा झाली. **कार्यकारिणीने सादर केलेली नावे अत्यंत योग्य असून आमचा त्यांचेवर १००% विश्वास आहे,** असे मत संपूर्ण सभागृहाने व्यक्त केले.

अशा प्रकारे वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या सर्व २०० सभासदांनी कार्यकारिणीने मांडलेल्या ११ सदस्यांच्या नावांच्या प्रस्तावास एकमुखी पाठिंबा देऊन उपरोक्त ११ सभासदांची कार्यकरिणीचे सदस्य म्हणून पुढील ३ वर्षांच्या कालखंडासाठी निवड केली. त्याविषयीचा ठराव पुढीलप्रमाणे :

**ठराव क्र. ६ :– ''ठराव करण्यात येतो की, सन २०२५ ते २०२८ या पुढील ३ वर्षांच्या कालखंडासाठी कार्यकारिणीचे सदस्य म्हणून उपरोक्त ११ सदस्यांच्या नावास ही सभा मंजूरी देतआहे.**

**सूचक :– १) श्री. प्रकाश सातवे (सभासद क्र.२०३१०)**
**२) श्री. मधुकर आंबोणकर (सभासद क्र.२३५१२)**

**अनुमोदक :– १) श्रीम. वर्षा माळी (सभासद क्र.२६३८०)**
**२) श्री. रोहिदास थळे (सभासद क्र.२३८२५)**

**उपरोक्त ठराव क्र. ६ सर्वांनुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ७ :– मान. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेणे.**

**७ : वैद्यकीय सहाय्य योजनेचे दस्तावेज सभासदांना परत करणे.**

**श्री. प्रकाश सातवे (स.क्र. २०३१०)** यांनी आयत्या वेळी विषय उपस्थित केला की, सभासदांनी संस्थेकडे सादर केलेले वैद्यकीय सहाय्य योजनेचे दस्तावेज सभासदांना परत करण्यात यावेत.

सदर विषयी सभेत सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) १ जानेवारी, २०२० पूर्वीचे वैद्यकीय सहाय्याचे मंजूर व नामंजूर अर्ज सभासदांनी लेखी मागणी केल्यास ते त्यांना परत देण्याचा निर्णय संस्थेने यापूर्वीच घेतलेला आहे. सदर दस्तावेज त्यांना ३०.१०.२०२५ पर्यंत मिळू शकतील. मात्र त्यानंतर ते पूर्णत: नष्ट केले जातील.

२) १ जानेवारी २०२० नंतरचे नामंजूर झालेले अर्ज सभासदांनी लेखी मागणी केल्यास ते त्यांना परत देण्यात येतील.

याविषयीचा ठराव पुढीलप्रमाणे :

**ठराव क्र. ७ :– ''ठरविण्यात येते की, १ जानेवारी २०२० पूर्वीचे वैद्यकीय सहाय्याचे मंजूर व नामंजूर अर्ज तसेच १ जानेवारी २०२० नंतरचे वैद्यकीय सहाय्याचे फक्त नामंजूर अर्ज सभासदांनी लेखी मागणी केल्यास ते त्यांना परत करण्यात यावेत.**

**ठराव क्र. ७ सर्वानुमते मंजूर**

**सूचक :– श्री. प्रकाश सातवे (स.क्र. २३३१०)**

**अनुमोदक :– श्री. प्रदीप भोसले (स.क्र. २३१६८)**

कार्यक्रम पत्रिकेतील उपरोक्त कामकाजानंतर मान. अध्यक्ष श्री. कमलाकर क्षीरसागर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. ते पुढीलप्रमाणे :

**अध्यक्षीय मनोगत : –**

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या, सुवर्ण महोत्सवी वर्षांनंतर, संपन्न होत असलेल्या, ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी विविध ठिकाणाहून आलेल्या, मान्यवर सभासदांचे मनःपूर्वक स्वागत करताना आनंद होत आहे. वातानुकूलित सभागृहात अशी सभा दुसऱ्यांदा संपन्न होत आहे, ही सुखदायी तसेच आनंदाची बाब आहे.

आजच्या सभेने एकमताने, विद्यमान अध्यक्ष, कार्यवाह तसेच कार्यकारिणीवर संपूर्णपणे विश्वास व्यक्त करत, बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या, सन २०२५ ते २०२८ या कालावधीसाठीच्या, प्रस्तावित ११ कार्यकारिणी सदस्यांची (एकूण ११ सदस्यांमधे ४ नवीन चेहरे तसेच २ महिला सदस्यांचा अंतर्भाव) निवड केल्याबद्दल, मी सर्वांप्रती आभार व्यक्त करतो. स्वीकृत सभासद / निमंत्रित सभासद यांच्यासह संपूर्ण कार्यकारिणी, निवृत्तीवेतन धारक / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांना सर्वथैव सक्षमता प्राप्त व्हावी, यासाठी सदैव प्रयत्नशील राहील, असे मी आपल्याला आश्वासित करत आहे.

आपल्या संस्थेची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा, याच सभागृहात, दिनांक २१.०९.२०२४ रोजी संपन्न झाली होती. सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचा समारोप करताना, माझ्या मनोगतात मी एकूण १९ विविध मुद्द्यावर विवेचन केले होते. पैकी खाली नमूद केलेले तीन मुद्दे अद्याप प्रलंबित आहेत, याची मला जाणीव आहे. त्या अनुषंगाने उचित कार्यवाही नजिकच्या भविष्यात करण्याचा प्रयत्न असणार आहे.

**अ) मुद्दा क्र. १० –**

निवृत्तीवेतनधारकाच्या, कुटुंब निवृत्तीवेतनासाठी पात्र व नामनिर्देशित पत्नी / पती बाबतची, आवश्यक सर्व माहिती, सॅप संगणकीय प्रणालीमध्ये नोंदविण्यासाठी, वेबपेज विकसित करून, कार्यान्वित करणे,

**ब) मुद्दा क्र. १२ –**

१) महाराष्ट्र राज्यातील इतर २८ महानगरपालिका तसेच A Grade नगरपरिषदांमधील सेवानिवृत्तांच्या प्रतिनिधीसाठी एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करणे.

२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त होऊन, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर या जिल्ह्यातील विविध ठिकाणी निवास करणाऱ्या निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतन धारकांचे स्नेहमेळावे आयोजित करणे.

३) विभागीय केंद्रातील कलाकारांना स्टेज उपलब्ध व्हावे, यासाठी संगीत रजनी कार्यक्रमाचे आयोजन करणे.

संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या समारोप निमित्ताने, आपण ११ ठिकाणी सांगता समारंभ आयोजित केले होते. विविध ठिकाणच्या सांगता समारंभात अनेक उत्कृष्ट कार्यक्रम, नाविन्यपूर्ण उपक्रम सादर केले गेले. यामुळे संस्थेची प्रतिमा उजळून गेली, संस्था कार्यास झळाळी प्राप्त झाली, आपल्या हातून काही उत्तम साकारल्याचा अभिमान, आनंद कार्यकर्त्यांना लाभला. पैकी काही विशेष उपक्रमाची दखल घेणे आवश्यक आहेच.

१) SIRF या संस्थेच्या माध्यमातून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जात, देशाच्या सीमांचे अहोरात्र संरक्षण करणाऱ्या सैनिकांसाठी, सियाचीन भागात ऑक्सिजन प्लांट उभ्या करणाऱ्या श्रीमती सुमेधाताई चिथडे यांचा सादरीकरणाचा कार्यक्रम बोरीवली विभागाने आयोजित केला होता. हा कार्यक्रम संपल्यावर, बोरीवली विभागातील सभासदांनी जमा केलेल्या धनराशीमध्ये संस्थेने अल्पशी भर घालून रु. ५,००,००१/– (रु. पाच लाख एक फक्त) एवढा निधी श्रीमती चिथडे यांच्या कार्यास दिला.

२) सेवानिवृत्त मंडळींचे मानसिक स्वास्थ आणखी सुधारावे या उद्देशाने, श्री. समर्थ रामदास स्वामी यांचे भक्त असलेल्या, श्री. समीर लिमये यांच्या अभ्यासपूर्ण विवेचनाचे कार्यक्रम डोंबिवली तसेच मुंबई शहर विभागाने आयोजित केले होते. श्री. लिमये यांचे मंत्रमुग्ध करणारे विवेचन ऐकताना श्रोते भारावून गेले होते.

३) गोरेगाव विभागाने, श्री. अक्षय जोग यांचे लोकमान्य टिळक यांचेवरील भाषण आयोजित केले होते. शिवाय मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या काष्ठशिल्प वस्तूंचे प्रदर्शन भरविले व मुंबई महानगरपालिकेच्या शाळातील मुलांच्या कलेला समाजासमोर आणून, त्यांना, त्यांच्या शिक्षकांना प्रोत्साहित केले. ह्या कलावस्तू, नंतर मुंबई शहर विभागाच्या कार्यक्रमात पुन्हा प्रदर्शित केल्या होत्या.

४) पुणे विभागाने डॉ. सलिल लाटे यांच्या ''व्होकल सोनाटा'' या नाविन्यपूर्ण संकल्पनेच्या माध्यमातून ''सुकुन भरे नगमे'' हा हिंदी गीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता. शिवाय डॉ. नितिन करमळकर, शिक्षण तज्ज्ञ व माजी उपकुलगुरु यांना आमंत्रित करून शिक्षणाबाबतचे मौलिक विचार ऐकण्याची संधी सभासदांना मिळवून दिली. सदर प्रसंगी श्रीम. कुसुम कामत, माजी शिक्षणाधिकारी, मनपा यांचे ''फुले बकुळीची'' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. या प्रसंगी त्यांनी संस्थेला रु. २०,०००/– (रु. वीस हजार फक्त) इतकी देणगीही दिली.

५) श्री. योगेश जोशी यांच्या ''हसू आणि आसू'' या हास्यप्रधान व प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन कल्याण तसेच मुंबई शहर विभागातर्फे करण्यात आले होते, तर वसई विभागाने दोन वेगवेगळ्या समाजांच्या विवाह पद्धती विशद करणारा खास कार्यक्रम आयोजित केला होता.

६) सर्वच विभागीय केंद्रांनी स्थानिक कलाकारांना या निमित्ताने स्टेज उपलब्ध करून दिले, या सर्व उपक्रम/कार्यक्रमामुळे उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले, ठिकठिकाणी नवीन सभासद पुढाकार घेताना दिसून आले, संस्थेच्या पुढील वाटचालीची एक प्रकारे पायाभरणी झाली. सर्वात महत्त्वाची बाब अशी की, संस्था कार्याचा उद्देश – सर्वथैव सक्षमता (आर्थिक, मानसिक, शारीरिक) जास्तीत जास्त सभासदापर्यंत नेणे शक्य झाले.

ही गोष्ट सत्य आहे की, हे यश प्राप्त झाले, ते संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारिणी सभासद, विभागीय केंद्रातील सक्रिय सभासद व सभासदांच्या सहकार्याने, सहभागाने, यासाठी मी उपरोक्त सर्वांचे मनःपूर्वक कौतुक करतो, अभिनंदन करतो व या सर्व घटकांचे असेच पाठबळ, सहकार्य संस्थेस भविष्यात देखील लाभेल, अशी आशा व्यक्त करतो.

